
# अठरा गावे अठरा विश्वे

आनिल थत्ते



म. ग्रं. सं. ठाणें.
भू प्रवास
५८३
REFBK-0020872
FBK-0020872

वि. ९३ २०८७२
५८३ भू. प्रवास
२।७।२।८५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 AUG 1976

10 OCT 1976

13 OCT 1982

14 NOV 1982

[क्र. मा. प.]

प्रा. अनिल थत्ते

# अठरा गावे
# अठरा विश्वे

साधना प्रकाशन

२०८७२
भू. प्रवास

REFBK-0020872
REFBK-0020872

## प्रकरणे

१ : दरेवाडीची उलटी खूण ५ | २ : वेशीबाहिरच्यांचे जग ११ | ३ : तांब्या सांडला... पाणी कसे भरू ? २२ | ४ : ह्यो कसला देव–निस्ता दगड ! ३१ | ५ : इडापिडा महाराला...३९ | ६ : उजवा हात खायला, डावा हात धुवायला... तसेच जातीचे ! ४५ | ७ : सगळीच मनगटबाजी ५१ | ८ : हा न्याय झाला नाही ६२ | ९ : ढोराने दुष्काळ पाडला ! ७० | १० : पोलिस खात्याची अशी ही ‘ दक्षता ’ ७५ | ११ : टोपीने घातलेला वोळ ८३ | १२ : आमच्या वाक्याला फक्त शब्द व अश्रू ८७ | १३ : तिचे पुढे काय होते ? ९६ | १४ : सोनाच्या कडेलोटाची कहाणी १०३ | १५ : न्यायासाठी दाही दिशा १०७ | १६ : हे ग्रहण कधी सुटणार ? ११४ | १७ : महाराला मांगाचा बाट ! १२१ | १८ : अठरा गावे : अठरा विश्वे ! १२८ |

---

© अनिल थत्ते

मुखपृष्ठ : अरुंधती सबनीस

मुद्रक
नाना डेंगळे
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

प्रकाशक
नाना डेंगळे
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

---

किंमत रु. ६·००

# प्रकरणांत शिरण्यापूर्वी

प्रा. अनिल थत्ते आणि ॲडव्होकेट प्रेमानंद रूपवते यांच्यासह मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील युवकांनी अहमदनगर जिल्ह्यात समता दिंडी काढण्याचा एक प्रयोग केला.

त्या प्रयोगाच्या निमित्ताने अठरा गावांतील अठरा विश्वांचे त्यांना जे दर्शन झाले त्याचे हे अंकन.

जे पाहिले, जे ऐकले ते शब्दांतून साकार करण्याचा हा प्रयत्न आहे. एखाद्या छायाचित्रकाराने शक्य तेवढ्या निर्लिप्त मनाने, पण कलात्मकतेचे अवधान राखून प्रसंग टिपावेत तशी ही धडपड आहे. बऱ्या-वाइटाची, खऱ्या-खोट्याची शहानिशा येथे केलेली नसून जे जसे दिसले– ऐकू आले ते शक्य तो तसेच्या तसे समाजापुढे, एखाद्या स्वच्छ आरशातील प्रतिबिंबासारखे, दाखवण्याचा हा प्रयत्न आहे.

नाही तरी येशूने म्हटलेच होते की, कोणाचा निवाडा करण्याच्या फंदात तू पडू नकोस. याचा अर्थ दिसणारे पाहू नकोस, श्रवणी पडणारे ऐकू नकोस, आणि जाणवणारे बोलू नकोस असा विपरीत काही मंडळी करतात. येशूच्या वचनाचा अर्थ एवढाच आहे की, सजा फर्मावण्याचे काम तू आपल्या शिरावर घेऊ नकोस.

त्याच भावनेने हे सर्व टिपलेले आहे.

अठरा प्रकरणांत ह्या प्रश्नाचा गुंता किती घनघोर आहे त्याची कल्पना येईल.

सामाजिक–आर्थिक–राजकीय–सांस्कृतिक धागे येथे असे काही गुंतलेले आहेत की, एक धागा सोडवायला जाताच अनेक धागे

कमी-अधिक खेचले जातात, आणि गुंता सुटण्याऐवजी वाढतच जाईल की काय, अशी शंका मनाला चाटून जाते.

हा गुंता नुसत्या प्रचाराने, नुसता आक्रमक-आक्रस्ताळा पवित्रा घेऊन, नुसती भांडाभांडी उकरून काढून, नुसती लाचार नरमाई दाखवून, किंवा नुसत्या दंड वा दहशतीच्या धाकाने सुटण्याइतका साधासुधा नाही; त्यात अनेक साध्या आणि कित्येक निरगाठीदेखील बसलेल्या आहेत.

तो गुंता एकमार्गी पद्धतीने आणि सुखासुखी सुटणारा नाही; पण तो सोडवल्यावाचून पुढेही जाता येणार नाही.

युवकांनी आपले संघटित बळ लावून आणि सर्जनशील, कृतिप्रवण बुद्धिमत्ता वापरून हा गुंता सोडवण्याला हात घातला पाहिजे.

तरुणांना आपले तारुण्य कृतार्थ करण्याला अवसर देणारे हे एक मोठे आव्हान आहे.

अठरा गावांची ही अठरा विश्वे पाहून नुसते स्तिमित वा भावाकुल होऊन चालणार नाही; उलट त्या विश्वांना गवसणी घालण्यासाठी पुढे सरसावले पाहिजे.

प्रबोधन, संघटन, रचना, संघर्ष आणि एकात्मता ह्या नव्या पंचशीलाचा स्वीकार करूनच हा गुंता सोडवण्याचा प्रयत्न करावा लागेल.

अठरा गावांच्या अठरा विश्वांचे हे दर्शन त्यासाठी प्रस्तुत केले आहे.

साने गुरुजींना जीवनाच्या अखेरच्या चरणात हाच एक ध्यास होता. त्याचा हुंकार असलेले हे लिखाण त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षात जनताजनार्दनाला समर्पण.

प्रकरण पहिले

# दरेवाडीची उलटी खूण

२०८८२
५४३

दरेवाडीची उलटी खूण.
दरेवाडीतील दलितांवर सवर्णांचा सामूहिक हल्ला.
दरेवाडीत तुफान दगडफेक. दंगल. मंदिरप्रवेशाचा सूड.
दरेवाडीत मंदिरप्रवेश करणाऱ्या हरिजन स्त्रीचा गूढ मृत्यू.

दरेवाडीला 'समता दिंडी'चा समारोप करून परतल्याला जेमतेम दोन दिवस झालेले.
सकाळी वर्तमानपत्रे उघडतो तो चौकटीत वृत्त.
त्याच वेळी नगरहून प्रभाकर रुपवत्यांचा ट्रंक-कॉल येतो.
प्रकरण बरेच चिघळलेय. आज नगरमध्ये मोर्चा काढून चौकशीची मागणी करतो आहोत. दिंडीपैकी कोण येणार ?
मी लगेच निघतो.

दरेवाडी.
नगरपासून दोन-अडीच मैलांवरील १५००–१६०० वस्तीचा गाव. हजार संख्या सवर्णांची. उरले पाचसहाशे दलितांपैकी. बौद्धांची वस्तीच त्यात बहुतेक. नगरपासून जवळ पण नागरी वळण नसलेला गाव. नगरमध्ये नोकरी-धंद्याला जाणारे लोक पुष्कळ, पण गावात परतल्यावर गावातल्या तटबंद्यांत बंदिस्त होणारे. दरेवाडीच्या गावठाणाच्या तीन बाजूंनी दलितांची वस्ती विखुरलेली. दलितांची वस्ती हजारास सहाशे. त्यामुळे परिस्थिती थोडी अटीतटीची. दलित संघटित जागृत. काहीसे ताठ. सदा सावध. सतर्क. परिणामस्वरूप सवर्णांची जूट

सबळ. जातीचा अभिमान अधिक धारदार. प्रत्येक प्रश्न प्रतिष्ठेचा; जातीच्या इभ्रतीचा करण्यावर भर. दलितांचे शारीरिक बळ सहाशे पण सहा हजाराला भारी ठरावे असे चिवट. बळकट. त्यांचीही तोडीस तोड. अरे-स का-रे.

' समता दिंडी 'च्या नगर जिल्ह्यातील दौऱ्याचा समारोप आधी नगरला ठरत होता. पण दादासाहेब रुपवते म्हणाले, ' दरेवाडीलाच समारोप करा. सामाजिक समता परिषदेच्या कल्पनेचा जन्म ' तिथलाच. '

' दरेवाडीचा ? '

' होय. '

' तो कसा ? '

१९६७ मध्ये दरेवाडीला भयानक दंगल झाली होती.

काठीची दंगल.

दसऱ्याचा दिवस होता. सीमोल्लंघनासाठी गावकरी मिरवणुकीने बाहेर पडले होते. वाद्यांचा जयघोष. नृत्यांचा जल्लोष. लेझिमपटू बेहोष. हलगी कडकडत होती. देवाचे निशाण काठीवर फडफडत होते. डौलाने. फडकत नाचत मिरवत पुढे जात होते.

गावकरी निशाणाची काठी हाती धरायला मिळावी म्हणून अहमहमिकेने पुढे सरसावत होते. निशाणाच्या काठीला स्पर्श झाला, ती वहायला, नाचवायला, मिरवायला मिळाली तर देवाची ' सेवा ' घडली म्हणून धन्य होत्साते बाजूस सरत होते.

निशाणाची ती काठी ह्याने घेतली. त्याने घेतली. पाटलाने घेतली. तेल्याने घेतली. सुताराने घेतली. लोहाराने घेतली. पण...

इतक्यात आक्रित घडले.

तितक्यात विप्रित घडले.

देव बाटला. देव कोपला.

सगळ्या जगाचे पालन करणारा

प्राण्यांचा उद्धार करणारा

अहल्या शिळेला पावन करणारा
देव, साक्षात परमेश्वर, दस्तुरखुद्द, त्रैलोक्याधिपती सर्वसाक्षी सर्वव्यापी देव बाटला.

कुणा महाराने धारिष्टच केले.
कुणा म्हाराने आरिष्ट आणले.
तो काठीला शिवला. तो निशाणाला भिडला.
त्या म्हाराने त्रैलोक्य व्यापून दशांगुळे उरलेल्या देवाला नुसत्या टीचभर हातांच्या करांगुली-स्पर्शाने बाटवला. नासवला.
भक्त चिडले. भक्त संतापले.
भक्त देवाच्या मदतीला धावले.
देवाला पवित्र करू म्हणाले.
देवाला शुद्ध ठेवू म्हणाले.

देवासाठी मुतायला गाईंची कमतरता नव्हती.
देवघर पुसायला शेणाची वाण नव्हती.
पण त्याने काय होणार ?
म्हारडा काठीला शिवला. म्हारड्यांनी देव बाटवला.
म्हारड्यांनी धर्म बुडवला.
हजारो वर्षांची परंपरा असलेला, शेकडो ग्रंथांचे बूड असलेला कोट्यवधींनी उरापोटी जपलेला हिंदुधर्म म्हारड्याने नुसत्या अंगुली-स्पर्शाने की हो बुडवला ! रसातळाला नेला.
हाणा; हाणा,–मारा–मारा––

सीमोल्लंघनाला निघालेल्या धर्ममार्तंडांच्या संतापाने परिसीमा गाठली.
गर्दी संतापली. गर्दी पिसाळली.
'त्याला एकट्याला कशाला मारता ? सगळीच म्हारडी लई माजलीत हाणा भडव्यांना. आपल्या गावात हे बेणं नाही पाहिजे. कुणाला जित्तंच सोडू नका.'

दंगल. भयानक दंगल.

जिवावर बेतले तर कोंडलेले मांजरसुद्धा नख्या काढते.
जिवावर बेतले तशी जिवावर उदार होऊन महार उभे राहिले.
प्रश्न जगण्याच्या हक्काचा होता.
माणूस माणसाला माणूस म्हणून जगू देणार का नाही ?
मारहाण झाली नाही, मारामारी झाली.
झुंज जबर झाली, पण एकतर्फी ठरली नाही.
वार करणारे हातही वार झेलणाऱ्या देहाबरोबर घायाळ झाले.
त्या जखमा कधी बुजल्याच नाहीत.
मधुमेहाने जर्जर रोग्याच्या जखमा चिघळाव्यात तशा चिघळत गेल्या.
दरेवाडी अल्सरच्या व्रणासारखी ठुसठुसत राहिली.

दादा, दादासाहेब रुपवते. नगरचेच.
दलित समाजाच्या वाट्याला येणाऱ्या साऱ्या चिरंतन घायाळ व्यथा–
वेदनांची लेणी त्यांच्या आयुष्यावर कोरलेली आहेत.
त्यांना राहवेना. त्यांना पाहवेना.
त्यांनी दरेवाडीला महाराष्ट्रातल्या शहाण्यासुरत्या माणसांची बैठक बोलावली.

दादा बोलताना गहिवरून म्हणाले,
'देशाला मातृभूमी म्हणतात, अशी कशी माता ही ? अशी कशी आई ? आपल्याच लेकरांचा छळ करणारी. त्यांच्यात डावे–उजवे करणारी. पक्षपात करणारी. ही अशीच छळ करील, हिच्या पान्हचात जर असा विखारच असेल तर ही कसली आई ? ही तर पूतना-मावशी. या देशात आम्ही राहतो, पण ही भूमी आम्हांला मायसारखी माया देत नाही. आम्हांला सहानुभूतीची भीक–तोंडदेखली दया नकोय. हृदयातून अनावरपणे ओसंडणारी माया हवी आहे. संध्याकाळी रानातून वासराकडे परतताना गायीच्या कासेतून वासराच्या प्रेमाने पान्हा फुटून रस्त्यातच

धारा गळू लागतात– असा अनावर पान्हा या भूमीला– मातीला, इथल्या जनतेला आमच्याविषयी फुटला पाहिजे. या देशातल्या दलितांचे हे दुर्दैव आहे की त्यांना माय नाही. माय म्हणावी अशी भूमी नाही.'

जमलेल्या अनेकांच्या जिव्हारी ते शब्द लागले. मधुकरराव चौधरी त्या बैठकीत होते.

कळवळून ते म्हणाले, 'दलित–दलितेतरांचे सामायिक व्यासपीठ महाराष्ट्रात उभे राहिले पाहिजे. समता, सहभाव आणि सहकार यांतून अहिंसक दिलेरीचे स्वप्न साकारले पाहिजे.'

सगळ्यांनीच ही कल्पना उचलून धरली.

दरेवाडीच्याच भूमीवर सामाजिक समता परिषदेची स्थापना करण्याचे निश्चित झाले. त्या वेळी दरेवाडीतील उभय गटांची बैठक झाली. पेचप्रसंग सुटल्यासारखा वाटला. प्रश्न मिटल्यासारखा वाटला. आग विझल्यासारखी वाटली.

पण आग विझलीच नव्हती.

आतल्या आत धुमसत होती.

'सामाजिक समता परिषदे'ची 'समता दिंडी' दरेवाडीत पोचली तेव्हा वेगळ्या भावना होत्या. आगळ्या कल्पना होत्या. संघर्ष संपला आहे. प्रश्न सुटला आहे. केवळ नगर जिल्ह्यातील दौऱ्याची सांगता करण्यासाठी या संदर्भात ऐतिहासिक महत्त्व असलेले एक स्थान निवडीत आहोत इतकेच. पण दरेवाडीने दगा दिला होता. दरेवाडी पुन्हा पेटली होती. या वेळी 'समता दिंडी'ची सांगता करण्यासाठी गेलेली माणसेच या संघर्षात गुरफटली होती.

पुन्हा उभय पक्षांत जबरदस्त झुंज झाली होती. तुफान दगडफेकीने वेशीबाहेरच्या महारवाड्याला पिंजून काढले होते. सामाजिक बहिष्काराच्या तंत्राने महारवाड्याला शरण आणण्याचा प्रयत्न झाला होता. गिरणी बंद. धान्य दुकान बंद. खासगी जमिनीतून जाणाऱ्या

पायवाटादेखील बंद. गावठाणातून दहशतीमुळे फिरायला मनाई तर बाजूच्या शेतांतून मालकांचा प्रतिबंध. महारवाड्याला चोहोबाजूंनी पुराने वेढलेल्या एकाकी बेटाची कळा आलेली. महारवाड्यावरला पहिला हल्ला अनपेक्षित नव्हता, तरी अवचित होता. त्यामुळे अंधाराचा फायदा घेऊन हल्ला करणारे सरस ठरले. पण प्रतिकाराची जुळवाजुळव बेटातही वेगाने सुरू झाली होती. गोफणीसाठी दगड गोळा होत होते. 'आता वार आपला'ची भाषा होती. सवर्णांकडले सुट्टीवर आलेले जवान सीमेवर जात-धर्म विसरून लढले, तरी गावात येऊन त्यांचे रक्त जागे झाले होते. सुरा घेऊन धमक्या दिल्या जात होत्या, आणि यावरच कळस म्हणून इंदूबाई श्रीरंग भिंगारदिवे या दलित स्त्रीचा गूढ मृत्यू झाला होता. अफवांचे पीक आले होते. इंदूबाईने दिंडीवाल्यांबरोबर देवळात प्रवेश केला, देऊळ बाटवले म्हणून कौसल्याबाई या सवर्ण स्त्रीच्या अंगात आलेल्या देवीने कौल देऊन तिला ठार केले,– इथपासून 'ती या गावात मेली नाही, ती प्रवेशाच्या वेळी इथे नव्हतीच' इथपर्यंत अफवा होत्या. नगर शहरात प्रभाकररावांनी मोर्चा काढायची तयारी चालवली होती.

दुपारपर्यंत दरेवाडीला पोचावे यासाठी घाईने मी निघालो होतो. मोटर वेगाने नगरच्या दिशेने धावत होती. माझ्या डोळ्यांसमोर नगर जिल्ह्यात भ्रमंतीसाठी 'समता' दिंडी निघाली. त्या दिवसापासूनचा घटनापट उलगडत होता......

## प्रकरण दुसरे

# वेशीबाहिरच्यांचे जग

जिल्हा अहमदनगर.

तालुका पारनेर.

मुक्काम लोणी-मावळ.

प्रचंड किल्ल्यासारखी भक्कम बंदिस्त भिंत समोर दिसते.

'हा कुठला किल्ला?'

'किल्ला नाही. गावकूस आहे. इतर बहुतेक गावांच्या गावकुसाच्या भिंती पडल्या आहेत. इथली अजून कायम आहे. ते प्रचंड दार दिसतेय तीच वेस. या वेशीचे दरवाजे पूर्वी संध्याकाळ झाली की बंद व्हायचे. आता बहुतेक दारे मोडली. भिंतीही ढासळल्यात.'

सरपंचांना आधी कळवलेले असते.

'एक गाव : एक पाणवठा' कल्पनेच्या प्रचारासाठी 'समता दिंडी' नगर जिल्ह्यात येत असल्याचे पेपरमध्येही आलेले. सरपंच तयारीत असतात.

त्यांचे नमस्कार-चमत्कार चालू.

आमचे लक्ष त्या प्रचंड भिंतीवरच खिळून असते.

तीन-चार पुरुष उंचीची भव्य वेस.

काही चिरे निखळलेले. एक दार मोडलेले. दुसरे कुजलेले. बाजूने दोन हात पसरून उभे राहावे तशी भिंत.

वेशीबाहेर समोर साचलेला एक डबकेवजा ओहोळ. त्या गलिच्छ काळ्या ओघळापाशीच एक बाई चिरगुटे धूत असते. पलीकडे पाच-सात तट्टे आणि कुडाच्या पाख्या लावलेली खोपटे. पलीकडे एकांडेपणे उभी आणखी काही खोपटे.

‘ तिकडे कोण राहतात ?’

‘ तो हरिजनवाडा आहे.’

सरपंच जातिवाचक शब्द कटाक्षाने टाळतात. शासकीय मान्यताप्राप्त ‘हरिजन’ शब्द प्रत्येक वेळी वापरतात. चांभारऐवजी चर्मकार, मांगऐवजी मातंग वगैरे.

‘ वेशीच्या आतली घरे कुणाची ?’

‘ ती सगळी आमची वस्ती आहे.’ दुसरा कुणी उत्तरतो.

‘ आमची म्हणजे ?’

‘ आमची म्हणजे गावकऱ्यांची.’

‘ हरिजन गावकरी नाहीत का ?’

बोलणाऱ्याला चूक उमगते. तो सावरून घेतो.

‘ नाही, तसे नाही. पण बिगरहरिजन इकडे राहतात असे.’

‘ ह्या भिंती कशाकरता बांधल्या हो ?’

‘ ते काय– जुने बांधकाम आहे. पूर्वी चोर–दरोडेखोर, पेंढारी गावावर धाडी घालायचे; तेव्हा संरक्षणासाठी बांधलेल्या.’

‘ मग, महारामांगांची घरे कशी बाहेर ? त्यांना नाही वाटते दरोडेखोरांची भीती ?’

प्रश्नकर्त्याला खुळ्यात काढणारे हसत, आणखी एक गावकरी म्हणाले

‘ त्येंच्याकडे काय असणार चोरायला ?’

‘ हे बाकी खरे !’

‘तटाच्या चारी बाजूंनी दलितांची घरे आहेत का ?’

‘नाही. ह्याच अंगाने आहेत.’

‘ इकडेच का ?’

‘का असे नाही. पहिल्यापासून ह्याच अंगाने त्यांची वस्ती राहिली.’

‘गावावर वारे कुठल्या अंगाने येतात ?’

‘ तिकडल्या वरच्या अंगाने.’

‘ म्हणून महारा-मांगांची घरे इकडल्या खालच्या अंगाला, होय ना ? अशी पद्धत आहे ना– की महारवाड्यावरून गावावर वारे येऊ नयेत ?’

‘जुनी रीत– तेव्हा काय आपण नव्हतो.’ सरपंच.

‘आता आपण आहोत तरी काय वेगळे घडतेय?’
सरपंच विषय टाळीत म्हणतात, ‘चला– लोक मीटिंगला जमलेत.’
वेशीतून आत जातो.
मध्ये मोठे मोकळे पण ओबडधोबड पटांगण आहे.
मध्ये ध्वजारोहणाचा चौथरा अन् खांब.
स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे स्वातंत्र्याचे निशाण बंदिस्त वेशीच्या आतच फडकत आले आहे.

पटांगणात पोरे घोळक्याने उभी.
‘काय रे? शाळा नाही का?’
‘सुटली.’ एक पोरगे अंग चोरून लाजत पुटपुटते.
‘एवढ्यात कशी सुटली रे?’
‘गुर्जी म्हन्ले पावने येनारेत.’
‘कोण पावणे रे?’
पोरे एकमेकांकडे पाहून तुफान लाजताहेत. ज्याला प्रश्न विचारावा तो इतरांकडे पाहून लाजत संकोचत, बुजत, एखादा शब्द बोलून, कासवाने बुजून मान आत ओढावी तसा इतर पोरांच्या घोळक्यात शिरतोय.
‘तुमीच की.’ एक पोरगा धिटाईने म्हणतो.
‘आणखी काही नाही सांगितले का गुरुजींनी?’
‘नाही.’ दोनचार पोरे म्हणतात.
‘सांगितले–’ दुसरा कुणी म्हणतो. त्याला हेरून प्रश्न,
‘काय सांगितले रे?’
‘समदे एकाच हिरीवर पानी भरत्यात म्हनून सांगाया सांगितले.’
‘मग खरेच भरतात का एका ‘हिरी’वर पाणी?’
‘न्हायी.’
‘मग खोटेच सांगणार होय?’
तेवढ्यात प्रौढ गावकऱ्यांचे लक्ष जाते. एकजण कावळे उडवावेत तसे हातवारे करीत जवळ येऊन पोरांना हुसकू लागतो.
‘राहू द्या हो, पोरे आहेत. ऐकू द्या. काय बिघडले?’

तो माणूस वैतागून मारक्या नजरेने पोरांकडे पाहात घुटमळतो.

सरपंच जवळ येऊन म्हणतात,

'चला सभेला.'

'आम्ही सगळेजण सभेला नाही येत. एक-दोघे कुणी तरी येतील. प्रभाकरराव येतील. बाकीचे गावात फिरतील. आम्हांला गाव पाहायचाय.'

'आम्ही नंतर दाखवू की' सरपंच आवंढा गिळतात.

'सगळयांनी एकदम सभेत जायचे नाही. काहींनी सभा घ्यायची. काहींनी मुलांशी, काहींनी तरुणांशी बोलायचं. काहींनी गाव पाहायचं असे ठरलंय.'

सरपंच किंचित विचार करतात.

'मग मी आमची माहितगार माणसे देतो बरोबर. ती सगळे दाखवतील.'

सरपंचांची– आम्ही एकटे स्वतंत्रपणे फिरून माहिती काढावी याला संमती नाही हे स्पष्ट.

'नको, तसे नको.' आम्ही बोलणे तोडल्यासारखे करून विखुरतो. दोन दोनच्या गटाने.

प्रभाकररावांबरोबर मी सभेत जातो.

सरपंच ओळखीचे गुऱ्हाळ लावतात.

माणसे दाटीवाटीने समोरच्या हॉलमध्ये बसलेली.

सरपंच सांगत असतात, 'आमच्या गावात एकोपा आहे. पाणवठा एक आहे. अस्पृश्यता मानीत नाही. हरिजनांना प्रेमाने वागवतो....' इत्यादी बरेच काही.

सरपंच भाषण संपवतात.

तशी प्रभाकरकाका उभे राहतात. म्हणतात—"तुमच्या गावात एकोपा आहे. पाणवठा एक आहे हे ऐकून खूप आनंद झाला. ही मुले सगळी मुंबईहून आली आहेत. तुमच्या गावात काही वाईट प्रकरण घडले म्हणून नव्हे. त्यांना वेस म्हणजे काय, गावकूस म्हणजे काय– बघायचे होते म्हणून इथे आणले. तुमच्या गावाचे

आम्ही खूप कौतुक नगरला ऐकले. मागल्या दुष्काळात गावाने पाण्याची खूप गैरसोय झाली असतानाही महारवाड्याकरता खास सोय केली होती, खरे ना ? तेच ऐकायला ही मुले आली आहेत.'
अनेकजण खुषीने माना डोलावतात.
एकूण ही मुले येण्याचे प्रकरण सरपंचांनी सांगितले तसले 'आडवळणा 'चे नाहीसे दिसते.
' तर त्या वेळी आपण काय केले होते ? '
एक साधारण पस्तीशीचा माणूस उभा,–उत्साहाने पण संथ सुरात पाल्हाळ लावत म्हणतो, 'तो दुष्काळ पडला. पाण्याचा लई तरास. आम्हांला बी अन् त्येन्ला बी. गावाला पाण्याचे लई हाल. समद्यांची 'इक्ती दैना की इचारायची सोय नाही. पण गावाने मानुसकी सोडली नाही. गावाने मानूस ठेवला हिरीवर हरिजनांना पानी वाढायला. एवढा दुस्काळ पडला, पण एक पन हरिजन पान्यावाचून मेला नाही. समद्यांना मानुसकीने पानी वाढले.'
गावकरी शब्दांत गवसले.

मी उठून म्हणतो, 'गावानं माणुसकी दाखवली हे चांगलेच झाले, पण महारा–मांगांना पाणी वाढायला माणूस ठेवला याचा अर्थ त्यांना स्वतःच्या हातांनी पाणी भरायला परवानगी नाही. मग 'एक गाव : एक पाणवठा ' कसा झाला ?'
'एकदम कसे समदे पालटेल ? अशा गोष्टी दमानेच व्हायाच्या.' एक म्हातारा थोडा वैतागूनच म्हणतो.
'दमाने व्हायच्या हे खरे, पण अजून किती काळ दम धरायचा ?'
लोकांची आपसांत कुजबूज होत राहते. आपण येवढा 'माणूस ' ठेवून म्हारा-मांगांना पाणी 'वाढले ', आणि तरी ह्याने 'आडवळणा 'चे बोलणे बोलावे याचा राग दिसतो.
प्रभाकरराव विषय बदलीत म्हणतात, 'इथं स्मशाने किती ?'
' सात-आठ असतील. '
' कुणाकुणाची आहेत ?'

'एक गावाचे आहे. एक मुसलमानाचे, एक बौद्धाचे. एक मातंगांचे, एक चर्मकारांचं,–आणखी दोन तीन जातींची आहेत.'

'महारांपैकी कुणी आहे का इथे ?'

'जी–'अदबीने दोघे-तिघे उभे राहतात. मळके–विटके, जीर्ण कपडे. रापलेले चेहरे.

'तुमचे स्मशान कुठे आहे ?'

'तिकडे, खाली.' हातवाऱ्याने ते दिशा सुचवतात. उत्तर देताना त्रोटक आखुड बोलतात. आवाजही दबलेला.

'प्रेते जाळता का पुरता ?'

'पुरतो जी.'

'कुणी जाळले का अजून ?'

'नाही. कोण एवढा तालेवार नाहीच इथे. समदी पुरतात. सरपण लई म्हाग झाले. शंभर–दीडशेचे सरपन लागतेय मानूस जाळायला. जित्या माणसाला खायला पैका नाही ते जाळायला कुठून आणायचा ? पुरायचीच वहिवाट आहे इथे !'

'समजा, उद्या कुणी जाळले तर कुठे जाळाल ?'

'आपल्याच जागेवर.'

'का बरे ? गाव जिथे जाळतो तिथे का नाही ?'

'ते कशाला त्यांची मसणवट दुसऱ्यांना वापरू देतील ?'

'का देणार नाहीत ?'

'पण त्येंना हाय की त्येंची सोताची मसणवट. आमच्यातच कशाला जाळायला पाहिजेल ?' एकजण उठून म्हणतो.

'पण सगळा गाव जर तिथे प्रेते जाळतो तर महारांनी जाळले म्हणून कुठे बिघडले ? माणूस जिवंत असताना तुम्ही त्याला वेगळा ठेवताच. मेल्यावर राख तर एका जागी पडून मातीत एक होऊ द्या.'

'आमचे कशाला ? त्येंची स्वतःची मसणवट तरी एक हाय का इच्यारा ! महारांची वेगळी, चांभारांची वेगळी, मांगांची वेगळी. चांभाराच्या मसणाला म्हाराचे प्रेत नेला तर जीव घेतील, अन् म्हाराच्या मसणात मातंग जाळतो नाय तर पुरतो म्हणून बघा !

मांगाला महार शिवत नाही. महाराला चांभार घरात घेत नाही. त्यांची कुठे एकी आहे ? '
सगळयांचेच आवाज वाढतात. आपसातच खूप बडबड सुरू होते. प्रभाकरकाका म्हणतात, ' तू गावात जा. मी बोलतो इथे. '

मी बाहेर जातो.
जवळच विहीर असते. दोन-तीन मुले बाजूला खेळत असतात. एक बाई पाणी भरत असते.
विहिरीच्या बाजूला एक पुरुषभर उंचीचा लाकडी खांब रोवलेला. त्यावर नवी-कोरी रंगवलेली पाटी असते :
' ही विहीर सर्व जाती-धर्मांच्या लोकांकरता खुली आहे.'
पाटीचे नवेपण इतके ठसठशीत की, ती काल-परवाच लावली असली पाहिजे.
खेळणाऱ्या पोरांना मी विचारतो, ' ही पाटी काल केव्हा लावली रे ? '
' काल नाही लावली—'
' मग ? ' अपेक्षांना ताण.
' परवा सकाळच्याला लावली. '
मला हसू येते. मग विचार मनात येतो...
या गावात आमच्या विचाराची, आगमनाची एवढीच तर निशाणी कालान्तराने शिल्लक राहणार नाही ?

एका सुताराची बायको भेटते. महारा—मांगांना दुष्काळात पाणी वाढायला माणूस ठिवला वगैरे गोष्ट सांगते.
'तुम्ही का नाही महारांना विहिरीवर पाणी भरायला देत?' मी विचारतो.
'विहीर काय आमची एकटयाची नाही. आम्ही कशाला काय सांगून गावाशी वाकडे घेऊ? गावापुढे ज्याने त्याने पायरीने वागणे पडते.'
वेशीबाहेरच्या वस्तीवर दोन-चार पोरे भेटतात. एकदोन बायाही. वस्ती शान्त वाटते. पण त्या शांततेला उदासपणाची कळा असते.

‘गावात देवळे किती?’

‘पुष्कळ.’

‘तुम्ही देवळात जाता का?’

‘नाही; आमचे कोणच जात नाही.’

‘तुमचा नवरदेव कुठे बसतो?’

‘बाहेर पारावरच बसतो.’

‘गावातला नवरदेव देवळात जातो मग तुमचा कसा जात नाही?’

‘आमचा नवरदेव पहिल्यापासून बाहेरच बसतो. तशीच पद्धत पडलीय.’

‘समजा, कधी आत गेलात तर गावकरी मना करतील का?’

‘करणारच की, पण आम्ही कशाला जातो?’

‘समजा, आमच्याबरोबर चला म्हटले तर याल का?’

‘येऊ की...पण तुम्ही गेल्यावर गाववाले काही म्हणले तर...?’

‘गाववाले मारहाण करतील काय?’

‘त्येचा काय नेम? तुमच्यासमोर कायपण बोलणार नाहीत, मागाहून डूख धरतील.’

‘एक गाव : एक पाणवठा ’बद्दल काही ऐकले का?’

‘सरपंचाने काल दवंडी पिटली गावात तेवढे ऐकले.’

‘काय दवंडी पिटली?’

‘हेच की– मुंबईहून ‘एक गाव : एक पाणवठा ’वाली साहेबमंडळी सकाळहून गावात येणार आहेत. चावडीत सभा आहे.’

‘सरपंच वस्तीवर आले होते का?’

‘इकडे आले नव्हते. पण आमच्या दोनचार लोकांना ऑफिसात बोलावले होते काल.’

‘कशाला?’

‘तुम्ही येणारेत ते सांगायला.’

‘आणखी काही सांगितले का?’

‘उगा तक्रार करू नका, काय असले तर आपसात मांडवळ करू गावाची बाहेर सोभा करू नका म्हणाले.’

‘गावात सावकारी कोण करते?’

‘ दोघे-चौघे करतात. पण मारवाड्याची जास्त आहे.’

‘ तुमच्या वस्तीवर कुणाला कर्ज आहे ?’

‘ तसे समद्यांनाच असतेय. लग्नाला, मयताला काही तरी होतेच आहे.’

‘ गहाण घेतो का ? ’

‘ तर ? त्याशिवाय देतो का ? ’

‘ काय गहाण ठेवता ? ’

‘ ज्याची जमीन असेल तो जमीन ठेवतो. पण आमच्यात काय एक-दोघांनाच धा-पाच एकर वतनाची जमीन आहे. त्यात पण भाऊबंदाचा सुकाळ झाला. बाकी काय वस्तू चीज ठेवतात.’

‘ वस्तीवरले नोकरीला किती आहेत ? ’

‘ चार-पाच जण मुंबईला आहेत. त्यांच्याच मनी-आर्डरीवर इथले तगून आहेत. बाकी इथे काय मिळत नाही.’

‘ त्यांच्या विहिरीवर पाणी भरू देतात का ? ’

‘ कशाने देतात ! आमची पोरेसोरे जवळ गेली तरी शिव्या घालतात. आमची वेगळी विहीर आहे.’

परतताना बारकी बारकी मुले शेरडामागे भेटतात. ती रोजच शेरडा-मागे जाणारी असतात. त्यांच्यापैकी कुणीच शाळेत जात नसते.

‘ शाळेत गेले तर शेरडामागे कोण जाईल ? ’ असे बाप म्हणतो. पुस्तक-पाटी पेन्सललाही पैसे नसतात.

त्या पोरांना नाव विचारतो.

जातीचा सुगावा लागावा म्हणून आडनाव विचारतो.

मग अपराधी वाटते.

वाटते, ही काय विचित्र सवय आपल्याला लागते आहे ! आपण जातिभेद मोडायला निघालो नि कुठलाही माणूस बाई–पुरुष–मुलगा दिसला की नकळत आपल्या मनात विचार येतो– याची जात कुठली असेल ? त्याच्या चेहऱ्यावर... त्याच्या कपड्यात...त्याच्या रंगात...त्याच्या बोलण्यात... त्याच्या नावात... त्याच्या आडनावात आपण जात शोधतो हे किती भयंकर.

ती मुले आडनाव– नाव सांगतात.

मला शेरडामागे जाणाऱ्या मुलांची जात कळायला हवी असते. त्यामागचे कारण विधायक असले तरी तुझी जात काय, हा प्रश्न विचारणे अवघड वाटते.
लहान मुलाला तुझी जात काय असा प्रश्न मी विचारतो तेव्हा त्याच्या मनावर मी कसला संस्कार करतो ?
मग मी हा शोध तरी कसा घ्यायचा ? प्रभाकरकाका सांगतात, ' प्रत्येक अशा छोट्या गावात सवर्ण आणि दलित ओळखणे तसे फार अवघड जात नाही. गावात प्रत्येक जातीची जी घरे असतात ती बहुतेक भाऊबंदांचीच जास्त असतात. त्यामुळे त्या गावात दोनतीन ठळक आडनावे चालतात. म्हणजे या लोणी-मावळ गावात मावळे हे आडनाव सवर्णांत जास्त चालते. वेशीबाहेरही ठराविक दोनतीन आडनावांचेच लोक त्या गावात असतात. यानंतर आपण ज्या कळस नावाच्या गावात जाणार आहोत. तिथे घाटगे हे आडनाव चालते. गावात गेल्यावर इथे कोणती आडनावं कोणात चालतात असे एकदा विचारले की झाले.'
शेरडापाठी जाणाऱ्या लोणी-मावळच्या त्या आठदहा पोरांत मावळे आडनावाचा कुणीच नसतो.
त्या सगळ्याच जणांची घरे वेशीबाहेर असतात. दिलीपला शाळेतल्या मुलांची टोळीच भेटते. त्या मुलांना शिवाजीचे नाटक करायला खूप आवडणारे असते. शिवाजीचे किंवा तानाजीचे किंवा मावळ्याचेसुद्धा काम करायला सारे तयार असतात. पण अफझुलखानाचे काम मात्र कुणीच करायला तयार नसते.
शेवटी एकमताने महाराच्या राव्यानेच हे काम करावे असे ते ठरवतात.

नको नको म्हणूनही महारवाड्यात अगत्याने शेळीचे दूध असलेला गुळाचा चहा मिळतो. घरात गूळ नसतो. मुलाला खुणावून ती बाहेर पडते. थोड्या वेळाने परतते. चहा करते.

परतताना सुधीर भेटतो. म्हणतो, 'तुम्हांला अशा अशा वर्णनाच्या बाईने चहा दिला ना ?'
आश्चर्य वाटून मी म्हणतो, 'होय. तुला कसे कळले ?'
ती बाई वाण्याकडे थकलेल्या उधारीवरून शिव्या खात 'पाहुणा आलाय, नाही म्हणू नको' म्हणून विनवण्या करत होती तेव्हा मी तिथे होतो.'
माझ्या पोटातला चहा हालला.
तिच्या चहाला मी किती आणि कसा जागणार आहे !

गावात पुष्कळ तरुणांशी बोलूनही फार काही घडत नाही.
एक दिवसाच्या एका मुक्कामात फार काही घडेल अशी भाबडी आशा नसतेच.
या गावातील तरुणांपैकी कुणी समता मंडळ स्थापन करण्यात पुढाकार घेईल काय, याला आशादायक सूर निघत नाही. कारण ज्या मुलांचे पत्ते मागितले त्यांच्यापैकी कुणीच आमचा पत्ता स्वतःहून मगितला नव्हता.
'प्रभाकरकाका, इथून कुठे जाणार ?'
'इथून आपण कळस नावाच्या गावाला जाणार आहोत.'
'खेड्यापाड्यातून दलित शिक्षकांची ससेहोलपट कशी होते याच्या बातम्या आपण वाचतो; अशाच एका शिक्षकाचे हे प्रकरण आहे.'
आम्ही कळसच्या दिशेने निघतो.

## प्रकरण तिसरे

# तांब्या सांडला....पाणी कसे भरू?

मुक्काम कळस.

कळसची वाट ( आणि वहिवाटही ) विचित्रच.

कमरेला कळसा नि गावाला वळसा तसा रस्ता. समोर तो डोंगर, त्याच्या बाजूला कळस गाव, असे किती वेळा ऐकून होतो. डोंगर समोर. पण वाट हूलकावण्या देत लपाछपी खेळत राहते.

कळसला पोचतो.

आम्ही उतरतो.

सुधीर आणि प्रदीपने लहान मुलांना गोळा करून गावातून मिरवणुकीने घोषणा देत फिरावे; नंतर त्यांना गोष्टी सांगाव्या, गाणी शिकवावी असे ठरते. सेवा दलाचे 'सैनिक गीतां'चे पुस्तक घेऊन ते निघतात. प्रेमानंद वगैरे मास्तर प्रकरणाची चौकशी गावात करायला जातात. मी आणि प्रभाकरकाका संबंधित मास्तरांच्या घरी पोचतो.

विठ्ठल दामोदर साळवे. मुख्याध्यापक गुरुजी. आम्ही येण्याचा उद्देश सांगतो.

साळवे गुरुजी सांगतात, 'गावातल्या शाळेत महार मुख्याध्यापक म्हणून येतो याच्या वैषम्यातून हे प्रकरण घडलेय. गावकऱ्यांना सहसा साधा मास्तरही जर बॅकवर्डपैकी असला तर नको असतो. त्याच्या बदलीकरता ते स्वत: खटपट करतात, नाही तर त्याच्याभोवती असे वातावरण निर्माण करतात की त्याने स्वत:हून बदली मागून पळावे. शाळेत आम्ही स्वत: कुठलाच भेदभाव करत नाही, पण आपला मुलगा महार–मांग मास्तरांच्याकडे शिकतो हे शल्य त्यांना डाचत

राहते. त्यांच्या प्रतिष्ठेला– अस्मितेला जणू आव्हान असावे तसे वागतात. मुलांना 'त्या म्हारड्याचे काय ऐकतोस?' 'त्या धेडपटाला काय कळतेय' असे वारंवार सांगून आदर नष्ट केला जातो. पालकांच्या असल्या वागण्याने काही वेळा मुलेही गुरुजींची आपसांत किंवा उघड जातिवाचक कुचेष्टा करतात.

'आमच्या वारंवार बदल्या होत राहतात. कुठेही गेलो तरी आम्ही उपरेच राहतो. गावकरी आमची जात पाहूनच वागवतात. गावात जागा मिळणे अवघड. वेशीबाहेर महारवाड्यात राहणे आम्हांला कठीण. वेशीबाहेरच्या वस्तीवरले लोकही आमच्या जातीचे असून आम्हांला परके मानतात. त्यांना चार गोष्टी सांगितल्या तर म्हणतात, तुम्ही आज आहात,–उद्या जाल. आम्हांला कायमचे इथेच राहायचे आहे.' गावकरीही 'गुरुजींच्या नादी लागू नका; तो जाईल बदली होऊन. तुम्हांला गावात राहायचेय.' असे झमकवून फूट पाडतात.

'कोर्टात कोणते प्रकरण गेलेय ?'

'सांगतो नं. २४ तारखेची गोष्ट. शाळेच्या परीक्षा चालू होत्या. विष्णु गलांडेच्या पोरीचे लग्न होते. सकाळपासून ठो ठो लाउड-स्पीकर लावला. पोरांना त्रास व्हायला लागला म्हणून मी त्यांना विनंती केली. तर लग्नात विघ्न घालतोस काय, म्हणून अंगावर आले. मग पोलिसपाटलाला सांगून बंद करवला. त्या लोकांनी डूख ठेवला. संध्याकाळी लग्नाचे सगळे लोक चिक्कार दारू प्यायले.'

'इथे भट्टी आहे का ?'

'भट्टी नसली तर टयूब आहे की. इथे पलीकडे कान्होबाचे देऊळ आहे. तिथे बाबू भापकर नावाचा दादा बसतो. देवळात एरवी महारा–मांगाने पाऊल टाकले तर मोडून ठेवतील, पण आता बाबू टयूब घेऊन आला की थेट देवळात जातो. तिथेच संध्याकाळी सगळा गाव प्यायला जमतो. बाबूकडे दारू प्यायला आलेल्या महारा–मांगाला मंदिरप्रवेश आहे. पण नवरदेव पाया पडायला गेला तर डोके फोडतील. हरी रामोशा बेल्याकडेही टयूब येते. या दोघांनी अख्खा गाव नासवला बघा.

सातच्या पुढं कुठल्या म्हणून घरातला कर्ता माणूस तुम्हांला शुद्धीवर सापडायचा नाही. इतकेच कशाला, मी दारू पीत नाही याचाही त्यांना राग येतो. 'फार सुधारला! मोठा बामण व्हायला बघतो धेडपट!' असली भाषा ते करतात. मी त्यांच्याशी समजून जमवून घ्यायला पाहतो, पण त्यांच्यासारखे गटारात लोळल्यशिवाय ते बरोबरीचे मानायचे नाहीत. ह्या दारूने खेड्यापाड्यांचा सत्यानाश केला बघा.

'तर त्या लोकांनी सीताराम पिराजी घाटगे नावाच्या माणसाला दारू पाजून धेडपटाने लग्नात विघ्न आणले वगैरे सांगून भडकवला. तोही असला की, त्याचे-माझे आडवे नसताना माझ्यावर आला. संध्याकाळी ५-५॥ वाजता रामकृष्ण रावजी काने याच्या दुकानात मी जिन्नस घेत होतो. तर याने 'का रे धेडपटा, फार माजलास काय?' वगैरे शिव्या दिल्या. अंगावर धावला. लोकांनी आवरले. मी लगेच सरपंच पोलिसपाटलाकडे तक्रार केली. त्यांनी 'सांगतो' म्हटले. मी गप्प राहिलो; तर दुसऱ्या दिवशी सकाळी मी घरात नसताना हा दारू पिऊन घरात घुसला. मला आठ मुली, एकुलता एक मुलगा. तर हा त्यांच्या अंगावर धावला. माझ्या पोरी घाबरल्या. घरात पुरुषमाणूस कुणी नाही. हा सीताराम जनावर झालेला. बाजूला एवढे लोक सगळे आडनावाने घाटगेच. ते नुसते उभ्या जागी राहून गंमत पाहात- 'जाऊ दे सीताराम, चल परत-' म्हणत. पण पुढे येऊन त्याला आवरीनात. पोरी रडायला लागल्या. एवढ्यात धाकट्या पोरीला युक्ती सुचली. माझा एक दांडगा कुत्रा आहे...'

मास्तर उठतात. 'बसा-' खूण करत शेजारच्या खोलीत जातात. चहाच्या कपबशा आणून ठेवतात. अन् पट्टा धरून एका गावठी पण तगड्या कुत्र्याला घेऊन येतात.
आम्ही मघा आलो तेव्हा हाच भुंकत होता.
'हं--'

'तर हा कुत्रा आत बांधलेला होता. तो बाहेरचा गोंधळ ऐकून आत भुंकत होता. पोरीने वेळ राखून त्याला सोडला. तशी तो तीरासारखा बाहेर आला. पोरावर सीतारामने हात टाकलेला पाहून चवताळून झेपावला. सीताराम घाबरला. कुत्र्याने धरलेले धोतर सोडून पळाला. तरी त्याची जिगर गेली नाही. त्याने शाळेत येऊन पोरांसमोर मला शिव्या द्यायला सुरुवात केली, 'धेडपटा, तुला कुणी हेडमास्तर केला ?' वगैरे...मला गचांडी धरून त्याने गावासमोर फडाफडा मारले. अखेर पोरांनी सोडवले. मी पोलिस-कंपलेन्ट केली तशी गावकरी एक झाले. सगळा गाव घाटग्यांचा. सगळेच एकमेकांचे भाऊबंद. 'धेडपट आपल्या-वर केस टाकतो म्हणजे काय ?' मी हरिजन ॲक्ट लावायची मागणी केली. सीतारामला तक्रार नोंदवून लगेच गावाने जामिनावर सोडवून आणले फौजदार रजपूत होते. त्यांना घाटग्यांनी चहापाणी केले तशी ते पालटले. आधी 'सीतारामला खडी फोडायला पाठविण्या'ची भाषा करणारे फौजदार खडीसाखरी भाषेत बोलायला लागले ! वर मलाच 'कशाला गावाशी वैर घेता ? शिव्या दिल्या तर काय अंगाला भोके पडतात काय ? ' म्हणायला लागले. 'तुम्हांला दोन मारल्या; मी तुमच्या साक्षीने सीतारामला दहा मारतो. मग तर झाले !' म्हणाले. तशी मी टास्क-फोर्सचे डी. वाय्. एस्. पी. केंकरे यांना कळवले. त्यांनी फिर्याद भरायला लावली. आधी फौजदार रजपूतला वश केला, तेव्हा सगळे घाटगे मला 'काय धेडपट उपटतो...' म्हणून खिजवत; पण फिर्याद झाल्यावर त्यांनी वेगळाच पवित्रा घेतला.'

साळवे गुरुजी एकाएकी व्याकुळ स्वरात दबल्या आवाजात म्हणतात, "साहेब, मी फिर्याद करायला लावली. मला काय साला–भडवा म्हणाला असता तर मी ऐकून घेतले असते, पण धेडपट म्हणाला ! माझी जात काढलीन, जातीची इज्जत काढली. ते मला आवडले नाही. पण आता अवघड जातेय. सगळे घाटगे एक. इथे दहाजण भेटले तर नऊ घाटगे निघतात ! एरवी यांची आपसात इतकी भाऊबंदकी आहे की सख्खा भाऊ सख्ख्या भावाच्या उरावर बसतो. रोजची यांची

सातच्या पुढं कुठल्या म्हणून घरातला कर्ता माणूस तुम्हांला शुद्धीवर सापडायचा नाही. इतकेच कशाला, मी दारू पीत नाही याचाही त्यांना राग येतो. 'फार सुधारला ! मोठा बामण व्हायला बघतो धेडपट !' असली भाषा ते करतात. मी त्यांच्याशी समजून जमवून घ्यायला पाहतो, पण त्यांच्यासारखे गटारात लोळल्यशिवाय ते बरोबरीचे मानायचे नाहीत. ह्या दारूने खेड्यापाड्यांचा सत्यानाश केला बघा.

'तर त्या लोकांनी सीताराम पिराजी घाटगे नावाच्या माणसाला दारू पाजून धेडपटाने लग्नात विघ्न आणले वगैरे सांगून भडकवला. तोही असला की, त्याचे–माझे आडवे नसताना माझ्यावर आला. संध्याकाळी ५–५।। वाजता रामकृष्ण रावजी काने याच्या दुकानात मी जिन्नस घेत होतो. तर याने 'का रे धेडपटा, फार माजलास काय ?' वगैरे शिव्या दिल्या. अंगावर धावला. लोकांनी आवरले. मी लगेच सरपंच पोलिसपाटलाकडे तक्रार केली. त्यांनी 'सांगतो' म्हटले. मी गप्प राहिलो; तर दुसऱ्या दिवशी सकाळी मी घरात नसताना हा दारू पिऊन घरात घुसला. मला आठ मुली, एकुलता एक मुलगा. तर हा त्यांच्या अंगावर धावला. माझ्या पोरी घाबरल्या. घरात पुरुषमाणूस कुणी नाही. हा सीताराम जनावर झालेला. बाजूला एवढे लोक सगळे आडनावाने घाटगेच. ते नुसते उभ्या जागी राहून गंमत पाहात–'जाऊ दे सीताराम, चल परत–' म्हणत. पण पुढे येऊन त्याला आवरीनात. पोरी रडायला लागल्या. एवढ्यात धाकट्या पोरीला युक्ती सुचली. माझा एक दांडगा कुत्रा आहे...'

मास्तर उठतात. 'बसा–' खूण करत शेजारच्या खोलीत जातात. चहाच्या कपबशा आणून ठेवतात. अन् पट्टा धरून एका गावठी पण तगड्या कुत्र्याला घेऊन येतात.
आम्ही मघा आलो तेव्हा हाच भुंकत होता.
'हं—'

'तर हा कुत्रा आत बांधलेला होता. तो बाहेरचा गोंधळ ऐकून आत भुंकत होता. पोरीने वेळ राखून त्याला सोडला. तशी तो तीरासारखा बाहेर आला. पोरावर सीतारामने हात टाकलेला पाहून चवताळून झेपावला. सीताराम घाबरला. कुत्र्याने धरलेले धोतर सोडून पळाला. तरी त्याची जिगर गेली नाही. त्याने शाळेत येऊन पोरांसमोर मला शिव्या द्यायला सुरुवात केली, ' धेडपटा, तुला कुणी हेडमास्तर केला ?' वगैरे...मला गचांडी धरून त्याने गावासमोर फडाफडा मारले. अखेर पोरांनी सोडवले. मी पोलिस-कंपलेन्ट केली तशी गावकरी एक झाले. सगळा गाव घाटग्यांचा. सगळेच एकमेकांचे भाऊबंद. ' धेडपट आपल्या-वर केस टाकतो म्हणजे काय ?' मी हरिजन ॲक्ट लावायची मागणी केली. सीतारामला तक्रार नोंदवून लगेच गावाने जामिनावर सोडवून आणले. फौजदार रजपूत होते. त्यांना घाटग्यांनी चहापाणी केले तशी ते पालटले. आधी ' सीतारामला खडी फोडायला पाठविण्या 'ची भाषा करणारे फौजदार खडीसाखरी भाषेत बोलायला लागले ! वर मलाच ' कशाला गावाशी वैर घेता ? शिव्या दिल्या तर काय अंगाला भोके पडतात काय ? ' म्हणायला लागले. ' तुम्हांला दोन मारल्या; मी तुमच्या साक्षीने सीतारामला दहा मारतो. मग तर झाले !' म्हणाले. तशी मी टास्क-फोर्सचे डी. वाय्. एस्. पी. केंकरे यांना कळवले. त्यांनी फिर्याद भरायला लावली. आधी फौजदार रजपूतला वश केला, तेव्हा सगळे घाटगे मला ' काय धेडपट उपटतो...' म्हणून खिजवत; पण फिर्याद झाल्यावर त्यांनी वेगळाच पवित्रा घेतला.'

साळवे गुरुजी एकाएकी व्याकुळ स्वरात दबल्या आवाजात म्हणतात, "साहेब, मी फिर्याद करायला लावली. मला काय साला–भडवा म्हणाला असता तर मी ऐकून घेतले असते, पण धेडपट म्हणाला ! माझी जात काढलीन, जातीची इज्जत काढली. ते मला आवडले नाही. पण आता अवघड जातेय. सगळे घाटगे एक. इथे दहाजण भेटले तर नऊ घाटगे निघतात ! एरवी यांची आपसात इतकी भाऊबंदकी आहे की सख्खा भाऊ सख्ख्या भावाच्या उरावर बसतो. रोजची यांची

भांडणे न् मारामाऱ्या आहेत. पण जातीचा प्रश्न निघाला की सगळे एक ! फिर्याद झाल्यापासून सगळा गाव 'खाऊ का गिळू' नजरेने बघतो. पाण्यात राहून माश्याशी वैर झालेय. त्या सीतारामाबद्दल कुणाला प्रेम नाही, पण 'धेडपट मराठ्यावर फिर्याद करते' याचाच राग आहे. माझा एकुलता एक पोरगा. त्याला घराबाहेर पाठवायला मन घेत नाही. पोरीसोरी एकट्या बाहेर पडायला घाबरतात. हे वैर निभावणे मुश्किल होतेय, साहेब. ही फिर्याद मी जिंकेनही, पण इथे राहून नाही. माझी बदली मागतोय. तुम्ही जरा त्यात लक्ष घाला. या गावातून बाहेर पडल्याशिवाय या गावाविरुद्धची झुंज मी लढवू शकत नाही. नाही तर मांडवळ करा. माझी तयारी आहे. तुम्ही सीतारामकडून लेखी घ्या. दंड करा. मी फिर्याद मागे घेतो. हे लोक माझा काटा काढतील. तशी ही फार भेकड, पण फार क्रूर ! फिर्याद झाल्यापासून हैराण आहेत. घाबरलेत. तोंडावर माझी छेड काढत नाहीत. पण मी दिसलो तरी त्यांच्या कपाळी आठी पडते. गावाला साळवे मास्तरची 'मुळव्याध' झालीय म्हणतात.'

साळवे गुरुजींकडून सुन्न होऊन बाहेर पडतो.

आम्ही सीतारामला कुठे शोधावे असा विचार करत असताना सीतारामच आमचा माग काढत येऊन पोचतो. हातात उंच काठी. खांद्यावर कांबळे. डोक्याला मुंडासे. काळा बावळा चेहरा.
तोंडाला जबर दारूचा भपकारा येतोय. पण एकूण शुद्ध सांभाळून आहे.

'नमस्कार साहेब. मी शिताराम. मास्तरच्या प्रकरणात माझ्यावर आळ आहे.'
मी त्याला घेऊन आडवाटेला निघतो.
तो गुमान कान पाडून शेपूट घालून येणाऱ्या भिजलेल्या कुत्र्यासारखा मागून येत राहतो.
चालताना काठीचा आधार घेऊन किंचित रखडत.

गावापासून किंचित दूर आल्यावर तो म्हणतो, ' साहेब, इथे बसायचे.'
' हरकत नाही.'
बसता बसता मी त्याचा अदमास घेतो. ताकदीने तो तसा सामान्य वाटतो. डोळ्यांत बेरकीपणापेक्षा बावळटपणाच अधिक. गावगुंडांपैकी वाटत नाही. तो क्षणभर खुळ्यागत पाहात राहतो. मग स्वत:च बोलायला लागतो, ' साहेब, तांब्या सांडला बघा. आता काय करावे ते तुम्हीच सांगा.'

मला त्याच्या बोलण्याचा अर्थ उमगत नाही. मी गोंधळून म्हणतो, ' कसला तांब्या सांडला ? माझ्या लक्षात नाही आले.'
तो कांबळे बाजूला ठेवतो. आपल्याच तारेत असलेल्या माणसाने स्वत:शीच बोलत हातवारे करावे तसे हातवारे करीत म्हणतो, ' असा तांब्या ठेवला का... ठेवला... तो पाण्याने भरला का ?... भरला... त्याला धक्का लागला अन् समदे पाणी जमिनीवर सांडले का... तर चुकी झाली, पण आता पाणी परत कसे भरावे ?'

माझी टय़ूब लागते.
' तुझे चुकले हे कबूल ?'
' जी कबूल. एकदम कबूल. तुम्ही मायबाप आहात. एकवार माफी करा.'
' मग शिव्या कशाला दिल्या ?'
' त्या लोकांनी दारू पाजली. माझे डोके चढले. मास्तर आडवा आला तर तोच सापडला.'
' गावात एवढे लोक होते त्यांत तुला मास्तरच फक्त बरे सापडले शिव्या द्यायला ? तू त्यांना धेडपट म्हणालास,–काय ? खरे की नाही ?'

तो परत बापुडवाणा चेहरा करत म्हणतो, ' ते काय समजून नाही झाले. डोक्यात नशा झाली. आपले आपल्याला कुठे कळतेय काय बोललो ? डोक्यात संघटन राहाते ते एकदम बोलून गेले.'

'संघटन? कसले सघटन?'

'हेच की. संघटन. गावातले लोक बोलतात का– की ह्यो मास्तर घेडपट आपल्यावर दाब दाखवतो. लई ताठा करतो.– ते संघटन डोक्यात राहिले. मास्तर दिसला तर बाहिर पडले. दारूमुळे घडले, नाहीं तर मी काय मास्तरांच्या वाकड्यात नव्हतो. अद्याप नाही.– इचारून घ्या त्यांना.'

'आणि तरी आत्ता परत दारू पिऊन आलास...'

'मुद्दाम नाही प्यायलो, साहेब.'

'मग?'

'सवय पडली. आपला इलाज चालतो का?'

सीतारामचे तर्कशास्त्र सगळेच अजब. रात्री बैठकीला यायला सांगून मी परततो.

गावात स्मशाने वेगवेगळी असतात. पाणवठा एक नसतो. दलितांना वेगळी विहीर. महारवाड्यातल्या मुलांना शाळेत साळवे मास्तर येण्यापूर्वी सगळ्यांत मागे दाराशी बसवत असत. आता इतर मुले वेगळीच बसतात; पण दलित मुलांना वेगळी रांग आहे ती मात्र आता फळ्यापासून सुरू होते.

इथे आणखी एक अनुभव. दिलीप–सुधीर एका लेकुरवाळ्या बाईपाशी जातात. चारपाच पोरांची सर्कस एका वेळी सांभाळत ती अवघड पोटाने काम करीत असते. सुधीर तिला पाणवठ्याबद्दल विचारतो, तर ती वस्‌कन् ओरडते, "बायामाणसाला कशाला इचारता? तिकडे साळेत बाप्ये बसलेत त्येन्ला इचारा. आम्हाला नाही माहित पानवठा न् बिनवठा.'

सुधीर–दिलीप हिरमुसतात.

संध्याकाळी शंभर–दीडशे गावकरी जमतात. पाल्हाळ झाल्यावर साळवे गुरुजींचे प्रकरण निघते. लोक गप्प होतात.

प्रभाकरकाका उठतात. सांगतात,– 'सीतारामची केस कोर्टात गेल्यावर

दोन महिने तपास का झाला नाही, सरपंच पोलिसपाटील काय करत होते असा प्रश्न निघणार, तुमचाच भाऊबंद म्हटल्यावर तो तर जाईलच, पण तुम्हीही अडकाल. गावाची बदनामी होईल. तेव्हा अंग झटकून सरू नका.'

'पण त्ये दारू पिऊन श्यागाळी करते. त्याला आम्ही काय करावे ?' सरपंच म्हणतात.

तशी सीताराम उभा राहतो. खवळून ओरडतो, 'मी दारू पितो न् तुमी काय पानी पिता होय ? काय साहेब, उगा ऐकून घ्यावे काय! समदा गाव दारू पितो, ह्ये गावगुंडी करतात, त्यांना कोन आडवते का ? मी मास्तरांना धेडपट म्हनलो. चुकी झाली. पण ह्यांना विचारा की ते नाही म्हणत कधी ?' सीतारामची दारू भलतीच तेज.

'मास्तरने शपथ घेऊन सांगावे, सरपंच त्यांना कधी तोंडावर धेडपट नाही म्हनले ? आम्ही गरीब पडलो म्हणून कुणीबी रगडावे का ? सरपंचाने मास्तरना जोडा दाखवला होता. 'च्याऽयचं धेडगं' म्हनून गावासमोर शिव्या दिल्या त्या टायमाला नाही कोर्ट केले ? आत्ता मी गरीब तर मलाच धरले ?'

आणि सीताराम रडायला लागतो.

हा आणखी एक पेच.

'सीताराम, मी दारू पिणार नाही अशी शपथ घेतोस ?'

तो घुटमळतो. मग 'चला' म्हणतो. समोर मारुतीची मूर्ती असते. मी त्याला घेऊन जातो. तो पायरीला शिवायला वाकतो; इतक्यात परत ताठ उभा होतो. 'नाही साहेब, जमायचे नाही.'

'काय ?'

'हे अवघड हाय.'

'का बरे ?'

'शपथ घेतली का ती पाळायला पाहिजे. आपल्याच्याने दारू सुटायची नाही. उगा देवाशी खेळ नको.'

तो माझ्या बोलण्याची वाट न पाहता तडक निघतो. सभेत जाऊन बसतो. सभेत कुजबुज.

सीतारामने दोनशे एकावन्न रुपये दंड म्हणून गावच्या हरिजन चावडीला द्यावे, आणि मास्तरांनी फिर्याद मागे घ्यावी, असा निर्णय आम्ही देतो.
सीताराम कबूल होतो. तक्रारीबाबत तडजोड झाल्याने फिर्याद मागे घ्यावी अशा आशयाचे कागदपत्र आम्ही सही करून घेतो. दंड वसूल करून हरिजन चावडीसाठी सरपंचांच्या हवाली करतो.

आमच्या दिंडीतले वसंतराव एडके कीर्तनकार! रात्री कीर्तनाला तुफान गर्दी झालेली असते. कीर्तन रंगात आलेले असते. एडके 'सर्व जातींच्या संतांना विठ्ठलाने जवळ कसे घेतले' इत्यादी सांगत असतात. मध्येच ते श्रोत्यांना प्रश्न विचारतात, 'चांभार–महार असून संतांना देवाने जवळ केले. मग आपण का दूर ठेवायचे?' तशी एक म्हातारा सर्वांना ऐकू जाईल अशा सुरात म्हणतो, 'ते चांभार म्हार असले तरी शुद्ध होते. संत होते. त्येंचे वेगळे ह्येंचे वेगळे.' आम्ही स्तिमित होऊन पाहात राहतो.

मास्तर निघताना गहिवरून हातांत हात मिळवतात. म्हणतात, 'तेवढे बदलीचे जमवून घ्या.'

गाडीत झाल्या घटनांवर चर्चा चालू असते.
प्रभाकरकाका मध्येच म्हणतात, 'आता आपण निघालो आहोत त्या तिखोलला वीस वर्षांपूर्वी दादासाहेब रुपवत्यांच्याच जिवावर बेतले होते. प्रेमानंद तीन-चार वर्षांचा असेल त्या वेळी. निमित्त लग्नाच्या मिरवणुकीचे झाले, पण थोडक्यात कत्तल व्हायची टळली.
आम्ही श्वास रोखून ऐकत असतो, प्रभाकरकाका तिखोलची ती अंगावर शहारे आणणारी आठवण सांगू लागतात.

## प्रकरण चौथे

# ह्यो कसला द्येव– निस्ता दगड !

प्रभाकरकाका सांगत असतात... तिखोल. हजार-बाराशे वस्तीचे गाव. शेजारून नदी वाहते. गावातले लोक क्रमाने पाणी भरतात. सगळयात वरच्या बाजूला मराठे, मग इतर. शेवटी गाई–म्हशी धुवायची जागा. त्याखाली सगळयात शेवटी दलितांचा पाणवठा. नदीला दोन उतार, तर त्यांतल्या वरच्या अंगाच्या उताराने महारा–मांगांनी नदी ओलांडायलाही पूर्वी बंदी होती.

उन्हाळयात वाळू उकरून झिरे काढावे लागतात, तर तेही गावाच्या हद्दीबाहेर महारामांगांनी उकरावेत अशी अपेक्षा.
अनाजी साळव्यांच्या मुलाचे लग्न होते. अनाजींना खूप हौस. उत्साह. थोडाफार पैसा गाठीला, आणि पत कर्जाला होती. कर्ज काढले. लग्न थाटले. सगळे भाऊबंद बोलावले. पाहुणे-रावणे जमवले.

लग्न थाटात झाले. नवऱ्यामुलीला घेऊन वरात निघाली. लग्नसोहळा परगावी झाला होता. वरात वेशीपाशी पोचली. वेशीतून वरात महारवाडयाकडे वाजतगाजत जायची होती. वेशीपाशी अख्खा गाव गोळा झालेला. हातात काठया–भाले–कुऱ्हाडी ! गावचे पुढारी सरसावले. 'म्हारडयांनो ! फार माज आला काय ?' 'गावाच्या उरावरून मुद्दाम मिरवणूक नेता काय ?' 'गावाचे नाक खाली करतात.' म्हणत गावकऱ्यांनी मिरवणुकीला वेढा घातला. गावकरी भयंकर संतापले होते. अनाजीसारख्या एका वस्तीवरल्या महाराने गावातून मिरवणूक काढून मिरवावे, याची त्यांना मनस्वी चीड आली होती ! मिरवण्याचा–

अगदी नवरदेवच नव्हे तर मढीसुद्धा मिरवण्याचा— हक्क फक्त वेशीच्या आतल्यांना होता. वेशीबाहेरच्या माणसांनी घोड्यावर बसावे, बँड लावावा म्हणजे गावाचा अपमान!

गावकरी चिडले.

एका महार नवरदेवाने बँड वाजवीत मिरवणूक काढली. या गुन्ह्यासाठी तिखोलचे गावकरी मृत्युदंड घेऊन उभे झाले. निकराला येऊन लोक एकमेकांना भिडले. 'आमच्या मुडद्यांवरून मिरवणूक आत जाईल!' असे म्हणत सवर्ण हातघाईवर आले; तर 'मेलो तरी बेहत्तर' म्हणत दलितांनी प्रतिकारास प्रारंभ केला. दोन्ही पक्ष तुल्यबळ ठरले. शस्त्रांनी सवर्ण समर्थ ठरले तर शारीरिक बळाच्या जोरावर साळव्यांच्या वऱ्हाड्यांनी प्रखर झुंज दिली.

सैन्याने लढत लढत आगेकूच करावी तसे मारामारी करत घाव सोसत, प्रतिकार करत साळव्यांची वरात पुढे सरकू लागली. जगात अशी वरात कुठे निघाली नसेल! नवरा-नवरी, लहान मुले, तान्हुली घेऊन निघालेल्या आयाबहिणी, म्हाताऱ्या-कोताऱ्या, यांना मध्ये गोलात घेऊन चारी बाजूंनी साळव्यांचे वऱ्हाडी पुरुष निकराने झुंजत होते. वेशीत शिरताना पाऊस पडावा तसे दगड पडले. तान्हुल्यांना उराशी कवटाळून आयाबायांनी पोरांना घट्ट धरले. पाठीवर, पोटावर डोक्यावर, साऱ्या अंगावर दगडांचा वर्षाव होत होता. वरात पुढे सरकत होती, साळव्यांनी जिद्द केली. अशी झुंजवत, तीळ तीळ सरकत, दगड सोसत, वार झेलत लग्नाची अख्खी वरात ते वेशीपार गावातून पलीकडे महारवाड्यात घेऊन गेले.

गावकऱ्यांच्या छाताडावर आपले रक्तबंबाळ पाऊल रोवून महारवाड्याच्या नवरीने गृहप्रवेश केला... तेच हे तिखोल.

आम्ही दचकून समोर पाहतो.

एका नदीच्या पात्रांतून मोटर जात असते.

समोरच्या कडा तुटलेल्या टेकडीवर छोटया छोटया घरांच्या पुढे उभे राहून गावकरी वाट पाहात असतात.

मोटर थांबते.

आम्ही चावडीत जाऊन बसतो. मुले गावात पाहणीसाठी पांगतात. मी आणि प्रेमानंद सभेला सुरुवात करतो. औपचारिक गप्पा, ओळख होते. चहा होतो. इतक्यात दिलीप येतो. म्हणतो, 'आठ दिवसांपूर्वी इथे एका टग्याने एका चांभाराच्या मुलीला मारले अन् ते प्रकरण पोलिसपाटलाने दाबून ठेवलेय."

एव्हाना गावकऱ्यांनी 'आपल्या गावात सगळे काही आलबेल असल्याचे, पाणवठा एक असल्या'चे सांगितलेले असते.

आम्ही गावकऱ्यांशी 'संवाद' सुरू करतो.

'तुमच्या गावात काही तक्रार नाही ?'

'छ्या ! अजिबात नाही. ते जुने वरातीचे प्रकर्ण आता कुणाच्या ध्येनात बी नाही. आता समदी एकोप्याने राह्यलीत.'

'भिकुबाई हरिभाऊ कांबळी या बाईला ओळखता ?'

गावकरी अस्वस्थ !

'ते काय– किरकोळ प्रकरण आहे.'

'किरकोळ कसे ? तुमच्या गावातला शंकरजी चिमाजी ठाणगे नावाचा माणूस तिला विनाकारण मारतो, आणि तुम्ही गप्प कसे बसता ?'

'त्यांचा आपसातला झगडा हाय त्यो !'

'उगा भलते बोलू नका. तिने चपलाचे पैसे मागितले म्हणून त्याने 'मला पैसे मागती का ?' म्हणून तिला गावासमोर बडवले.'

'तो माणूसच तसला आहे बघा. कुणाला ऐकत नाही. दारू पिऊन समद्यांना छळतो.'

'मग गावात काय– कोण पुरुष नाही काय ? तुमच्या आया– बहिणींवर गावचा टग्या हात टाकतो अन् तुम्ही शांत राहता ?'

'तो कुणाचे ऐकणाऱ्यांतला नाही.'
'पोलिसपाटील आहेत का ?'
'हां, मी.' पोलिसपाटील बसल्या जागून पुढे सरकतात.
'तुमच्याकडे तिच्या बापाने तक्रार केली होती का ?'
'हा... तोंडी म्हणाला, की बुवा, असे असे झाले.'
'तुम्ही नोंदवली का तक्रार ?'
'काय एवढे गंभीर वाटले नाही. गावात झगडे होतातच. परत मिटून जातात.'
'पण त्याने तरण्या बाईवर हात टाकला. मराठ्याच्या एखाद्या बाईला एखाद्या चांभाराने तोंडात हाणली असती तर गावाने त्याला जिवंत ठेवला असता का ? का बाईची जात पाहून तिच्या अब्रूला मोजता ?'
'तिचा बाप आलाय इथे.'
'कोण ?'
'साहेब, माझीच पोरगी आहे. माहेरपणाला आलेली.' एक तांबुस गोरा सुरकतलेल्या चेहऱ्याचा म्हातारा उठून उभा राहतो.
'तक्रार केलीत का ?'
'ह्येनला बोललो, पण त्येंनी काही दखल घेतली नाही.'
पोलिसपाटील वैतागून पाहतात.
'तू लिहून दिली होतीस का ? असे तोंडी बोलून सरकारी कामे होतात होय ?'
'आम्हांला काय लिहिणे येते का काय ?'
'पाटील, तुम्ही का लिहून नाही घेतली ?'
'ती त्यांनीच द्यावी लागते.'
दिलीप म्हणतो, 'हरकत नाही. आता लिहून घ्या.'
'तक्रार द्यायची का ?' परत पोलिसपाटील विचारतात.
'तुमची विच्छा असली तर द्या, नाही तर राहिले.' म्हातारा खाली बसतो.

कावरे नावाचा तरुण उभा राहतो. दौऱ्यात स्वतःहून पुढाकार घेऊन 'शब्द' देणारा पहिला तरुण.

रामचंद्र गणपत कावरे. उंचीने गंमत वाटावी इतका बुटका. वयाने पंचवीशीचा. खूप तरतरीत. बोलायला चटपटीत.

तो म्हणतो, 'आपण गावाची इज्जत राखायची म्हणून खोटे बोललो. आलेले तरुण पण सगळेच खरे बोलले असतील असे नाही. पण असलेल्या भानगडी लपवून गावाची इज्जत राखण्यात मतलब नाही. आपला पाणवठा, स्मशान एक नाही. देवळात हरिजन जात नाहीत. खोटे कशाला सांगा! पण आम्ही गावात यापुढे असे होऊ देणार नाही. चांभाराच्या मुलीला मारले ते प्रकरण आम्ही इथले तरुण तडीला नेऊ. आज हे पाहुणे म्हणतील त्या देवळात हरिजनांना आम्ही घेऊन जाऊ.'

आम्ही चकित. आनंदित.

आम्ही सगळे त्याला एकीकडे घेतो. तो म्हणतो, 'मला तुमचा मुद्दा पटला. आम्ही गावात प्रयत्न करू.'

समोरच मारुतीचे देऊळ असते.

कावरे म्हणतो, 'सभेत आलेत त्या हरिजनांना घेऊन आपण मारुतीच्या देवळात जाऊ या चला.'

आम्ही देवळापाशी जातो.

कोंडिबा करडे नावाचा वृद्ध गृहस्थ बाजूलाच उभा राहतो.

'चला आजोबा, तुम्ही नाही येत?'

मघा महारवाड्यावरून आलेल्या लोकांत त्यांना पाहिलेले; म्हणून त्यांचे बाहेर बाजूला उभे राहणे लक्षात येते.

'नाही.'

'चला की, घाबरायचे कारण नाही.'

'कोन घाबरतो आन् काय म्हणून?'

'मग येत का नाही?'

'त्या दगडात काय ठिवलेय आपले? मानसाच्या पाया पडायला सांगा, एक डाव सोडून धा डाव पडतो. पण ह्या दगडाने काय दिले आपल्याला? त्याचे काय घेणे लागतो का देणे लागतो?

आपन देवळात जात नाही. आपल्याशी बोलतो, आपले करतो त्यो देव खरा. बाकी नुसता दगड न् शेंदूर !'

आम्ही पाहातच राहतो. मी मारुतीकडे पाठ करून कोंडीबा करडेला नमस्कार करतो.

तर कळसला एक नवी तक्रार ऐकू येते.
रेशन आल्यावर गावातले लोकच आधी घेतात, महारवाड्यावरच्या लोकांचा लायनीत नंबर कुठलाही असला तरी 'मागाहून या' असे सांगतात. साखर वेशीबाहेरच्या लोकांना कधीच मिळत नाही. संपलेली असते. किंवा खोटेच 'नाही' सांगतात.

गावात कोणतेही वर्तमानपत्र येत नाही. काल कळसलाही कुणाकडे नव्हते. अगदी कावरेसुद्धा ढाकळी ढोकेश्वरला गेल्यावर हॉटेलात वाचतो तेवढेच. रेडियो, ट्रॅन्झिस्टर दोघातिघांकडे आहेत.
एस्. एस्. सी.पर्यंत पोचलेली मुले दोनतीनच आहेत. मुलगी पाचवीच्या पुढे गेलेली कुणी नाही.
शाळेसाठी पाचवीच्या पुढली मुले रोज टाकळी ढोकेश्वरला जातात. टाकळी इथून पाच मैल आहे.

तिखोलचा मुक्काम हालतो.
गाडी टाकळी ढोकेश्वरला जाते.
योगायोगाने तिथे पंचायत ऑफिसात तिखोलच्या वरात प्रकरणातले अनाजी साळवे अन् त्यांचा 'तो' नवरदेव मुलगाच भेटतात. ते परत 'ती' कथा ऐकवतात. म्हणतात, 'तुम्ही कुठे पिंपळनेरला जाणार ना ? तिथे तर दरवर्षी जत्रा होते. जत्रेला बाकी सगळे आत जातात, पण दलितांपैकी कुणी नाही. ते सगळे पायरीला हात लावून परततात. तरी शंका नको म्हणून दरवर्षी जत्रेच्या दुसऱ्या दिवशी सगळे देऊळ गोमूत्राने धुवून काढतात.'

गाडी पिंपळनेरकडे जात असते. विचारमग्न होऊन मी प्रभाकरकाकांना म्हणतो, 'काका, सवर्णांकडून होणाऱ्या अन्याय-अत्याचारामागे जसा स्वार्थ, राजकारण, अहंकार असतो, तशीच प्रामाणिक अंधश्रद्धाही आहे.'

'प्रश्नच नाही. देवळात महार-मांगांना विरोध अगदी धर्मासाठीच असतो. तुला एक भयानक उदाहरण या अंधश्रद्धेच्या परिणामाचे सांगतो.

१९७३ साली दुष्काळ पडला तेव्हा घडलेली गोष्ट.

जातेगाव नावाच्या नगर जिल्ह्यातल्या गावी घडलेली.

जातेगावच्या गाई-म्हशींवर एक विचित्र रोग आला. पाहता-पाहता जनावरे मलूल व्हायची आणि मान टाकायची. साथीचा रोग. दोन दिवसांत पंचवीस-तीस जनावरे आटपली. लोक चिंतेत पडले. माणसाला डॉक्टर ठाऊक नाही. तर जनावराला कुठला आलाय? लोकांनी देवऋषी आणला. देवऋष्याचे महारा-मांगांशी कुठल्या जन्माचे वैर होते देव जाणे! त्याने सांगितले, महार-मांगांकडून नाही तर विटाळशी बाईकडून देवाला बाट झालाय. मी तोडगा सांगतो. देवऋष्याने एक भला मोठा लाल भोपळा घेतला अन् मंत्रून वेशीवर मधोमध टांगून ठेवला; अन् सांगितले की, या तोडग्याखालून गावातल्या कुणा बाईने किंवा अस्पृश्याने आत-बाहेर जायचे नाही. झाले. गावातल्या बायका गावात राहिल्या. त्यांचे अडले नाही. पण महारवाड्याचे मरण ओढवले. विहीर वेशीच्या आत. दुकाने, शाळा, बाजार, गिरणी, इतकेच कशाला अनेकांची मोल-मजुरी वेशीच्या आत अडकली. गावकरी आत येऊ देईनात. उभ्या महारवाड्यावर बहिष्कार पडल्यासारखे झाले. पाणी आणायला पाच मैलांवर दुसऱ्या गावी जायची वेळ आली. उपाशी अन्नपाण्यावाचून महारवाडा तडफडायला लागला. अस्पृश्यांपैकी कुणी तालुक्याला जाऊन कंप्लेन्ट करील व पोलिस येऊन तोडगा काढून टाकतील, म्हणून गावकऱ्यांनी महारवाड्याभोवती पहारा बसवला. त्यांना बाहेर पडू देईनात की अन्नपाणी

देईनात. अखेर एकजण निसटलाच. रात्री डोळा चुकवून पळाला तो थेट नगरला आला. मग दादासाहेब रुपवते, आर. डी. पवार वगैरे मंडळी स्वतः जातेगावला गेली, लोकांची समजूत काढली, आणि वेशीवरचा तोडगा काढून कोंडी उठवली. तरी गावकऱ्यांचा विश्वास बसत नव्हता. अखेर थोडा पोलिस बंदोबस्त गावात ठेवला नि प्रकरण मिटवले. अर्थात निवडणूक किंवा राजकारणामुळेही हा वाद पेटतो याची उदाहरणे आपल्याला पाहायला मिळणार आहेत.

'उद्या आपण कुठे ?' 'उद्या पिंपळनेरला. वारकरी संत निळोबारायाच्या देवळापाशी जाणार आहोत.'

'म्हणजे तेच का... जत्रेनंतर गोमूत्राने धुवून घेतात ते...'

'होय, तेच.'

'मग आपला मंदिरप्रवेश कसा पचायचा ?'

'बघू या काय होते ते.'

आम्ही पिंपळनेरकडे जात असतो. निळोबारायाच्या संतपणाचे कोणते अवशेष पिंपळनेरच्या जनतेने जपलेत कोण जाणे– असा विचार करत आम्ही समोर मावळणाऱ्या सूर्याकडे पाहात राहतो.

प्रकरण पाचवे

# इडापिडा महाराला....

पिंपळनेरला पोचतो. मुंबईहून दादाही आलेले. उतरताच थेट वेशी-बाहेर जातो. मागोमाग सगळेच गावकरी येतात. दादा हात जोडून म्हणतात, 'हो; गावकरी मंडळी, इथेच थांबा. तुमच्या चुगल्या ऐकायला आम्ही बौद्ध वाडयात जातोय असे नाही. पण तुम्ही असला तर मोकळेपणे त्यांना बोलता यायचे नाही.'

अनिच्छेने गावकरी जागीच घुटमळतात.

'आम्ही काय खातो का ? ' वगैरे पुटपुट ऐकू येते.

पिंपळनेरचे सरपंच बौद्ध असल्याचे ऐकून आश्चर्याचा गोड धक्का बसतो !

हे कसे घडले ?

गावात दोन तट आहेत. दोन्ही जोरकस. त्यांच्या भांडणात सरपंच कुणी व्हायचे हे निकराला आले. दोन्ही गटांनी शह-प्रतिशहात 'गावा-तला कुणीच नको ' या धोरणात राखीव जागेवरून निवडून आलेल्या बौद्धालाच सरपंच केला. पण सरपंचांची स्थिती मोठी अवघड झालीय. दोन गटांच्या रस्सीखेचीत त्यांचा गळा आवळला गेलाय. कुणाच्याही-कडून वागले तरी मरणच. इकडे आड, तिकडे विहीर. सरपंच जीव मुठीत धरून घाबरूनच असतात. सरपंच समोर येतात. महारवाडयाला आता धर्मान्तरित बौद्ध कटाक्षाने बौद्धवाडा म्हणतात. येणारा बसणारा दादांना 'जय भीम' म्हणून खाली बसतो. मध्येच एकजण 'जय ख्रिस्त ' म्हणून बसतो. काही ठिकाणी ख्रिश्चन झालेले महार आहेत, त्यांपैकी हे असावेत. पुरुषमंडळी जमतात. बायामाणसे दूर मागे घराच्या आडोशाने उभी असतात. दादा त्यांना पुढे येऊन

‘ बाहेरच भेटतात सारी.’
‘ यापूर्वी कुणी पाणवठा एक करा किंवा समता ठेवा वगैरे सांगायला आले होते का कधी ?’
‘ नाही. पहिल्या डावाला तुम्हीच आले बघा.’
‘ बाबा आढाव नाव ऐकलेय का ? ’
‘ नाही. काय करत्यात ते ? ’
‘ ते हेच सांगत सगळीकडे फिरतात.’

‘ काँग्रेसवाले, आणखी कुणी पार्टीवाले नाही येत का कधी ? ’
‘ इलेक्शनच्या टायमाला मोप येतात की.’
‘ मग त्यांच्यापैकी कधी कुणी सांगत नाही का असे ?’
‘ ते फक्त मते द्यायला सांगतात.’

‘ दलित पँथर हे नाव ऐकलेय का ? ’
‘ नाव ऐकलेय, पन इकडे त्यातले काही नाही. ते सगळे शहरातले. इथे फक्त निळी टोपी नाही तर पांढरी टोपी. थोड्या लाल टोप्या पन आमच्या भागाला आहेत.’
‘ तुमच्या बौद्धवाड्यात सातवी पास झालेली कुणी मुलगी आहे का?’
‘ नाही. चौथीला यंदा एक आहे. पोरेच शाळेला जाईनात. पोरी कुठल्या जायला ! ’
‘ तुमच्यापैकी कुणी कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केलीय का ?’
‘ कार्डावर रेशनच देत नाहीत ना ? करावीच लागते. तरी पण थोडे लोक आहेतच अजून.’
‘ चारपेक्षा जास्त मुले आहेत का कुणाला ?’
, तेवढी तर समद्यांनाच असत्यात.’

बौद्धवाड्यावरची चर्चा संपवून आम्ही गावात परततो. निघताना लोक कसल्या कसल्या अर्जांची भेंडोळीच्या भेंडोळी दादांच्या हातांत देतात. दादांकडून घेऊन मी पाहतो: भूमिहीन म्हणून जमीन

मिळावी असेच अर्ज बहुतेक असतात. एक नोकरीसाठी असतो.

गावात मिरवणुकीची जोरदार तयारी झालेली असते.
गावकरी गॅसबत्त्या लावून लेझिम खेळत, गुलाल उधळत, ढोल-ताशे वाजवत छोटचाशा गावातून प्रत्येक गल्लीबोळातून बैलगाडीवरून दादांसह समता दिंडीच्या मुलांना फिरवतात. मुंगीच्या पावलाने सरकणाऱ्या त्या मिरवणुकीला निळोबारायाच्या देवळापाशी पोचायला तब्बल दीड तास लागतो. आम्हीच नव्हे अख्खा गाव गुलालाने रंगून निघतो. ह्या स्वागताने आम्ही चकित होतो. यात समता दिंडी-विषयीची आस्था, दादासाहेबांविषयीची आपुलकी आणि त्यांच्या मंत्रिपदाविषयी वाटणारा सहेतुक आदर यांचे प्रमाण किती व कसे आहे याच्या विचारात आम्ही बुडालेलो असतो.
निळोबारायाच्या देवळापाशी आम्ही पोचतो.
मंदिरप्रवेशासाठी उंबरठ्यावर पोचतो. पाच-सहा महार, बौद्ध, मातंग, वडारी समाजातील स्त्रिया हातांत फुले घेऊन आत शिरतात. मागोमाग इतर लोक. त्यांतली एक वयस्कर बाई ! पादुकांपाशी जाते, डोके ठेवते, आणि पाणावलेल्या डोळ्यांनी म्हणते, ' साहेब, केसं काळ्याची पांढरी झाली. अख्खा जन्म बाहेरून बघायचो. आत कसं असंल, आत कसं असंल-- असं वाटायचं. आज दर्शन झालं. फार बरं वाटलं बघा.'
ती डोळे पुसते.

त्यानंतर सभा सुरू होते.
दादांचे भाषण खूप हालवून जाते.
ते कांबळे हवालदाराची भयानक गोष्ट सांगतात. सीमेवर भारत-पाक युद्धात पराक्रमाबद्दल पदक मिळवणारा हा जवान सुट्टीवर गावी आला. त्याचा झकपक पोषाख, सफाईदार बोलणे आणि खाड्खाडे चालण्याची ऐट याने गावच्या सवर्णांची माथी भडकली. ' म्हारडं फार ऐट करते ' म्हणत त्यांनी त्याचा नक्षा उतरायची तजवीज केली.

उकरून भांडण काढले आणि अख्खा गाव जमवला. 'भडव्या, फार भाव खातोस; माजाला आलास का?' म्हणत जमलेल्या जमावाची विद्वेष, मत्सर, असूया इतकी पराकोटीला गेली की त्यांनी कांबळेला– सीमेवर स्वतःचं रक्त या देशाच्या रक्षणासाठी सांडणाऱ्या सैनिकाला– शिक्षा दिली. अघोरी शिक्षा! त्याला नग्न केला. त्याच्या म्हाताऱ्या आईला नग्न केली. आणि तिच्या मुलाला त्याच्याच आईवर गावादेखत धरून जबरदस्तीने घातला.

दादा एकामागून एक कहाण्या सांगत राहतात. काळजावुडी सुरुंग फुटत राहतात. गंगापूरच्या महार बायकांची छेड काढून वर त्यांनी प्रतिकार केला म्हणून खोटा आळ घेऊन नागवे करून गावभर दगड मारत काढलेली धिंड...
आंध्रमध्ये पाण्याला शिवले म्हणून ४० हरिजनांना एका झोपडीत कोंडून जिवंत जाळून टाकले ती गोष्ट...
एकामागून एक... मस्तक सुन्न होते. सभा संपते.

रात्री जेवायला नगरला पोचतो. जेवायला बसल्यावर घड्याळ पाहतो. चमकतो. शेजाऱ्याला विचारतो, 'वाजले किती?'
रात्रीचे तीन वाजलेले असतात.
सकाळी लवकर उठून चिभळे गावी पोचायचे असते.
मी झोपण्याचा प्रयत्न करत राहतो.
डास कानांत नि शब्द मनात गुणगुणत राहतात––
'इडा पिडा टळो, महारा–मांगांच्या बोकांडी बसो!'

## प्रकरण सहावे

# उजवा हात खायला डावा हात धुवायला.... तसेच जातीचे !

मुक्काम : चिंभळे.
तालुका : श्रीगोंदा.
जिल्हा : नगर

चिंभळे गावात प्रवेश करताना चाळवजा नागरी बैठकीच्या घरांमुळे वेगळेपणा जाणवतो. आतापर्यंत प्रत्येक खेड्याचे दर्शन तसे उदासवाणे असे. गावाभोवती सगळीकडे सुनेसुने रखरखीत वाटे. निसर्गाच्या हरित रमणीयतेचा मागमूसही कुठे नसतो. खूप वेळ गाडीबाहेर बघत बसले तर कंटाळा येतो. वाटेने माणसेही फारच तुरळक भेटतात. वाहनेही क्वचित. बहुधा धुळीने माखलेली एस्. टी.; क्वचित ऊस भरलेला ट्रक. गावातही रुक्ष उजाडपणा. पुष्कळशी घरे धाब्याची. मातीची. बरीचशी पडलेली. पडलेल्या, अवशेषित घरांची संख्या मोठी. नोकरीधंद्याच्या निमित्ताने गाव सोडून जाणारे लोक डागडुजीही करत नाहीत. बरेचसे लोक अलीकडे चोऱ्यामाऱ्यांमुळे शेतावरच घरे बांधून राहतात. त्यामुळे पण गावाचे कळाहीन चेहरे पाहवत नाहीत.

चिंभळ्याला दिसणाऱ्या चाळींचे कोडे लवकरच उलगडते. महाराष्ट्र सरकारचे एक बेगर्स होम तिथे आहे. सुपरिंटेंडेंट डेंगळे खुषीने आमचे स्वागत करतात. म्हणतात, ‘ बऱ्याच दिवसांनी माणसात आल्यासारखे वाटले. इथे म्हणजे अंदमानातच पडल्यासारखे वाटते ! काही

करमणूक नाही. कुणी भेटायला नाही. बोलायला नाही. गाव असा मागासलेला. बायकोबरोबर नुसते फिरायला बाहेर पडले तरी उभा गाव टकमक पाहायला लागतो. बायकोनेच वैतागून घराबाहेर पडणे सोडले. इथे टपाल आठवड्यातून एकदा येते, तर पेपर कुठला अन् काय कुठले ! सगळ्या खेड्यापाड्यांत फेकलेल्या सरकारी नोकरांची हीच रड आहे बघा.'

आम्ही बेगर्स होम पाहात असतो.

'या भिकाऱ्यांत दलित किती टक्के आहेत हो ?'

'बारा टक्के. महाराष्ट्रात बेगर्स होमची कपॅसिटी खूप आहे. पण लोकांना स्वतंत्रपणे भीक मागायलाच आवडते. इथे यायला तयार नसतात. आमच्या निम्म्या जागासुद्धा कधी भरत नाहीत. आणि जे येतात ते बहुतेक म्हातारे, लुळे-पांगळे, आंधळे असेच. त्यांतही जास्त अ-मराठीच. मद्रासकडले बरेच भिकारी चैनीत आमच्या इथे राहतात. आमचे महाराष्ट्रीय भिकारी रस्त्यावर भुके मरतात, पण इकडे वळत नाहीत.'

'यांना इथे कोण आणून सोडते ?'

'महाराष्ट्रात भिक्षाप्रतिबंधक कायद्याखाली अधूनमधून भिकाऱ्यांना पकडून पोलिस खटले भरतात. शिक्षा झाली की तेवढा काळ इथे येतात. पण त्यातसुद्धा पोलिसांना हप्ते देऊन पळणारेच पुष्कळ. कधी तरी सवडीने ह्याच बेगर्स होमसाठी या. इथला प्रत्येक भिकारी म्हणजे एक कादंबरीचा विषय आहे.'

डेंगळ्यांना घेऊनच आम्ही गावात शिरतो. कॉलनीपलीकडला गाव परत तसाच उजाड होता. दुपारचे ऊन भगभगत होते. गावातल्या दलितांची एक लेखी तक्रार प्रभाकरकाकांकडे आली होती.

ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये गेलो तर कुलूप. चार घरी फिरून पोलिसपाटलांना शोधले. त्यांनी सांगितले की, एस. टी. बंद असल्याने सध्या टपाल आठवड्यातून फक्त एकदाच येते. उद्या तुमचे पत्र मिळेल. त्यांनी चावडीवर नेले. चार पोरांना पाठवून गावात वर्दी

दिली. मोटरच्या आवाजाने कुतूहल चाळवून गावकरी निघतच होते.

अर्धा–पाऊण तास नुसता जमणाऱ्या माणसांचे चेहरेच बघण्यात गेला.

मग एकदम प्रकरणालाच हात घातला.

'बाबूराव गायकवाड कोण ?'

एक किलकिल्या डोळ्यांचा म्हातारा उभा राहिला.

'तुमच्या शेतातल्या विहिरीवर तुम्ही दलितांना पाणी का भरू देत नाही?'

'पाणी भरायचा काय प्रश्न नाही. वहिवाटीने त्यांचीच विहीर हाय; पन माझ्या शेताची नुस्कानी करत्यात यांची पोरेटोरे. बाया येता जाता माझी कणसे तोड,–मिरची खुड, रोपे उपट, असले करतात. म्हणून माझ्या शेताला तारेचे कुंपण घालून घेतले. हिरीच्या त्या अंगाला गवळ्याच्या वावरातून पोहरा टाकून पाणी भरायला मोप जागा आहे त्यांना.'

दलित मंडळींना येणार हे ठाऊक. ती तयारीनेच आली. इतक्या आक्रमक आणि संघटित पद्धतीने बौद्धवाडा भांडताना प्रथमच दिसतो.

'काय बाबूराव, केस पिकले, गळ्यात माळ घालता अन् खोटे बोलायला जिवाला कसे काही वाटत नाही ?'

बौद्ध वाड्यावरचे चार-पाचजण उठून एकदम प्रश्नांची सरबत्ती करीत असल्याचे अनोळखी– अनपेक्षित दृश्य.

'ह्या बुढ्ढ्याच्या बोलण्यावर जाऊ नका साहेब.'

'निपुत्रिकाची जमीन त्याने बळकावलीय; कुठे त्याचे स्वतःचे शेत आहे ? त्यांच्या भाऊबंदांतली विधवा मेली तर याने सरपंचाला खाऊ-पिऊ घालून नावावर करून घेतलीय.'

'गवळ्याच्या शेतातून आम्हांला पाणी भरायला अडचण हुतीय. आम्ही तुझ्या शेतातूनच भरणार. चार दिवसांनी कुंपण काढले नाही तर उपटून टाकू.'

'पाहा साहेब, पाहा कशी भाषा करतात. आमची जमीन अन् आम्हांलाच दाब टाकतात.'

'साहेब, ह्याच्या शेतातून आमचा वहिवाटीचा रस्ता आहे. तेवढा आम्हांला मिळाला पाहिजे.'
प्रभाकरकाका म्हणतात, 'आपण प्रत्यक्षच जाऊन विहीर पाहूया. कुणालाच अन्याय नको. काही वेळा आमच्याही लोकांना अतिशयोक्ती, कांगावखोरपणा करायची सवय असते. दबतोय म्हटल्यावर तेही दापटतात.'

आम्ही विहिरीवर पोचतो. बाबूराव गायकवाडही काही भोळाभाबडा नाही. वेगर्स होमचे डेंगळे वाटेतच त्याच्यावर उखडतात. वेगर्स होमच्या जमिनीला कोरून त्याने पाट काढलेला असतो. डेंगळे फावडे घेऊन त्याचा पाट मोडतात. 'पंचनामा करीन परत 'होम'ची जमीन कोरलीस तर!' सांगतात. बौद्धांना जोर येतो. ते बाबूरावने कुठे कुठे पाट काढताना वेगर्स होमच्या जमिनी कोरल्या आहेत ते उत्साहाने दाखवू लागतात. आम्ही विहीर पाहतो. बाबूरावने महारांच्या वहिवाटीच्या रस्त्यावर नांगरून पेरलेले असते. शिवाय कुंपण घालून रस्ता अडवलेला असतो. बाबूरावची चूक आम्ही त्याच्या पदरात घालतो. कुंपण हालवून पाच फूट रुंदीचा,– लग्न-समारंभाला पाण्याची बैलगाडी नेता येईल, येरवी जनावरे न्यायला सोयीचा होईल– असा रस्ता वहिवाटीला मान्य करून बौद्धांच्या ताब्यात दहा गुंठे जमिनीचा पट्टा रस्ता म्हणून द्यायचे कबूल करून घेतो. तशा कागदपत्रावर सगळ्यांच्या साक्षीने सह्या होतात. मामलेदाराला द्यायचा अर्ज तयार होतो.

इतक्यात शेजारच्या हंगेवाडीचे हेमराज धनराज भंडारी नावाचे सावकारी करणारे सरपंच येतात. गळ्यात जानवे. कानात भिकबाळी. तोंडावर देवीचे वण. चेहरा गुब्ब गोरा, पण बेरका. ते येण्याआत आम्ही केलेली कागदपत्रे पाहून त्यांना वाईट वाटते. 'च्यायला, तू पण यडाच आहे!' असे म्हणून बाबूरावला ते चिथवू पाहतात. सभेला सुरुवात होते. मध्येमध्येच ते काही तरी पुटपुटतात. हातवारे करतात.

त्यांना एकूण हवा मानवत नसावी. अखेर प्रेमानंदचा आणि त्यांचा डायरेक्ट खटकाच उडतो.

महार–मांग गलिच्छ राहतात म्हणून गाव त्यांना जवळ करत नाही, देवानेच चार वर्ण केले, हाताची सगळी बोटे कुठे सारखी असतात, वगैरे ते बोलतात. 'उजवा हात खायला नि डावा हात धुवायला, ही देवाची योजना, तसेच जातीचे आहे' हा त्यांचा युक्तिवाद ऐकून पोरे खवळतात. प्रेमानंद त्यांना झुंजवतो. अखेर ते 'तुम्हांला पटायचे नाही. तुमचे राजकारण त्यावरच चाललेय' वगैरे म्हणत उठून जातात.

इथे प्रदीपकुमार मेहता नावाचा गोरा गुटगुटीत, मस्त तब्येतीचा तरुण भेटतो. त्याने समाजसेवा तरुण मंडळ चालवलेले आहे. आठवड्यात त्यांनी श्रमदानाने पूल दुरुस्त केला. तो प्रेमानंदाला स्वतःहून गावात 'समता परिषद' वगैरे करू सांगतो. पत्ता स्वतःहून लिहून घेतो.

आम्ही त्याच्याचकडे जेवायला थांबतो. जेवून परत यायला निघतो.

सहज बौद्ध वस्तीवरल्या माणसाला प्रश्न करतो, 'तुमचा नवरदेव पारावर बसतो का देवळात जातो?'

'नाही. इथे बौद्ध किंवा बाहेरच्या लोकांच्या नवरदेवाला वेशीच्या आत मिरवत यायलाच परवानगी नाही. आमची लग्ने वेशीबाहेरूनच वळतात.'

प्रदीपला मी त्यात लक्ष घालायला सांगतो. तो म्हणतो, 'बौद्धवाड्यात पहिले लग्न जेव्हा होईल तेव्हा तुम्ही या. तुमच्यासकट मिरवणूक मी गावातून फिरवतो.'

मला प्रदीपचे कौतुक वाटते. म्हणतो, 'तुझ्यासारखा एकेक मुलगा जरी प्रत्येक गावात उभा राहिला तरी प्रश्न सुटायला येईल.'

'करून दाखवतो, मग बोला.'

सुधीर–दिलीपचा रोजचा उद्योग चालू असतो. लहान मुले जमवायची. त्यांना गाणी शिकवायची. गोष्टी सांगायच्या. मुंबईहून निघताना यशवंत चौधरींनी रंगीत कागद दिले होते. ब्लेडने केलेले त्याचे कसकसले आकार पाहताना पोरे हरखून नाचत असतात. प्रदीप दासगुप्ताला मराठी अवघड जाते. दगडऐवजी 'जगड' म्हणतो. आता तर त्याचे नावच 'जगड' पडलेय. तरी साऱ्या बोलण्याचा अर्थ समजून घेण्याची त्याची धडपड चालू आहे.

गावात सभा, गाणी, गोष्टी, भ्रमंती, चर्चा. गाव निदान वरवर तरी ढवळून निघतेय.

'आता अनिल, आपण एका गावगुंडाच्या गुहेत शिरणार आहोत.'

'गावगुंड ?'

'ग्रामीण दादागिरीचा अर्क. अगदी मराठी चित्रपटातले सगळे खलनायक फिके पडतील असा.'

'काय नाव ?'

'गुंगानाना. माजी दलित मंत्री बाबूराव भारस्करांच्या आशीर्वादाने पोसलेला आहे. ही त्यातली आणखी गंमत. खास पात्र आहे.'

चिंभळ्याहून चंबूगबाळे आटोपून आम्ही गुंगानानांच्या तांदळी दुमाला नावाच्या गावाकडे निघतो. हा गुंगानाना कसा असेल, गावात आपले स्वागत कसे होईल, त्याच्या गुंडगिरीचा आपल्यावरच तर प्रयोग होणार नाही ना, त्याने म्हणे खास तालीम ठेवून गुंड बाळगलेत,– वगैरे चर्चा मुलांमध्ये चालू असतात.

मोटर हळूहळू रखडत जात असते.

## प्रकरण सातवे

# सगळीच मनगटबाजी !

२०८६२ भू. ५ पारा ९६३

मुक्काम : तांदळी दुमाला.

तांदळी दुमालाचे नाव मध्यंतरी खूप गाजले. गुंगानाना खंडू धालवडे हे इथले सरपंच. जिल्हा परिषद सदस्य. तालुका पंचायत समितीचे माजी सभापती. बाबूराव भारस्करांचे दोस्त. भारस्कर मंत्रिमंडळातून उडाल्याबरोबर यांचे सभापतिपद, अविश्वासाचा ठराव मंजूर होऊन, गेले. गुंगानानांनी तांदळी दुमालात राज्यच चालवलेय. दुष्काळात महारवाड्यावरल्या काळे-वाघ मंडळींच्या प्रयत्नांनी वेगळी विहीर मंजूर होऊन दुष्काळी काम म्हणून बांधायलाही मिळाली. गुंगानाना तिथे जेवढे मिळेल तेवढे लाटणारे. त्यांनी महारवाड्यावरल्या काळे-वाघांना 'माझ्या माणसांची बोगस हजेरी लावून त्यांचे पैसे मला द्या' असे सांगितले. काळे-वाघांनी नकार दिला. तशी खवळून गुंगानानांनी कुदळ-फावडी वगैरे सगळी हत्यारेच उचलून आपल्या घरात नेऊन ठेवली. दलितांनी बी. डी. ओ. कडे तक्रार केली. तशी गुंगानानाला वरून झक्कू आला. नाना भडकले. त्यांनी गावाला सामाजिक बहिष्काराचा आदेश दिला. दलितांना हत्यारेपात्यारे मिळाली पण अन्नपाणी तुटले ! गुंगानानाची एक तालीम आहे. त्यात पन्नास–साठ पोरे रोज तालीम करतात. पाच दहा जणांचा खुराक नानांकडून मिळतो. नाना ज्याच्याकडे इशारा करतील त्याचे हातपाय मोडून ठेवायचे काम ही मंडळी इमानेइतबारे करतात. त्यांनीही दलितांना येताजाता छळायला सुरुवात केली. बहिष्काराची बातमी नगरला पोचली तेव्हा प्रभाकरराव रूपवते वगैरेंनी धावपळ केली नि प्रकरण मिटवले.

आम्ही तांदळी दुमालाला पोचतो.
गावाच्या प्रवेशद्वाराशीच बोर्ड असतो:
जाहीर सभा आणि सत्कार. विषय एक गाव : एक पाणवठा.
अध्यक्ष : गुंगानाना धालवडे.

आम्ही कपाळावर हात मारतो !
वेशीच्या कडेला महारवाड्यावर जातो.
एक तरुण मला घेऊन चावडीवर जातो.
'हा आमचा तक्क्या.'
खेड्यात गावकऱ्यांची बैठकीची जागा म्हणजे चावडी असते, आणि दुसरी हरिजन चावडी म्हणजेच तक्क्या. तीन बाजूंनी भिंत, चौथी समोरची मोकळी बाजू. गाव-चावडीला मुख्य खोलीपुढे एक ओटीवजा पडवी असते. थोडी खालच्या पातळीवर. कारण तिथे बोलावलेच तर महारमांगांनी बसायचे.
'किती जुना असेल ?'
मी समोरच्या त्या मोडकळीस आलेल्या गोठावजा जागेकडे पाहतो.
'आठदहा वर्षे निदान.'
'सोडा. १९४७ साली बांधली. ती पण पहिली मोडली म्हणून आम्हीच मेहनतीने बांधली. आणि हे पुस्तक पाहा–' तो तरुण मला एक दहापंध्रा पानी पुस्तिका देतो. गांधीजन्म-शताब्दी. ग्रामपंचायत तांदळी दुमाला–अहवाल. वर गुंगानानांचा मारुतीची पूजा करताना भास्करांबरोबर फोटो. 'ह्यात काय लिहिलेय पाहा.' तो शाईने खुणा केलेले वाक्य दाखवतो. 'सन १९५९–६० साली हरिजन वस्तीत चावडीचे २००० रु. किंमतीचे बांधकाम झाले' आणि तक्क्याकडे बोट दाखवीत म्हणतो, 'गुंगानानाला विचारा, हे दोन हजार रुपये कुठल्या गावच्या हरिजन-चावडीला लावले ? विटेचा तुकडा नाही टाकला, मात्र दोन हजार रुपये स्वतः खिशात टाकले. आमच्यापैकी कुणी वाचणारा नाही. अन् आम्हांला कुणाला दिले पण नाही. त्या शेळक्याचे अन् त्याचे आडवे आहे; तेव्हा त्यानेच आम्हांला हे पुस्तक दिले न् सांगितले.'

‘ गुंगानानाला विचारले नाही का ?’

‘ तर...बहिष्काराचे झाल्यापासून आम्ही पण जुटीनेच आहोत. सोडत नाही. अर्ज करतो. एकदम लेखी. थेट इंदिरा गांधींपासून जगजीवनराम–रुपवतेपर्यंत सगळयांना काप्या पाठवून देतो. माझ्या घरी चला. फाइलच केलीय. मी अन् दोनचार पोरे जरा शाळा–कॉलेजात जाऊन आलोय, तर बरोबर करतो.’

‘ गुंगानाना काय म्हणाले ?’

‘ ते काही पण बोलतात. म्हणे सरकारी मदत मिळायला असे काही तरी लिहावेच लागते.’

‘ गांधी जन्मशताब्दीत तुमच्या गावाला आदर्श गाव म्हणून तीन हजारांचे बक्षीस मिळाले हे खरे का ?’

‘ मिळाले तर. एक ढाल पण मिळालीय. गुंगानाना आमच्या गावचा आदर्श. सगळे आदर्शच म्हणायचे मग.’

‘ गुंगानानाने तालमीत बरेच पहिलवान पोसलेत म्हणे ?’

‘ पैलवान कशाचे ? गावगुंडे. आम्ही तर तालमीला गुंडांची शाळा म्हणतो. गुंडगिरीच शिकवतात. गावात पोरीबाळीला उघडयावर फिरू देत नाहीत. गावात कुण्या घरात बऱ्या रूपाची पोरगी जनमली तर आठदहा वर्षांची झाल्यावर लग्न तरी करतात नाही तर दुसऱ्या गावाला धाडतात बघा. तुमच्याबरोबर एखादी पोरगी आणायची होती म्हणजे कळली असती कसली अवलाद आहे ते.’

पुस्तिकेवरला भारस्करांचा मारुतीची पूजा करतानाचा फोटो पाहून मी म्हणतो, ‘ गुंगानानांना मंदिरप्रवेश मान्य आहे का ? ’

‘ कशाचे ! भारस्कर मंत्री आहेत तर काही पण चालतेय. मंत्र्याला कोण बोलणार– देवळात नाही जायचे ? कोण अवरूगवरू हरिजन गेला तर उभा चिरून टाकतील. मंत्र्याला सगळे माफ असतेय. आमची पोरे देवळापाशी गोटया खेळायला गेली तर ‘ शिवाल, व्हा बाजूला ’ म्हणून कुत्र्यागत हाकतात. बी. डी. ओ., नाही तर कोण सरकारी अंमलदार बौद्ध नाही तर आणिक कोणी असला तरी त्याच्या

ढुंगणाला ढुंगण टेकवून कोंबडी खायला घालतील. सगळे राजकारण ! भास्कर गेल्यावर त्यांच्यामागे हेच नाना 'च्याऽयची, आता म्हारंमांगं पण मंत्री व्हायला लागली. कलियुगात काय खरं नाही म्हणून म्हणतात!'

आमच्या गप्पा चालू. तोवर आणखी काही बौद्ध मंडळी जमतात. मी ऐकून सगळे लिहून घेतोय म्हटल्यावर ती उत्साहाने सांगू लागतात.

'साहेब, बाबूराव भास्कर आमचे जातवाले. ते गांधीजन्मशताब्दीत या चावडीचे उद्‌घाटन करायला आले. आता चावडीला बाहेरच्या बाजूला दोन माळा लावल्या म्हणून काय एवढी दैना झालेली चावडी त्यांना दिसली नसेल काय? आम्ही त्यांना बोललो की 'साहेब, आम्हांला नवी चावडी पायजेल. ही जुनीच हाय. तरी दाबून उद्‌घाटन केले! गुंगानानाने गावची चावडी बाजूला ठेवून हरिजन चावडी पहिल्यांदा केली म्हणून गुंगानानालाच आणून ठेवलेला हार त्यांनी घातला.'

'साहेब, मागे ते बहिष्काराचे प्रकरण झाले. तर फौजदार अन् दोनचार हवालदार आले तपासाला. गावात आले ते थेट गुंगानानाकडे. दुपारी चार कोंबड्या नानाने कापल्या! ट्यूब आणून फौजदाराला पाजली. फौजदार बोलला, 'कोण लोक आहेत तक्रार पाठवणारे त्यांना इथेच बोलवा. आता इथून उठणे अवघड झालेय.' आम्हांला बोलवायला धापाचजण. आम्ही एकमेकाला धरून गेलो. कुठे? गुंगानानाच्याच घरात. ग्रामपंचायतीचे ऑफिसच मुळी गुंगानानाच्या माडीवर आहे. गेलो तर फौजदार नानालाच म्हणतो, 'विचारा त्यांना काय कंप्लेट आहे!' फौजदार हवालदारची अवस्था अशी. बाजूला सगळी तालीम उभी. कशाची जबानी अन् काय? 'मायबाप, चुकी झाली' म्हटले. 'उगा कंप्लेट करतात भोसडीचे—' म्हणून फौजदाराच्या शिव्या खाल्ल्या अन् जीव बचावून परतलो. मग नगरला जाऊन परत कंप्लेट केली. असे होतेय बघा.'

एक तरतरीत मुलगा जवळ येतो.

'दादा, आपले तुम्हांला चॅलेंज आहे—'

त्याच्या बोलण्याचे आश्चर्य वाटून मी म्हणतो, 'कसले ?'

'या गावात तुम्ही हरिजनांपैकी कुणाचे केस गावच्या न्हाव्याकडून कापून दाखवायचे !'

'म्हणजे इथे न्हावी तुमचे केस कापत नाही ?'

सगळेच लोक नकारार्थी मान हालवतात.

'तुझे नाव काय ?' मी लिखी नाव घेतोय म्हटल्यावर ते अतिशयोक्ती करत असतील तर थोडा आळा बसेल म्हणून मी पेन सरसावून नाव विचारतो.

'घ्याना लिहून. नाव घ्या. हवे तर कंप्लेंट पण देतो लिखी. माझे नाव झुंबर तुकाराम काळे–वाघ.'

'काय करता ?'

'मी कर्जतच्या कॉलेजात पी. डी.ला आहे. आमचे केस आम्हांला कर्जतहून कापून यावे लागतेय, नाही तर श्रीगोंद्याला. इथला न्हावी कापत नाही. म्हाताऱ्या–कोताऱ्यांचे, पोरांचे तर कातरीने आमचे लोकच कापतात.'

तेवढ्यात गर्दीत थोडी गडबड होते.

'ह्यो काय गावचा न्हावी इथेच बसलाय.'

एका बाजूला एक तरुण दात काडीने कोरत संभाषण ऐकत उकिडवा बसलेला असतो. मी त्याच्यापाशी जातो. भोवती गर्दी आहेच. हा सूर्य हा जयद्रथ करायची संधी.

'तुम्ही इथे केस कापता का ?'

'पहिले वडील करीत, आता मी करतो.'

'नाव काय तुमचे ?'

'मोहन दळवी.'

'तुम्ही हरिजनांचे केस कापत नाही अशी तक्रार आहे.'

तो झुंबरकडे पाहात डाफरत म्हणतो, 'कधी न्हायी म्हटले रे ?'

'मग चल आता कापून दाखव, मी इथं बसतो.'

झुंबर अटीतटीलाच पोचून असतो.

'साहेब, माझी काही मना नाही; पन् गावकऱ्यांना हरिजनाला वापरलेली हत्यारे चालत नाहीत. दोन दोन हत्यारे आम्ही कुठून आणायची ?'

'तुम्ही कधी केलीत का ?'

'केली न्हाई, पन् गाववाले म्हननारच की– त्येंची हत्यारे आमच्या डोईला नको.'

झुंबर परत उसळतो. लाल होतो.

'काही नाही. तू गावालाच सामील आहेस. मी त्याला विचारले तर म्हणला, म्हैस भादरायचा वस्तरा चालत असेल तर बघ...'

झुंबरचा संताप उमजतो. मला वाईट वाटते. 'मोहन, आत्ता वस्तरा–कैंची घेऊन ये, आणि झुंबरचे आमच्यासमोर केस काप. आम्ही कुठे मंदिरप्रवेश करतो, कुठे पाणी भरतो. इथे येवढे झाले तरी पुरे.'

मोहन उठतो. 'हत्यारे घेऊन येतो' म्हणून निघतो.

'तो येत नाही बघा.' झुंबर म्हणतो.

'येईल. पटल्यासारखे वाटले त्याला.' मी आशावादी.

सहा तासांनी रात्री दोन वाजता आम्ही तांदळी दुमालाहून निघताना झुंबर परत भेटतो. गहिवरल्या सुरात म्हणतो, 'दादा, माझे खरे ठरले. तुम्ही केस कापायला लावाल म्हणून तोच घरातून कुठे बाहेर जाऊन बसलाय. आत्ता त्याच्या घरी जाऊन आलो. त्याची आई म्हणाली, 'तो चुलत्याकडे जरूर काम निघाले म्हणून श्रीगोंद्याला सायकलवरून गेलाय.'

मी त्याच्या पाठीवर थोपटतो. आवंढा गिळतो आणि त्याचे झरणारे अश्रू पाहात राहतो. पाठी वळत तो म्हणतो, 'दादा, ही जुनी सगळी माणसे मेल्याशिवाय काही व्हायचे नाही बघा !'

महारवाड्याच्या तक्क्यावर मी आणि प्रेमानंद. आमच्याभोवती इतकी गर्दी असते की सभाच चालू आहेसे वाटावे.

काही लोक आपल्या खासगी अडचणी, जमिनीबिमिनीची भांडणे, नोकरीचे प्रयत्न वगैरे काही काही सांगत असतात. आमचा याच्याशी संबंध नाही, आम्ही या बाबतीत काही करू शकत नाही म्हटले तरी सांगत राहतात. एक तरुण मुलगा तर तक्क्यावरचे पॅड घेऊन प्रत्येकाला आम्हांला देण्यासाठी अर्ज लिहून देतो; आणि खाली संबंधित माणसाची सही किंवा अंगठा घेऊन आमच्याकडे पाठवतो. शेवटी प्रेमानंद जाऊन त्यालाच ही समाजसेवा थांबवायला लावतो. तरी दरम्यान आमच्याकडे अर्जाची थप्पी तयार झालेली असते. प्रदीप येतो. त्याच्या टेप-रेकॉर्डरची स्प्रिंग तुटलेली असते. त्यामुळे मधून मधून तो टेप-रेकॉर्डरचे ओझे पाहून सुस्कारे टाकतो. सुधीर–विकास म्हणतात, 'आम्ही गुंगानानांचे गुंड तयार करायचे वर्कशॉप ऊर्फ तालीम पाहून आलो.'

दिलीपच्या सैनिक-गीतांना शाळेतल्या पोरांनी दिलेला प्रतिसाद इतक्या दुरूनही ऐकू येत असतो.

इतक्यात गुंगानानांचे बोलावणे येते. आम्ही त्यांच्या घरी ऊर्फ ग्रामपंचायतीच्या ऑफिसात जातो. बऱ्याच दिवसांनंतर गुळाऐवजी साखरेचा चहा मिळतो; पण हरिजन वाड्यातल्या कप आणि बशीत वाटून अर्धा अर्धा घेतलेला चहा पिताना येते तसली चव येत नाही. उलट अपराधी वाटते. गुंगानाना सांगतात, 'रात्री आम्ही दिंडीच्या स्वागतार्थ जेवण ठेवलेय.'

मुले म्हणतात, 'आम्ही हरिजन वस्तीत जेवायला येतो म्हणून चारपाच घरी सांगून ठेवलेय.'

'ते काही चालायचे नाही. अहो आता सगळी तयारीसुद्धा झाली. कोंबड्याबिबड्या केव्हाच साफ करून ठेवल्या आहेत. हवे तर हरिजन वाड्यातल्या लोकांना पण बोलावतो. सहभोजन करून टाकू! काळे-वाघांपैकीच दोघेतिघे 'होय' म्हणतात. आम्ही त्यांच्यावर

सोपवतो. पण मनातून वाटते, 'सालं हा मोह नसला तरी ही भीड टाळायला हवी होती.'

जेवणापूर्वी सभा सुरू होते.
प्रभाकरकाका, दिलीप, मी, सुधीर, प्रेमा सगळे बोलतो. दिलीपच्या बोलण्यात तळमळ. प्रेमानंदची गोष्टी-गप्पा करीत विषय खुलवायची, फुलवायची, भिडवायची पद्धत. प्रदीपची बंगाली वळणाची मिस्किल मराठी ह्यांचे प्रात्यक्षिक चालू.

शेवटी गुंगानाना उभे राहतात. बाजूचा माणूस टोपली उघडतो. नाना एकेक भला थोरला हार काढून प्रत्येकाच्या गळयात टाकायला लागतात. हातात डेरेदार गुच्छ. समोरची दलित मंडळी आणि आम्ही यांच्यात दुरावा निर्माण करायची ती युक्ती वाटते !

मस्तवाले बुलंद शरीर. काळा पहिलवानी चेहरा. बिलंदर डोळे. जाडाभरडा आवाज. अघळपघळ झब्बा. पायजमा. टोपी. गुंगानानांना आमच्या आधीच्या चर्चेची बित्तंबातमी आहे. मागच्या बहिष्कार प्रकरणात प्रभाकरकाका असल्याने सांभाळून चतुराईने ते म्हणतात—
'समता दिंडीचे पाय आपल्या गावाला लागले, आपला गाव धन्य झाला.'
थांबतात. त्याबरोबर समोरचे सगळे लोक तुफान टाळ्या वाजवतात. धन्य होऊन नाना पुन्हा सुरू करतात : 'समता दिंडी-वाल्यांना कुणी कुणी काय काय सांगितले असेल. पण माझी त्यांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी गैरसमज करू नये. ही शहराची तरुण मंडळी आहेत. त्यांना वाटते हे कसे म्हारडा—धेडपट म्हणतात ? पण ह्या लोकानला मी सांगू इच्छितो की, खेडेगावची माणसे शिवी-च्याच भाषेत बोलतात. सख्खे भाऊ एकमेकाला आईबापावरून शिव्या घालतात. वाण्याला वाणगट म्हणतात. तसे महाराला जातीवरून

म्हणतात. आमच्या इथले लोक इंदिरा गांधीला, नाइकसाहेबानल आईमाईवरून शिव्यागाळी करतात. काय रे बुवा ? करता का नाही ?' नाना लोकांना विचारतात.

लोक होकारार्थी माना हालवतात.

'साखर नाही मिळाली तर आमची बायामाणसे पण नायकाच्या ×××××× म्हणतात.' फुल्यांच्या जागी नाना भयानक शिवी घालतात.

'मी या गावाचा सरपंच आहे. सगळ्या गावाचा बाप आहे. बाप पोराला मारतो का नाही चुकी झाली की ?'

गावकरी परत माना डोलावतात.

'मग मी मारले तर कशाला रे बोंब मारता ?...मी गावचे भूषण सांगतो नि तुम्ही गावची वस्त्रे फेडून पाहुण्यांना दाखवता होय रे ?' नाना दलित मंडळींकडे वळून म्हणतात.

'पण नाना, उगीच मारल्यावर कसे गप बसावे माणसाने ?' एकजण मागून म्हणतो. तशी नाना भडकून म्हणतात, 'हा ! मला तर खूळ लागले उगा हात टाकायला. तुम्ही लोक चोऱ्या करता, काय येता-जाता गावले ते धोतरात टाकता, अन् धोतर धरले तर माझा... धरला म्हणून बोंब मारता. ही काय रीत का पद्धत ?'

नानांचे हातवारे बीभत्स होत जातात. मी अडवून म्हणातो, 'तुम्ही चावडी बांधली असे खोटेच छापून दोन हजार रुपये घेतले असे त्यांचे म्हणणे आहे.'

नानांचा चेहरा एकदम पडतो. 'कोण म्हणतो ? सर्वांसमोर बोलावे येऊन.'

ज्या दोघाचौघांनी मघा सांगितले ते बावरून आमच्याकडे बघायला लागतात. मी म्हणतो, 'सांगायला कशाला हवे ? ह्या पुस्तिकेत लिहिलेय. ती चावडी कुठेय, दाखवा ?'

नाना किंचित घुटमळतात. म्हणतात, ' त्ये ग्रँट संपवल्येली दाखवायला पाहिजे म्हणून आधी लिहिले. पैसे काय जात नाहीत. सवडीने बांधू. गावाचेच पैसे आहेत. गावापाशीच आहेत. काय घेऊन मी पळून जातो काय ?'

' पण १९५९–६० मध्ये पैसे मिळाले. आता पंधरा वर्षे होत आली नाना ?' प्रेमानंद वकिली पॉइंट काढतो.

गुंगानाना म्हणतात, ' काय ते बघतो. '

आम्ही त्या वाक्याचा फायदा घेऊन मध्येच उभे राहून घोषित करून टाकतो, ' गुंगानानांनी चावडीचे पैसे परत द्यायचे कबूल केले त्याबद्दल धन्यवाद ! आता दलित मंडळींनी वारंवार त्यांना आठवण अर्ज देऊन नि त्यांच्या कॉपीज प्रभाकररावांना पाठवून हे काम करून घ्यावे.'

गुंगानाना धुसफुसत आभार मानतात.

जेवताना गुंगानाना गप्प घुम्मपणे बसतात. रात्री बाबा निवृत्ती काळे–वाघ नावाच्या ग्रामपंचायतीच्या बडतर्फ दलित नोकराचे प्रकरण निघते. गुंगानानाच्या तालीमबहाद्दरांनी त्याच्या बायकोची छेड काढल्याबद्दल त्याने लेखी तक्रार केली म्हणून गुंगानानाने ' तुझी बायको येवढी अब्रूची कधी झाली ?' असे म्हणून त्याला नोकरीवरूनच काढून टाकलेले असते. तो व्याकुळ होऊन सारी कथा सांगतो. म्हणतो, ' साहेब, गरीबाची बायको झाली म्हणून तिला कुणीही केव्हाही छेडावे काय ? गरीबाच्या बाईला काय इज्जत नसते ?'

गुंगानानांशी आम्ही परत वाद घालतो. व्यर्थच.

शेवटी बाबाला नगरला येऊन भेटायला काका सांगतात.

लक्ष्मण शिंदे नावाचा गृहस्थ जत्रेबाबतही तक्रार करतो. म्हणतो, जत्रेत पालखीबरोबर सगळे जातात, पण बौद्ध–मांगवाड्यातले कुणी रस्त्याने नुसते पाहायला उभे राहिले तरी गुंगानाना त्याला तोंडात हाणतात.

मी सारखा वेगाने दिवसभर जो जो जे जे बोलेल ते ते लिहून घेत असतो.

एक तरुण जवळ येतो; म्हणतो, 'तुम्ही एवढे सगळे काय टिपून घेता?'
'कोण काय बोलले– कुठे काय झाले?'
'लिहून काय करणार?'
'सर्व्हेसारखे करणार. कदाचित छापणार!'
'साहेब, छापून काय उपयोग? गुंगानानाबद्दल इतके नगरच्या पेपरांनी छापले. त्याचे काय पण वाकडे झाले नाही. तुम्ही आमच्या अडचणी समजून घेतल्या. लिहून घेतल्या. पण तुम्ही तर एक दिवसात निघून जाणार. आम्ही इथेच गुंगानानापाशी राहणार. मग आम्हांला या सगळ्याचा काय फायदा?'

मी पाहात राहतो.
त्याच्या प्रश्नाला माझ्याकडे काय उत्तर होते?

# प्रकरण आठवे

# हा न्याय झाला नाही

मुक्काम : भोसे.
तालुका : कर्जत.

भोश्याला दीड वर्षाची केस कोर्टात रखडत असते, आणि आदल्याच दिवशी नगरच्या वर्तमानपत्रांत पाण्याच्या प्रश्नावरून झगडा झाल्याची बातमी असते. भोश्याला जाताना प्रभाकरकाका प्रकरणाची हकिगत सांगून ठेवतात. प्रकरण मिटू शकण्यातले, पण गुंतागुंत झालेली. कारण गावातलेच दोन गट. भोश्याला क्षीरसागर विरुद्ध खराडे असे दोन मराठ्यांतच गट. गावातल्या प्रत्येक प्रकरणात एकाने एक बाजू घेतली की दुसऱ्याने विरुद्ध घेतलीच. एकमेकांविरुद्ध कोर्टात खटले उभे करायचे, गावकरी हाताशी धरून मारामाऱ्या करायच्या. गुलाबराव आणि पर्वतराव हे दोघे दोन गटांचे प्रमुख. दोघे काँग्रेसवालेच. गावातल्या दलितांतही त्यांनी फूट पाडून आपापल्या गटात ओढून घेतलेले. एकाने महार-बौद्ध हाताशी धरले, तर दुसऱ्याने मांग-चांभारांशी सूत जुळवायचे. ग्रामीण भागात हे नवे राजकारण शिजतेय. सगळीकडेच.

मराठ्यांविरुद्ध खेड्यांतून ताठ उभे राहून भांडणारी जात म्हणजे बौद्धच. संघटित, जागृत, आक्रमक. साधे भांडण झाले तरी कोर्टकचेरीची भाषा करणारी. अर्ज लिहिला तर जगजीवनराम, गृहमंत्री, मुख्यमंत्री यांना कॉप्या पाठवणारी. कार्यकर्ते गावागावातून उभे राहिलेत ते महार– बौद्ध समाजातूनच. दलित समाज म्हणजे बौद्धसमाज असे नवे समीकरण बौद्धांमधल्या जागृतीने होऊ घातलेय.

दलितांना मिळणाऱ्या प्रत्येक संधी–सवलतीचा फायदा त्यातल्या त्यात अधिक पदरात पडतो तो बौद्धांच्या. नगर जिल्ह्यात महाराष्ट्रात सर्वाधिक दलितांवरल्या अत्याचार अन्यायाची प्रकरणे उजेडात आली. झाली, होतात सर्वत्रच; पण नगर जिल्ह्यात केसेस सर्वाधिक झाल्यात. त्यातही बौद्धांच्याच केसेस विशेष. ह्यामुळे खेड्यापाड्यांतून मराठा समाजाशी संघर्ष करणारी अशी एकच जमात उरलीय ती नवबौद्धांची. मातंग–मांग अजून कासरे केरसुण्या विकून गावाशी जुळवून, नमून, सांभाळून वागतात. चांभार समाज तर सर्वस्वी गावावर अवलंबून. तो वाकड्यात शिरत नाही, शिरू शकत नाही.

बौद्धांनी वतनदारी सोडली. शेतमजुरीपेक्षा शिकून पांढरपेशा नोकर-दारीकडे त्यांचा ओघ वळला. घरातला एखादा जरी नोकरदार झाला तरी घराचा, भाऊबंदाचा आचारविचार पालटतो. गावाच्या पायाशी 'चेंडू' बनून राहात नाहीत. खेड्यापाड्यांतून म्हणूनच नवा डाव शिजतोय. मराठ्यांनी खेड्यापासून थेट मुंबईत मंत्रिमंडळापर्यंत सर्वत्र नवे बेरीज–वजाबाकीचे राजकारण मांडलेय. दलितांची बाजू घ्यायची, पण नवबौद्धांविरुद्ध मांग, चांभार, इत्यादी इतर दलितांत विद्वेष फैलवायचा. त्यांच्यात आपसांत स्पर्धा, झगडे, वितुष्ट उठवायचे. त्यांची कोंबडी झुंजवायची आणि आपला फायदा करायचा.

महार किंवा नवबौद्ध अशा काँग्रेस किंवा रिपब्लिकन नेत्यांनी दलितांचे राजकारण म्हणजे महार–नवबौद्धांचे राजकारण, असे संकुचित समी-करण केल्याने दलितांत फाटाफूट सुलभ झालीय... आम्हा मुलांची ही चर्चा रंगात आलेली असते.

इतक्यात भोसे येते.

भोश्यात आधी पत्रे पोचलेली असतात. शाळेत उतरायची, जेवायची सोय केलेली असते. धूळ उडवत मोटर पोचते. सकाळची वेळ असते. उतरल्याबरोबर सगळे संडासाची डबडी घेऊन वाटेला लागतात.

माझ्याबरोबर गप्पा मारीत एक गृहस्थ चालू लागतात. ते सांगतात, "आता तुमची पोरे शहरी असूनसुद्धा तयार झालेली दिसतात. नाही तर गेल्या दुष्काळात इथे इंजिनीयरिंग कॉलेजची तरुण मुले आली होती. मुले सगळी खूप हुशार, पण आयुष्यात कधी खेडे पाहिलेले नाही. सकाळी उठले, संडास कुठे विचारायला लागले. आम्ही आपले समोरचे शेत दाखवले. म्हटले कुठेही बसा. निघाले बुवा एक–दोघेजण डबडे घेऊन. फीर फीर फिरले. शेवटी परत आले. तसेच म्हणाले, छे बुवा, असे उघड्यावर बसायला कसेसेच वाटते. सांगतो अनिलराव, आश्चर्य वाटेल तुम्हांला, पण ही सगळी पोरे रोज भल्या पहाटे जीपने इथून सोळा मैलांवर डाक-बंगला आहे तिथे केवळ संडासाला जायची, अन् सोळा मैल परत यायची. आता बोला ! कशी तुमची कॉलेजातली पोरं खेड्यात जाणार ?'

त्यांच्या गप्पा चालूच. मी आपला आजूबाजूला न पाहता ते कुठे तरी वेगळ्या वाटेला वळतीलसे पाहतोय. पण चिन्ह नाही. अखेर तेच थांबतात. म्हणतात, 'इथेच बसू आपण.'

'आपण ?'

'त्याला काय होतेय, पाठ करून बसायचे. गप्पा मारत टाइम छान जातो. तुम्ही लोक शहरांत पेपर घेऊन जाता ना तसे आमच्या गप्पा."

त्या दिवशी मी आयुष्यात पहिल्याने गप्पा मारत असा बसतो. हाही एक अनुभव.

भोश्याची बैठक शाळेतच सुरू होते. पांडुरंग क्षीरसागर आव्हाड नावाच्या तरुण मास्तरांना जातिवाचक शिव्या देऊन मारहाण केल्याबद्दलची फिर्याद गेली दीड वर्ष कोर्टात रखडतेय. नुसत्या तारखा पडताहेत. सुनावणी अद्याप झाली नाही. येत्या आठवड्यात ती सुरू व्हायचीय. क्षीरसागर. तेलकट चेहरा, लालसर व्यसनी डोळे, एकूण प्रथमदर्शनीच मत प्रतिकूल व्हावे अशा तऱ्हेचे व्यक्तिमत्त्व. अंगापिंडाने बारीकच. आव्हाड गुरुजी हा अगदीच पोरसवदा तरुण. निळा शर्ट, टोपी, पायजमा घातलेला. चेहरा भाबडा, भावनाशील, सरळ साधा वाटतोय.

'काय गुरुजी, काय झाले ?'

आव्हाड गुरुजी सांगू लागतात, 'आम्ही नवरा-बायको दोघे इथे प्राथमिक शिक्षक आहोत. आम्ही गावात कुणाशी आडवे नसतो. आपण बरे, काम बरे. पण मी जातीने मागासवर्गीय, तरी स्वच्छ, शुद्ध राहतो म्हणून हचा लोकांचा वाईटपणा घ्यावा लागतो. हा पांडुरंग क्षीरसागर नेहमी दारू पितो. आता सगळा गाव दारू पितो. आमच्यातले काही शिक्षकसुद्धा पितात. नावे घ्यायला कुणाची नको. पण मी शिवत नाही, तर हा क्षीरसागर येता-जाता उगा मला शिव्या द्यायचा. माझी बायको नोकरी करते. त्यामुळे अनेक जणांना वेगळे वाटते. या खेड्यात आमचे कोणच नाही. दोघेच नवरा-बायको पाखरागत भिऊन छपून दिवस काढतो. नर्स अन् शाळा-मास्तरणीला सगळा गाव छळायला टपलेला असतो. परवा सावळे विहीरला ग्रामसेवकाने दारू पिऊन नर्सला धरली होती. बिचारी विधवा बाई. पोटाकरता गावात आली. शेजारपाजार अब्रूदार बघून राहिली. तर हा तिला खोटेच बायकोच्या पोटात दुखतेय म्हणून बोलवायला आला, न् वाटेत झटायला लागला. बाईचे नशीब थोर म्हणून वेळेवर ओरडा ऐकून लोक आले, अन् वाचली. नर्स नि मास्तरणी म्हणजे गावगुंडांना आपलीच प्रॉपर्टी वाटतीय. मध्ये तर काही दादांनी माझी एकटचाची बदली व्हावी म्हणून पिना मारल्या होत्या. परगावची शिकलीसवरली बाई अब्रूने राहते, आपल्याशी अघळपघळ बोलत नाही, याचा त्यांना राग येतो. बाईला काही करता येत नाही म्हणून मला धरलेन. मी असा फाटका. ह्याने दारू पिऊन मला धरले. म्हणाला, 'भडव्याहो, दोघेदोघे नवराबायको कमावता,—मला दारूला पैसे दे, आणि एक पोरगी दे आणून.' मी त्याला दूर लोटला तसा अंगाशी येत म्हणाला, 'का रे, धेडग्या, गावात राह्यचे का नाही ? दे पैसे—' मी घाबरलो. त्याला पैसे दिले. आणखी दे म्हणाला. आणखी दिले. एकूण दहा रुपये दिले, तशी मला सोडले. थोड्या वेळाने तशाच झुकांड्या देत घरी आला. म्हणाला, 'भोसडीच्या, धेडपट साला ! पोरगी नाही पाठवलीस ? चल, तुझी बायको दे आता—' मी त्याला कसावसा

घराबाहेर काढला. आजूबाजूचे चार लोक ऐकत होते ते पण आले. त्यांनी त्याला आवरून घरी नेला. घरी गेला तरी 'मास्तरणीला नाही रस्त्यावर ओढली, नाही धेडग्याला चपलीने मारला तर नावाचा पांडुरंग नाही–' म्हणून ओरडत होता. मी पोलिसपाटलाला लेखी तक्रार केली नि कोर्टात केस केली. आता तारखा पडून आहेत.'

आम्ही ऐकून सुन्न झालेलो. थोडा वेळ कुणी बोलतच नाही. मग काका पांडुरंग क्षीरसागरला विचारतात, 'काय रे, गुन्हा कबूल आहे का ?' तो मारक्या बेरक्या अट्टल निगरगट्ट नजरेने आमच्याकडे पाहतो आहे.
'त्याला काय विचारता ? उभ्या गावाने ऐकलेय. तो नाही का म्हणेना ?' एक वयस्कर गृहस्थ म्हणतात.
'काय रे बुवा, आहे काय कबूल ?'
चुकी झाली.' क्षीरसागर एकदाचा बोलतो.
आव्हाड परत उसळतो, 'चुकी एक डाव होते. तू आठदहा वेळा मला शिवीगाळी केलीस.'
'ती काय मुद्दाम केली नाही. तू पण मुद्दाम आडवे बोलायचास.'
'प्रभाकरराव, ही केस मिटवायची नाही मला.' आव्हाड गुरुजी एकदम तट्कन तोडून उभे राहात म्हणतात.
प्रभाकरकाका त्यांना हाताला धरून बसवतात.
'असे तोडून उठू नका गुरुजी. आम्हांला तुम्हांला न्याय करायचाय. पण ही केस मिटवून घेऊ या. गावात वातावरण विघडले राहण्यात काही कुणाचाच फायदा नाही. आपण उदारपणे क्षमा करू या. दंड करून शिक्षा करू या.'
'नाही. मला कोर्टातच निकाल हवाय. मला पुन्हा पुन्हा आगळीक नको.'
आव्हाड गुरुजी बाहेरच पडतात.
मी प्रेमानंद व प्रभाकरकाका त्यांच्या मागोमाग जातो.

'हे बघा, गुरुजी, तुमची बाजू बरोबर आहे. पण कोर्टात निकाल काय मिळेल सांगता येत नाही. शिवाय अजून दोनतीन वर्षे केस सहज

रखडेल. परवा राशिनजवळच एक खून दिवसाढवळ्या भर बाजारात होऊन खुनी पुराव्याअभावी निर्दोष सुटला! सुटला की नाही? उद्या पांडुरंग कशावरून सुटणार नाही? शिव्या दिल्या, मारले, पण गुन्हा किरकोळ ठरेल, शिक्षाही नावाला होईल. वर मास्तरने शिक्षा करवली म्हणून गाव डूख धरील. त्यापेक्षा समजुतीने घ्या. आता तुमच्या मागे जो गट उभा आहे तो उद्या जातीचा प्रश्न निघाल्यावर राहीलच असं नाही. तुम्हालाही झुंजवणारे, भांडवणारे नि गंमत पाहणारे याही गावात आहेत हे लक्षात घ्या.' काका खूप वेळ बोलतात. मास्तरांचा चेहरा रडवेला होतो.

'पण तो माफी मागायला पण तयार नाही; अन् आपण एकतर्फी माघार घ्यायची? आपली अब्रू त्यानेच घ्यायची अन् त्याला घाबरून आपणच त्याला माफी द्यायची, हा काय न्याय झाला का?'

प्रभाकरकाकांनाही गहिवरून येते. आव्हाड गुरुजींच्या पाठीवर थोपटत ते म्हणतात, 'गुरुजी, तुमचे सगळे खरे आहे. आम्हीही या प्रसंगांतून गेलो आहोत. हे सोसता-सोसताच केस पांढरे झाले. तुम्ही माझे ऐका, फिर्याद काढून घ्यायच्या कागदावर सही करा. त्यातच तुमचे भले आहे.'

आव्हाड गुरुजी कोलमडतात! 'तुमच्या शब्दाबाहेर मी नाही' म्हणतात. कोऱ्या कागदावर खाली सही करतात, अन् एकदम ढसाढसा रडायला लागतात!

सारेच गहिवरून जातात. डोळ्यांत अश्रू उभे राहतात.

अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आव्हाड गुरुजींना दिलेला सल्ला व्यवहार्य असतो. पण तरी सारखे वाटत राहते, 'आपण न्याय केला नाही.'

पांडुरंग दंडाची रक्कम आणून द्यायचे सगळ्यांसमोर कबूल करतो. कागदपत्रावर साक्षीदारांच्या सह्या होतात. आम्ही जेवायला जातो.

जेवण करून येईतो गावकरी ताटकळत राहिल्याचे लक्षात येऊन आम्ही अस्वस्थ होतो.

दुसरे प्रकरण शिवीगाळीचेच असते.

दुष्काळी कामावर पिण्याच्या पाण्याच्या हंडयातून स्वतःच्या हाताने पाणी काढून घेतले म्हणून तुकाराम दगडू चव्हाण या तरुणाला अंकुश रघुनाथ क्षीरसागर नावाच्या गँगमनने 'धेडग्या, पाणी बाटवतोस काय?' म्हटल्याबद्दल त्याने तक्रार केलेली असते. दोघेही विशीतले तरुण दिसतात. क्षीरसागर 'पाण्याबद्दल आपण शिव्या दिल्या नाहीत; फक्त चव्हाण पाण्याच्या बाजूला बायकांकडे तोंड करून मुतायला बसला त्याला हरकत घेतली' असे सांगतो.

विशेष असा की, चव्हाणला आपल्यासमोर धेडग्या असे म्हटले असे सांगणारे पाचसात तरुण त्याने आणले असले, तर त्याने बायकांसमोर मुतायला फक्त हरकत घेतली असे सांगणारे चौघेजण क्षीरसागर-बरोबर असतात.

साक्षीदारांच्या भरोशावर खरे-खोटे करणे अशक्यच असते. गावातले जे दोन दादा–गुलाबराव नि पर्वतराव–ते यांच्यामागे असतात. चव्हाणच्या बाजूने काही मराठा तरुणही असतात.

'खरे-खोटे कसे करायचे, नि हा तंटा कसा मिटवायचा?' आम्ही विचारतो.

एक म्हातारा उभा राहतो.

'साहेब, खरे सांगू का? या गुलाबराव–पर्वतरावातला झगडा तुम्ही मिटवा; गावातले सगळे तंटे चटदिशी मिटतात बघा. या दोघांतले भांडण ते दुसऱ्यांकरवी लढवीत बसतात.'

पर्वतराव–गुलाबराव 'आमचे कशाला नाव घेता?' वगैरे पुटपुटतात. शेवटी आणखी एक गृहस्थ उभा राहतो, 'मी इथला पोलिसपाटील आहे.' मध्यमवर्गीय शहरी पांढरपेशा वाटणारे ते गृहस्थ मघाच वेगळे वाटलेले. ते म्हणतात, 'ह्याने त्याला पाण्यावरून हरकत घेतली हे खरे. शिव्या पण घातल्या. काय क्षीरसागर? कोर्टात नको सांगू. तिथे नाही म्हण हवे तर. इथे तर सांग खरे.'

'मी म्हणलो, पण तो माझी नेहमी छेड काढतो. मग राग नाही यायचा का?'

क्षीरसागर कबूल झाला. आम्ही चव्हाणला बोलावून 'तक्रार मागे घे, आपण त्याला दंड ठोठावू.' सांगितले. चव्हाण कबूल झाला. कागदपत्रे तयार केली. क्षीरसागरला पन्नास रुपये दंड करून हरिजन चावडीला द्यायला सांगितले.

गावाबाहेर पडताना एक म्हातारा गृहस्थ आला. म्हणाला, 'साहेब, आमचे गाव ह्या गटबाजीने मेले बघा. पर्वतराव–गुलाबराव लोकांना झुंजवतात; अन् सगळ्यात गंमत म्हणजे इथला पोलिसपाटील लालासाहेब कॉलेजपर्यंत शिकलाय. पक्का तयार गडी. त्यानेच या दोघांना आपसांत झुंजवत ठेवून स्वतःचे महत्त्व वाढवलेय बघा. या लालासाहेबाला हालवा गावातून, सगळे थंड होतेय बघा.'

भोसे सोडताना मी प्रभाकरकाकांना म्हणालो, 'काका, खरोखर या खेड्यांतून फिरताना या देशातले असून परदेशी असल्यासारखे वाटते.'

## प्रकरण नववे

# ढोराने दुष्काळ पाडला !

मुक्काम : मिरजगाव.

तालुका : कर्जत.

मिरजगावचे प्रकरण गाजलेले. शिक्षाही झालेल्या. आता प्रकरण अपील होऊन हायकोर्टात जाऊ घातलेय. फक्त माहिती घ्यायची, इतकेच काम आहे.

अलीकडे दहा-पाच मैलांवर कोकणगाव आहे. आम्ही दोन गट करतो. कोकणगावला बरीच भांडणे, केसेस, मारामाऱ्या आहेत. तिथे तडजोड अवघड आहे. तरी निदान वातावरणातली तंगी कमी व्हावी म्हणून प्रयत्न करणे आवश्यक आहे. तिथे प्रभाकरराव, प्रेमानंद, दिलीप, सुधीर यांनी जावे आणि मी, विकास, श्रीनिवास, प्रदीप यांनी मिरजगावला जाऊन माहिती घ्यावी, असे ठरते. मोटरने त्यांना वाटेत सोडून आम्ही पुढे जातो.

गावाबाहेर एका उजाड वाटणाऱ्या दगडाळ रस्त्याने एक खोलाटी ओलांडून पायी वर गेल्यावर देवळापाशी येतो. एकजण गावातून माहिती द्यायला बरोबर नेलेला असतो. अलीकडे वरून उघड्या एका चौकोनात महानुभावी ओटा आणि बाजूला कसला तरी स्तंभ असतो. शेजारी जुनाट, पण अद्याप अस्वच्छ तरी व्यवस्थित असे शंकराचे देऊळ असते. देवळाला मध्ये जेमतेम दोन फूट जागा सोडून लांबलचक आडवी झोपडी असते. त्याचाच एक भाग गोठेवजा असतो. त्यात गुरेही बांधलेली असतात.

‘ मालक आहेत का ?’
कुणी तरी अनोळखी आलेले पाहून संशयी नजरेने पाहणाऱ्या बाईला आम्ही विचारतो. इतक्यात आतून एक हाडकुळा, पण लक्षात यावा इतका उंच असलेला माणूस बाहेर येतो. नमस्कार करतो.
‘ मी भाऊ रखमाजी त्र्यंबके.’
औपचारिक बोलण्यानंतर त्याला केसच्या प्रकरणाची हकिगत विचारतो.

समोरच्या आवाराकडे बोट दाखवत तो म्हणतो, ‘ एकूण १४ एकराची ही जमीन. मी चार वर्षांमागे २१ हजाराला विकत घेतली. विठ्ठल तुकाराम बावडकर पाटलालाही ही जमीन पाहिजे होती. तर मालकाने मला दिली म्हणून तो चिडला. आमची जात ढोर. ढोराने आपल्या गावची जमीन विकत घ्यावी, हा गावचा अपमान आहे वगैरे म्हणून त्याने वातावरण तापवले. त्यात याच शेतात फार जुने असे हे शंकराचे देऊळ, अन् हा मानभावाचा ओटा आहे. तीन वर्षांखाली उभ्या राज्यात दुष्काळ पडला. इथे पण पडला. पाऊस पडेना, तशी काही मतलबी लोकांनी बोंब उठवली की, ढोराने देऊळ बाटवले, अन् म्हणून पाऊस पडत नाही ! झाले ! लोक काय, हे असले सगळे मानणारे. इथे अजून साप चावला तर देवापुढे टाकून देवाची मर्जी असली तर वाचेल म्हणून गप्प बसतात ! किती पण आजार होऊ दे, तीर्थ–अंगारा देणार, नाही तर देवअृष्याकडून उतरून ओवाळून टाकणार.
‘ गावकऱ्यांनी शंकराला अभिषेक करून पवित्र करायचे ठरवले. आम्ही रोज पूजा व्यवस्थित करतच होतो. आम्हांला पण काळजी आहेच की. आम्ही मानभाव पंथ स्वीकारला तरी देव मानतो. गावकऱ्यांनी हजार-बाराशे सह्या गोळा करून सरकारात आमची वस्ती उठवावी म्हणून अर्ज केला. पण आमची पक्की मालकीची जमीन असल्याने त्यांचे काही चालले नाही. आमच्याविरुद्ध बोलणाऱ्यांत सगळे कॉंग्रेसवाले होते. त्या टायमाला इथे पंचायत जनसंघाकडे होती, तर त्यांनी आमची बाजू घेतली ! परवा अविश्वासाचा ठराव पास

करून काँग्रेसचा गट आला. आता परत आमचे हाल होणार. तर त्या वेळी मग पोलिसपाटील बिठ्ठल तुकाराम बावडकर, पाराजी यादव, शांतिलाल बोरा यांनी आम्हांला येऊन धमक्या दिल्या. तुम्ही देऊळ बाटवल्याने गावात पाऊस पडत नाही. तेव्हा तुम्ही ही वस्ती अन् गाव सोडून द्या, नाही तर वस्ती जाळून टाकू, सांगितले. गावातून आम्हांला फिरताना त्रास देऊ लागला. पण आम्हांला जास्ती त्रास देतीलसे वाटले नाही. कधीमधी पोरे चार दगड मारायची अन् पळायची, पण ६ ऑक्टोबर १९७२ ला चार-पाचशे लोकांनी 'ढोरांना हाकला', 'हरहर महादेव–' अशा घोषणा करीत, हातांत मशाली, काठ्या, सळया, भाले घेऊन रात्री आमच्या वस्तीला वेढा घातला! आवाज ऐकून आम्ही पोरेबाळे घेऊन घरात लपलो. 'हरहर महादेव' म्हणायचे अन् चार-पाचशे लोक एकदम धो धो दगड मारायचे! मग पेटते बोळे फेकायला लागले. आम्ही बाहेर पडलो नाही. तेवढ्यात गावात ढोरांना कोंडून जाळतात, ही बातमी कळून दुसरे लोक धावत आले. त्यांनी जमावाला आवरले. तरी काहींनी घरात घुसून आमच्या अंगावर हात टाकलाच. पण जनसंघवाले वेळेवर आल्याने जास्त-कमी झाले नाही. आम्ही पोलिस-केस केली. वर्षभर खटला चालला. खालच्या कोर्टात न्यायाधीश बॅकवर्ड क्लासचे होते. त्यांनी बारा पंधराजणांना जबर शिक्षा केल्या. वरच्या जिल्हा कोर्टात सवर्ण न्यायाधीश होते. त्यांनी बाकी सगळ्यांना निर्दोष सोडले, आणि फक्त पोलिसपाटील विठ्ठल तुकाराम बावडकर यांना ५०० रु. दंड, अन् तीन महिने सक्त मजुरी दिली! कोर्टात जात पाहून निवाडा झाला असे आपले आम्हांला वाटते. बी. सी.च्या केसेस बी. सी. जजच्या कोर्टातच चालायला पाहिजेत!'

त्र्यंबकयांनी तपशीलवार हकिगत डोळ्यांसमोर उभी केलेली असते.

'सध्या काय त्रास?'

'म्हणजे शिक्षा झाल्यापासून जरा वचकून असतात; पण गुरे मुद्दाम आमच्या शेतात सोडतात. गिरणीत गेले, दुकानात गेले की वेळ लावतात. पिके चोरून कापतात.'

‘ गावात इतर दलित कोण कोण आहेत ? ’
‘ सगळे आहेत. पण त्यांतले कोण आमच्या बाजूने नाहीत. आम्ही येथे उपरे. जमीन विकत घेऊन आलेले. ते पहिल्यापासून गावाला धरून आहेत. उलट आमचेच महार-मांग ‘ च्यायची ढोरं लई पैशेवाली झाली ’ म्हणून उगाच खार खातात. ’

गावात जाऊन शिक्षा झालेले पोलिसपाटील, वोरा वगैरेंना भेटतो. ते म्हणतात,‘ जनसंघवाल्यांनी ढोरांना हाताशी धरून आम्हांला बदनाम करण्याकरता हे राजकीय कारस्थान केले. बाकी गावातले इतर सगळे दलित आमच्या बाजूने साक्षीला आले ! मग फक्त त्यांनाच कशाला आम्ही छळू ?’
‘ मंदिरापाशी तुम्ही कुणी जमावाने गेलाच नव्हता असे म्हणायचेय का तुम्हांला ?’
‘ गेलो होतो, पण कुणाकडे साधी काठी पण नव्हती. त्र्यंबके मंडळी आमचे खाजगी देऊळ आहे असे सांगून आम्हांला येऊ देत नव्हती. आणि वहिवाटीने ते गावाचे देऊळ होते ; म्हणून निषेधमोर्चा शांततेने नेला होता.’
‘ मग तिथे अर्धवट जळालेले बोळे, दगड, सळया पंचनाम्यात कशा सापडल्या ?’
‘ तो सगळाच त्यांनी ठरवून केलेला बनाव होता ! ’
‘ कोर्टात चुकीची शिक्षा झाली का ?’
‘ तसे कसे म्हणायचे,—पण पोलिसांनी, त्र्यंबक्यांच्या बाजूने त्या वेळचे सरपंच वगैरे लोकांच्या दबावाने पंचनामा केला.’
परतताना परत त्र्यंबक्यांकडे जातो. त्यांना गावातले लोक काय म्हणतात ते सांगतो. ते म्हणतात की, एवढे देवाचे प्रेम होते तर आता कशाला बहिष्कार टाकला ? आता ढोराने देऊळ बाटवले म्हणून गावचे कुणीसुद्धा दर्शनाला येत नाहीत. दुसरे मंदिर बांधणार आहेत.

मिरजगावला आम्ही जेवण एका खानावळीत घेतो. अगदीच बेचव प्रकार असूनही भुकेपोटी तोही हात मारून खाल्ला जातो.

करून कॉंग्रेसचा गट आला. आता परत आमचे हाल होणार. तर त्या वेळी मग पोलिसपाटील विठ्ठल तुकाराम बावडकर, पाराजी यादव, शांतिलाल बोरा यांनी आम्हांला येऊन धमक्या दिल्या. तुम्ही देऊळ बाटवल्याने गावात पाऊस पडत नाही. तेव्हा तुम्ही ही वस्ती अन् गाव सोडून द्या, नाही तर वस्ती जाळून टाकू, सांगितले. गावातून आम्हांला फिरताना त्रास देऊ लागला. पण आम्हांला जास्ती त्रास देतीलसे वाटले नाही. कधीमधी पोरे चार दगड मारायची अन् पळायची, पण ६ ऑक्टोबर १९७२ ला चार-पाचशे लोकांनी 'ढोरांना हाकला', 'हरहर महादेव–' अशा घोषणा करीत, हातांत मशाली, काठ्या, सळया, भाले घेऊन रात्री आमच्या वस्तीला वेढा घातला! आवाज ऐकून आम्ही पोरेबाळे घेऊन घरात लपलो. 'हरहर महादेव' म्हणायचे अन् चार-पाचशे लोक एकदम धो धो दगड मारायचे! मग पेटते बोळे फेकायला लागले. आम्ही बाहेर पडलो नाही. तेवढ्यात गावात ढोरांना कोंडून जाळतात, ही बातमी कळून दुसरे लोक धावत आले. त्यांनी जमावाला आवरले. तरी काहींनी घरात घुसून आमच्या अंगावर हात टाकलाच. पण जनसंघवाले वेळेवर आल्याने जास्त-कमी झाले नाही. आम्ही पोलिस-केस केली. वर्षभर खटला चालला. खालच्या कोर्टात न्यायाधीश बॅकवर्ड क्लासचे होते. त्यांनी बारा पंधराजणांना जबर शिक्षा केल्या. वरच्या जिल्हा कोर्टात सवर्ण न्यायाधीश होते. त्यांनी बाकी सगळ्यांना निर्दोष सोडले, आणि फक्त पोलिसपाटील विठ्ठल तुकाराम बावडकर यांना ५०० रु. दंड, अन् तीन महिने सक्त मजुरी दिली! कोर्टात जात पाहून निवाडा झाला असे आपले आम्हांला वाटते. बी. सी.च्या केसेस बी. सी. जजच्या कोर्टातच चालायला पाहिजेत!'

त्र्यंबक्यांनी तपशीलवार हकिगत डोळ्यांसमोर उभी केलेली असते.

'सध्या काय त्रास?'

'म्हणजे शिक्षा झाल्यापासून जरा बचकून असतात; पण गुरे मुद्दाम आमच्या शेतात सोडतात. गिरणीत गेले, दुकानात गेले की वेळ लावतात. पिके चोरून कापतात.'

‘ गावात इतर दलित कोण कोण आहेत ? ’

‘ सगळे आहेत. पण त्यांतले कोण आमच्या बाजूने नाहीत. आम्ही येथे उपरे. जमीन विकत घेऊन आलेले. ते पहिल्यापासून गावाला धरून आहेत. उलट आमचेच महार-मांग ‘ च्यायची ढोरं लई पैशेवाली झाली ’ म्हणून उगाच खार खातात. ’

गावात जाऊन शिक्षा झालेले पोलिसपाटील, बोरा वगैरेंना भेटतो. ते म्हणतात,‘ जनसंघवाल्यांनी ढोरांना हाताशी धरून आम्हांला बदनाम करण्याकरता हे राजकीय कारस्थान केले. बाकी गावातले इतर सगळे दलित आमच्या बाजूने साक्षीला आले ! मग फक्त त्यांनाच कशाला आम्ही छळू ?’

‘ मंदिरापाशी तुम्ही कुणी जमावाने गेलाच नव्हता असे म्हणायचेय का तुम्हांला ?’

‘ गेलो होतो, पण कुणाकडे साधी काठी पण नव्हती. त्र्यंबके मंडळी आमचे खाजगी देऊळ आहे असे सांगून आम्हांला येऊ देत नव्हती. आणि वहिवाटीने ते गावाचे देऊळ होते; म्हणून निषेधमोर्चा शांततेने नेला होता.’

‘ मग तिथे अर्धवट जळालेले बोळे, दगड, सळया पंचनाम्यात कशा सापडल्या ?’

‘ तो सगळाच त्यांनी ठरवून केलेला बनाव होता !’

‘ कोर्टात चुकीची शिक्षा झाली का ?’

‘ तसे कसे म्हणायचे,–पण पोलिसांनी, त्र्यंबक्यांच्या बाजूने त्या वेळचे सरपंच वगैरे लोकांच्या दबावाने पंचनामा केला.’

परतताना परत त्र्यंबक्यांकडे जातो. त्यांना गावातले लोक काय म्हणतात ते सांगतो. ते म्हणतात की, एवढे देवाचे प्रेम होते तर आता कशाला बहिष्कार टाकला ? आता ढोराने देऊळ बाटवले म्हणून गावचे कुणीसुद्धा दर्शनाला येत नाहीत. दुसरे मंदिर बांधणार आहेत.

मिरजगावला आम्ही जेवण एका खानावळीत घेतो. अगदीच बेचव प्रकार असूनही भुकेपोटी तोही हात मारून खाल्ला जातो.

कोकणगावला पोचतो तेव्हा काका, प्रेमा वगैरे वाटच पाहात असतात. कोकणगाव खूपच किचकट निघते. गावात चारपाच गट. त्यांत राजकारण गुंतलेले. कुणीच माघारीला तयार नसतात. एकमेकांवर केसेस करून मधल्यामध्ये वकीलाची चंगळ चालवण्याची स्पर्धा लागलेली !

एक विशेष गोष्ट. प्रत्येकजण दुसऱ्यावर फिर्याद, चॅप्टर केसेस करताना 'आपल्या बायकोची, बहिणीची, मुलीची इज्जत घ्यायचा प्रयत्न केला' असा आरोप करून जातो ! आपल्या शत्रूची निंदा करण्याच्या भरात आपल्याच बायकोला 'तिच्यावर हात टाकून तिची कशी विटंबना केली' याची अतिशयोक्तिपूर्ण किळसवाणी वर्णने करणारे लोकही त्यांना भेटलेले असतात.

जेवणाआधी निदान दोन मारामारीच्या प्रकरणांत तडजोड निघेलसे वाटत असते, पण जेवणानंतर दोघेही बैठक मोडून जातात. गावातले वयस्कर लोक सांगतात, 'या गावाला भांडण्याची नि एकमेकांच्या उरावर बसण्याची आदत पडलीय. ब्रह्मदेव आला तरी त्यांना सुधारू शकणार नाही !'

कोकणगाव समता दिंडीला अजिबातच थारा देत नाही. मिरजगावचे ते तसे, नि कोकणगावचे हे असे !

आजचा दिवस काही बरा गेला नाही असे वाटते.

दुसऱ्या दिवशी शिरूरला पोचण्याकरता रात्री जामखेडच्या रेस्ट-हाउसमध्ये झोपून निघायचे ठरवून मोटर हाकतो.

रात्री वेगाने मोटर जाताना एक रातांधळा पक्षी मोटरच्या काचे-वर वेगाने येऊन आपटतो अन् मरून पडतो ! काच रक्ताने लाल होते. विषण्ण मनाने आम्ही रक्ताचे ते डाग पाहात राहतो.

प्रकरण दहावे

# पोलिस खात्याची अशी ही ' दक्षता '

मुक्काम : शिऊर.

गावातल्या गटबाजीने गाव पोखरले, जातीयवादाने उग्र स्वरूप धारण केले, पोलिसांनीच ' कुंपणाने शेत खाण्या 'चे धोरण घेतले म्हणजे काय होते, आणि यात दलित कसे भरडले जातात याचे सारे नमुने शिऊर या एकाच गावात भेटतील अशी अपेक्षा नसते.

गावात जातो. सरपंच कालच चारी धामाच्या यात्रेला गेल्याचे कळते ! पोलिसपाटील, शाळेतल्या ' हेड गुरुजीं 'नी बैठकीची व्यवस्था केलेली असते.

शाळेत जाऊन बसतो. लोक जमत जातात. सगळेच भितीला आरामसे टेकून बसायला बघतात. त्यामुळे पुढे खूप जागा रिकामीच राहते. मागाहून तिथेही लोक बसतात. लोकांच्या तोंडात पानतंबाखू असतेच. जागच्या जागी सरकून खोलीतच कोपऱ्याने पिचकाऱ्या निःसंकोचपणे मारीत राहतात. नाक शिकरून डोक्यावरच भितीला पुसतात नि मग पटक्याला, धोतराला हात पुसून साफ करतात.

मी बसल्याबसल्या मागे बघतो. मागची भित ही पानाच्या पिचकाऱ्या, शेंबडाचे फराटे यांनी रंगलेली असते. रुमाल ही चीजच इथे कुणाला ठाऊक नसावी ! नाक पुसायला, हात-तोंड पुसायला– सगळ्यालाच धोतर नाही तर पदर !

सुधीर-दिलीपचे भाषण चालू असते. लोक माना डोलवत राहतात. पटले म्हणून किती, उगाच सवय म्हणून किती, ते कळणे अवघड जाते ! सुधीर, मी,–आम्ही सगळेच विलक्षण शहरी स्वच्छ मराठी बोलतो. इथली ग्रामीण मराठी कळते, पण तरीही अपरिचितच वाटते.

आमची भाषा मराठी. ह्यांचीही मराठी ! तरी पण सांधा निखळल्यासारखे वाटते. सुधीर 'युनोत विजयालक्ष्मी पंडित निग्रोंची बाजू घेऊन भांडायला लागल्या,–तर लोकांनी त्यांना तुमच्या देशात दलितांची अवस्था काय आहे असे विचारले' ती गोष्ट सांगत असतो. त्यांच्यापैकी कुणाला यूनो माहीत असणार ? तरी लोक ऐकत माना डोलवत राहतात. तो उपचार वाटतो.

पण लोक विलक्षण शांतपणे ऐकतात. क्वचित थोड्या वेळाने डुलक्या घेतात.

औपचारिक भाषणे झाल्यावर गावातल्या प्रकरणाकडे वळतो. गटबाजीमुळे असेल, कोर्टकचेऱ्यांत वारंवार गेल्याने असेल, लोक एकदम तयार असतात ! तपशिलाने पोलिसात जबानी द्यावी तशी माहिती सांगतात.

गावातले पाचपंचवीस लोक गट करून आहेत. सरपंच व पोलिसपाटील यांचा गट विरुद्ध बौद्ध श्रीरंग समुद्र यांचा गट, असा जुना झगडा आहे. एकमेकांवर किती तरी दंगलीच्या, चोरीच्या, चॅप्टर केसेस. अक्षरशः दर आठवड्याला एखादी केस असते. एकाने आगळीक केली की दोघे एकमेकांविरुद्ध लगेच केसेस करतात ! भांडण मोठ्या लोकांचे आहे, पण अडकतात मात्र सगळी तरुण पोरे. दोन्ही जातींतली. सभेला कागाळीचा, अदावतीचा रंग यायला वेळ लागत नाही.

'साहेब, ग्रामपंचायत सगळा गाव झाडते बघा, पण महारवाड्याला कधी झाडू लागत नाही, असे का ते विचारा त्यांना !' आम्हांला मध्ये घालून दोन गटांनी एकमेकांना प्रश्न विचारण्याची नवीच तऱ्हा आढळते.

'हरिजन चावडी आठ वर्षे झाली– पडलीय. ठराव करून झाला. सगळे झाले. अजून बांधणे नाही. ह्यांच्या चावडीत बसायला आले तर हाकून लावतात. म्हणतात, तुमची वेगळी चावडी असताना इथे कशाला येता ? पोरांना, म्हाताऱ्या-कोताऱ्यांना खोपटात उठा-बसायला जागा नाही. झोपायला रस्त्यावर पडावे लागतेय.'

काका म्हणतात, 'अनिल, हे खरे आहे. आपल्याला वाटते, खेड्यात कुठली आलीय जागेची टंचाई? पण इथे शहरांपेक्षा जास्त टंचाई आहे. विशेषत: महार-मांगवाड्यावरल्या वस्तीची जमीन भाऊबंदांत वाटली जात राहते, नवीन मिळत नाही. झोपड्या एवढ्याशा होतात. माणसे मात्र १५-२०. मग तरणीताठी जोडपी तेवढी रात्रीची घरात झोपतात. काय किडुकमिडुक घरात ठेवतात, बाकी सगळे घर दिवसभर बाहेरच असते. पावसाळ्यात भयंकर हाल होतात सगळ्यांचे.'

'तेवढे कशाला?' समुद्र मंडळी सांगत असतात, 'दुष्काळात विहिरीवर इंजिन बसवले तर या मराठ्यांनी सांगितले की, आमच्या पाण्याला, दोराला हात लावायचा नाही!'

'म्हारड्याच्या विहिरीत विष कालवले पाहिजे म्हणतात, अन् रात्रीच्या टायमाला उकिरड्यावरची काहीबाही घाण विहिरीत टाकतात. एकदा तर मेलेले कुत्रे विहिरीत टाकले होते. हे खरे विष घालतील म्हणून आम्ही आमच्या आडाचे पाणी पीत नाही! आरोळेदादाच्या पंपावरून आणतो, विचारा दादाला.'

'खोट्या केसेस केवढ्या केल्या विचारा.'

'स्वत:च वस्तू दडवून ठेवतात अन् आमच्या नावाने तक्रार करतात.'

'पहिल्या केसेतून निर्दोष सुटले का दुसरी केस करतात. पोलिस फौजदार पण यांना लागू. तोच यांना कानमंत्र देतोय. इकडे केस भरतो सांगून यांच्याकडून पैसे काढतो, तर तिकडे आम्हांला केस मिटवतो, नाही तर उलटी केस घालू म्हणून आमच्याकडून पैसे दाबतोय! साहेब, तेवढे या जामखेड पोस्टच्या फौजदाराला बदलले की अख्खा गाव सुधारतोय बघा. दोन वर्षांमागे हा कुलकर्णी फौजदार नि पोद्दार फौजदार नव्हते. हेच आगी लावत फिरतात बघा.'

'ह्या फौजदार कुलकर्ण्यानं जामखेडला रांडांकडून मार खाल्ला बघा. गावात चौकशी करा, लोक सांगतील.'

एक म्हातारा उभा राहतो. 'साहेब, ह्यांची म्हणच आहे बघा.— मराठ्याची लेकरे— सोन्याची पाखरे, नि महाराची पोरे— वडाचा पाला!'

'सरपंचाच्या मुलांनी परवा चोरी केली. शिप्याची कापडे त्याच्या घरात सापडली. पंचनामा केला. मागाहून त्याने पैसे देऊन भरपाई केली तेव्हा खटला मागे घेतला!'

'दोन वर्षांमागे जत्रेच्या टायमाला कुस्त्यांचा हंगाम भरला होता. त्या टायमाला आमचा भाऊबंद भगवान समुद्र गर्दीत मिसळून कुस्त्या बघायला बसला होता; तर सरपंच लटकेने त्याला गचांडी धरून काढला.– म्हारड्यांनो, इथे कशाला आमच्यात बसले म्हणून. लक्ष्मण भाऊ तनपुरे अन् दत्तू भाऊ तनपुरे या दोघांनी तर त्याला तिथेच काठीने मारले. फौजदाराने मध्ये पडून मिटवले म्हणून केस केली नाही.'

'सध्या किती केसेस कोर्टात आहेत?'

'बख्खळ! गावात माणूसच नाही बघा असे– की ज्याच्यावर काही प्रकरण नाही. ह्या तारखांपायी मजुरीला जाणे मुष्किल झालेय.'

इतक्या वेळ सगळी बौद्ध मंडळीच बोलत असतात. बाकी गावकरी गप्प असतात, नाही तर रागाने माना वेळावत असतात.

काका म्हणतात, 'बाकी गावकरी गप्प का? तुमची बाजू सांगा. ते सांगतात ते सगळेच काही आम्ही खरे धरून चालत नाही.'

एक माणूस बाजूला थुंकतो. म्हणतो– 'तुमचे जातवाले पडले ते, तुम्ही काय न्याय करणार?'

काका संतापून उठतात. म्हणतात, 'मी इथे कुठल्या जातीचा म्हणून आलेलो नाही. या दिंडीत महार आहेत तसे ब्राह्मण पण आहेत. आम्ही कुणाची बाजू घेऊन नाही आलेलो.'

'तुम्ही जात विसराल हो, पण लोकांनी तुमची जात विसरायला पायजेल ना? ब्राह्मण–महारांनी एक होऊन मराठ्याला ठोकायचे राजकारण चालतेय सगळीकडे!' एक तरुण बोलतो.

मी काही उत्तर देणार इतक्यात एक नाट्यपूर्ण प्रसंग घडतो.

हिरवी चादर पांघरून एक सोळा-सतरा वर्षांचा मुलगा रखडत विव्हळत आत येतो. 'साहेब, माझी काय दैना केली पाहा' असे म्हणून तो चादर खाली टाकतो.

आम्हांला धक्का बसतो !

ओठ सुजलेला. डोळयांभोवती लागल्याने काळे-निळे झालेले. कपाळा-वर खोक. रक्त थांबलेले, पण चेपलेली हळद लाल दिसतेय. तोंडावर वळ.

मी नकळत उठून उभा राहतो.

पुढल्या क्षणी तो अंगावरचा फाटका शर्ट नि चड्डीही काढून टाकतो. भर सभेत दीडदोनशे लोकांसमोर नग्नावस्थेत उभा राहून ढसढसा रडत म्हणतो, 'साहेब, मला कोलदांडा घालून सरपंचाच्या पोरांनी मारले !'

सगळे दिङ्मूढ होतात. त्याचे संपूर्ण शरीर फटक्यांनी, वळांनी भरलेले असते. मांडया–दंडावर चऱ्हाट करकचून बांधल्याचे रक्ताळलेले वळ असतात. अनेक ठिकाणी रक्ताचे डाग नि ओरखडे असतात. संपूर्ण शरीरभर इंचभरही जागा मोकळी नसते,–की जिथे वळ अगर जखम नाही !

'अमानुष !' एवढा शब्द त्या मारहाणीचे वर्णन करू शकेल.

प्रेमानंद त्याला कपडे घालतो. वेदनांनी विव्हळत तो तरुण खाली बसतो.

'कुणी मारले याला ?'

तोच रडता रडता सांगतो, 'सरपंच लटक्याच्या बाबासाहेब विश्वनाथ लटके आणि जगन्नाथ विश्वनाथ लटके या दोघांनी मला काल संध्या-काळला त्यांच्या शेतावर मारले.'

'काय म्हणून ?'

तेवढ्यात दोघे तरुण तिरीमिरीने उभे राहिले.

'त्यांनी आमची झाडे तोडावी, लाकडे चोरावी अन् आम्ही उगा पाहात राहावे का ?'

'तुम्ही कोण ?'

'मी बाबा अन् हा जगन्नाथ लटके. आम्हीच मारले त्याला. पण त्याने चोरी केली.'

'समजा, चोरी केली म्हणून जीव घ्याल की काय त्याचा ?'

'पण मी चोरी केलेली नाही. मी अन् माझी बहीण पडलेल्या काटक्या गोळा करत होतो! तर हे आले, म्हणाले, 'म्हारड्या, आमच्या वावरातून फिरायचे नाही सांगितले तर का आला ?'

मी म्हणालो, 'काटक्या हव्या जळणाला म्हणून आलो.' तर म्हणाले, 'साल्याला मारू या म्हणजे परत यायला नको!'

'माझी बहीण पळाली. त्यांनी मला धरले. त्यांच्यावर अन् त्यांच्या बापावर माझ्या भाऊबंदांच्या केसेस आहेत. तर म्हणाला, म्हारड्या, तुम्ही आमच्यावर केसेस करता, नाही का ? आता एकदम मर्डरचीच केस कर. नि दोघांनी मला धरले. बावाने धरून ठेवले, जगाने जाऊन गाडीचे चऱ्हाट आणले अन् मला बांधले. बाबा म्हणाला, भोसडीच्याला कोलदांडा घालून मारू; तर जग्याने एक बांबू आणला, माझ्या ढांगेतून खुपसला अन् त्याला हातपाय बांधून लाथेखाली तुडवला. मला कोलदांडा घातल्याने हालता पण येईना. लाथ उचलली की अंडावरच हाणायचे ! मग जग्याने चाबूक आणला. उलथापालथा लाथेने करून दोघांनी मारले. शेवटी दोनचार गडी आले. मी बेशुद्ध पडलो; तर त्यांना वाटले मेलो म्हणून. मला उचलून शेताबाहेर टाकले नि पळाले. रात्री भाऊबंदांनी मला जामखेडला दवाखान्यात नेला. तर डॉक्टर गुगळे म्हणाले, माझे डोके दुखतेय; उद्या सकाळी ये. पोलिस-स्टेशनला कंप्लेट दिली, पण फौजदार म्हणला की खडर्याला जाऊन मेडिकल रिपोर्ट आण ! माझ्याकडे पैसे नव्हते. खडर्याला जायचे तर धा रुपये पाहिजेत; मी सकाळी परत आलो, रात्री तिथेच बाजारात झोपलो.'

हिरामणच्या जखमांना एव्हाना साधे आयोडिनही लावले नव्हते. पोलिस, डॉक्टर– सगळे बेदरकारपणे वागले.

आमचा संताप–संताप होतो.

हिरामण तुकाराम समुद्र हे त्या मुलाचे नाव. त्याला घेऊन आम्ही गाडीत बसवतो, सभा स्थगित करतो, आणि जामखेडला जायला निघतो. इतक्यात फटफटीचा आवाज येतो. एक पंचावन्नचा पांढऱ्या केसांचा गृहस्थ उतरतो. 'नमस्कार. माझे नाव फौजदार एन्. जी.

कुलकर्णी. तुम्ही इथे आल्याचे कळले म्हणून चौकशीला जामखेडहून आलो.'

'आमच्या चौकशीचे राहू द्या, ह्या हिरामणची चौकशी आधी करा. प्रेमानंदचा संताप अनावर झालेला.'

ते 'चुक् चुक्' असा उद्‌गार काढतात नि म्हणतात, 'काल जमादाराने मला रात्री सांगितले. हा गेला होता; –नाही तर मी ठेवून घेतले असते.'

'तुम्ही कोलदांडा घालून मारले अशी तक्रार न घेता नुसते मारले असे म्हटले तर चालणार नाही साहेब. गुन्हा गंभीर आहे. कायद्यात कोलदांडा घालून मारणे हा खुनाच्या प्रयत्नात मोडतो. आम्हांला चौकीव नेऊन काय स्टेटमेंट लिहून घेतलेत ते पाहायचेय.' प्रेमानंद सांगतो.

फौजदार कुलकर्णी क्षणभर विचार करतात आणि एकदम आठवल्या-सारखे करून म्हणतात, 'मला जरा खडर्याला जरुरीचे काम आहे. मी निघतो. तुम्ही जामखेडला जा. तोवर मी येतोच.'

आणि चक्क एखाद्या निगरगट्ट माणसासारखे ते निघून जातात.

'फौजदारच पक्का चालू आहे. आपण जामखेडला शहानिशा करू म्हणून पळाला सरळ!'

आम्ही हिरामणला फर्स्ट-एडमधून आयोडिन लावतो नि जामखेडला नेतो.

डॉक्टर गुगळे. जिल्हा परिषदेचे डॉक्टर. त्यांनीच काल डोके दुखतेय सांगून हिरामणला अशा अवस्थेत परत पाठवलेले. आम्ही सातआठ जण धडक मारून त्यांच्या दवाखान्यात शिरतो, तेव्हा ते जरा बावर-तात, पण डोक्याला वेखंडाचा लेप असतो.

'मी याला पाहिले नाही. कंपौंडरने सांगितले. मी परस्पर पाठवले. माझे खरेच डोके अजून दुखतेय. तुम्ही येणार हे काही मला ठाऊक नव्हते तरी हा लेप आहे बघा. गुन्ह्याच्या केसचे मेडिकल रिपोर्ट बनवायची डॉक्टर लोक टाळाटाळ करतात, पण मी काल खरेच आजारी होतो!'

आम्ही वादात पडत नाही. मेडिकल रिपोर्ट तयार करायला सांगतो. एकूण बारा मोठ्या जखमांची, वळांची नोंद होते. चऱ्हाटाचे वळ बारा तास उलटूनही शाबूत असतात. डॉक्टर टेपने वळ मोजतात. मेडिकल रिपोर्ट घेऊन आम्ही चौकीवर जातो.

जमादार उस्मानभाई शेखने तक्रार हिरामणने सांगितली तशी नोंदवलेली नसतेच. हिरामणला लिहिल्यावर वाचूनही दाखवलेली नसते. कोलदांडा, चऱ्हाटाने बांधले याचा उल्लेखही नसतो. नुसते मारले येवढेच. आम्ही परत कँप्लेंट लिहून हिरामणचा अंगठा घेतो. आठदहा तक्रार-अर्जाच्या कॉपीज करून त्या जिल्हा पोलिस प्रमुखांपासून सगळ्यांना पोस्ट करतो. हिरामणला मलमपट्ट्या करून त्या दिवशी दवाखान्यात थांबायला सांगून आम्ही गावात जातो.

गावातले चार प्रतिष्ठित लोक जमतात. प्रकाश कोठारी हे इथले जामखेड मार्केट कमिटीचे चेअरमन. ते सांगतात, 'या इन्स्पेक्टर एन्. जी. कुलकर्ण्याविरुद्ध आम्ही बरेच अर्ज केले. तुम्ही पण दादासाहेबांना जरा सांगा; –हा पूर्वी पुण्याला होता. तिथे दारू प्यायल्याच्या आरोपावरून दोन वर्षे सस्पेंड होता. बदली मागून परत रुजू झाला तो इथे! रोज संध्याकाळी इथल्या पारधी वस्तीत जाऊन दारू पितो, मध्यंतरी वेश्या-वस्तीत जाऊन वेश्यांचीच छेड काढायला लागला. एका वेश्येबरोबर हा अशा अवस्थेत व रस्त्यावर पिऊन पडला होता की गावकऱ्यांनी त्या दिवशी त्याला बडवलाच असता,पण कायद्याचा प्रश्न म्हणून नुसता दम देऊन सोडला. हाच गावागावांत भांडणे लावून दोन्हीकडून लाच खातो.'

प्रकाशभाई तरुणांच्या साहाय्याने गावात बरेच उपक्रम करतात. त्यांना हिरामणच्या प्रकरणाचे कागदपत्र देऊन लक्ष घालायला सांगून आम्ही निघतो.

पण संपूर्ण अंग काळेनिळे पडलेला हिरामण डोळ्यांपुढून हालत नाही.

## प्रकरण अकरावे

# टोपीने घातलेला घोळ

मुक्काम : मक्तापूर.

तालुका : नेवासा.

मक्तापूरचे प्रकरण जुनेच आहे. विधान परिषदेचे सभापती वि. स. पागे यांनी स्वतः गावकऱ्यांशी भेटून तडजोड करायचा प्रयत्न केलेला, पण गावकऱ्यांनी दाद दिली नाही.

त्यात थोडे राजकारण आहे.

रिपब्लिकन पक्षाचे जी. टी. प्रधान आणि काँग्रेसमधले दलित नेते यांच्या स्पर्धेतून इथला संघर्ष चेतवत राहिलाय. रिपब्लिकनवाल्यांनी तडजोडीचा पवित्रा घेतला की काँग्रेसचे दलित अनुयायी तो झुगारून लावतात, तर काँग्रेसच्या नेत्यांनी समेटाचा मसुदा केला की आर्. पी. आय् वाले खो घालतात !

दलितांमध्ये तीन गट. एक बौद्ध–महारांचा. दुसरा ख्रिश्चन–महारांचा. तिसरा मांग–चांभार लोकांचा. सगळ्यांचे मराठ्यांशी सामायिक भांडण; परत आपसांतही. गावकऱ्यांच्या यांच्यावर व यांच्या गावकऱ्यांवर खऱ्याखोट्या बऱ्याच केसेस आहेत.

वादाचे नि मागे मारामारीचेही विषय झाले ते दोन.

एक विहिरीचा, दुसरा मारुतीचा.

इथे एक विहीर आहे. दलितांचे म्हणणे ती सार्वजनिक विहीर आहे. अहिल्याबाई होळकरांनी बांधलेली. ती इथल्या बड्या शेतकऱ्याने जबरदस्तीने बळकावली.

दुष्काळात दलितांची विहीर आटली. गावकरी आपल्या विहिरी बाटतील म्हणून खासगी विहिरीवर पाणी भरू देईनात. शेवटी

दलितांनी ही विहीर अहिल्याबाईने बांधलेली म्हणून सार्वजनिकच आहे; ती आम्हांला निदान दुष्काळापुरती खुली करून मिळावी, असा अर्ज सरकारात केला, नि त्याच वेळी गटागटाने जाऊन पाणी भरले. गावकऱ्यांनी प्रतिष्ठेचा प्रश्न करून विरोध केला. प्रकरण मारामारीपर्यंत गेले. दोघांनी एकमेकांवर केसेस केल्या.

त्यात मारुतीचे प्रकरण घडले.

एका सकाळी मक्तापूरची देवळातली मारुतीची मूर्ती कुणी तरी फोडली. गावकऱ्यांनी दलितांवर आळ घेतला. पण दलितांनी पोलिसांना बोलावून पंचनामा करण्याचे आव्हान दिले. गावकऱ्यांनीच एका भिल्ल पोराकडून गुपचूप ती मूर्ती, दलितांवर खटला भरता यावा म्हणून, फोडून घेतली असा आरोप केला जातो! कारण पोलिस येण्याआत गावकऱ्यांनी घाईगर्दीने पहिली मूर्ती विसर्जित करून नवी मूर्ती स्थापून प्राणप्रतिष्ठेचा समारंभही केला, आणि नंतर तक्रार केली धार्मिक भावना दुखावल्याची. दलितांनी त्यावर आपल्याला मारहाण केल्याची क्रॉस-कँप्लेंट केली. पोलिसांनी येऊन दोन्ही जातींतल्या लोकांपैकी पाचपन्नास जणांना पकडून दोघांवर खटले दाखल केले.

मक्तापूरला पोचताना पोटात कावळे कोकलत असतात.

जेवण होऊन तीस तास झालेत. भेळ आणि दोनचारदा वाटेत लागलेल्या गुऱ्हाळावर तांब्या तांब्या रस आणि गूळ यापलीकडे पोटात काही नाही! फार रस प्यायल्याने दोघांची पोटे बिघडलेली. सकाळी एका हॉटेलात चहाबरोबर मिळालेली वाशाळ भजी कुणालाच खाववली नाहीत. तीच भजी सातआठ जण तिथे चवीने खात बसलेले असतात! मक्तापूरच्या अलीकडे ओढ्यापाशी गाडी अडते. पुढे मैलभर चालत जाण्याशिवाय गत्यंतर नसते.

गावच्या ग्रामपंचायतीचे ऑफिस म्हणजे जवळजवळ गोठाच वाटतो. पडका. बाहेरच कट्ट्यावर लोक बसलेले. सरपंच भाऊसाहेब बाजीराव बरडे स्वागत करतात. तरुण ग्रॅज्युएट झाल्याचे ऐकून बरे वाटते. शेती पुष्कळ असल्याने कॉलेज झाल्यावर गावी परतलोसे सांगतात.

गावातल्या भांडणांबद्दल विचारले, तर 'गावाला रोगच लागलया भांडायचा' म्हणतात. मागाहून कळते, सरपंचही सगळयाच केसेस-मध्ये आरोपी–फिर्यादी आहेत.

सभा चालू असताना चिंतामण मानाजी साळवे नावाचा निळी टोपी घातलेला माणूस तावातावाने बोलायला लागतो. प्रभाकर-काकांना उद्देशून 'या गावात काँग्रेसवाल्यांनी यायचे काम नाही. हा जी. टी. प्रधानांचा गाव आहे. तुम्ही लोकच आग लावता.' वगैरे म्हणायला लागतो.

त्याला आवरता आवरता नाकी नऊ येतात! तो गप्प बसायलाच तयार होत नाही.

'हा गाव आर. पी. आय्.चा आहे. इथे काँग्रेसवाल्यांचे काम नाही.' म्हणून ओरडत राहतो.

'मी काँग्रेसवाला म्हणून नाही तर एक दलित म्हणून आलोय' वगैरे काका सांगू पाहतात. अखेर सभा सोडून मी निघतो.

वादग्रस्त विहिरीवर जातो. चौकोनी आकाराची, पायऱ्यांची अशी ती विहीर असते. अशी वेगळ्या पद्धतीने बांधलेली, कडेला कोनाड्यात कसली तरी मूर्ती असलेली विहीर प्रथमच पाहात असतो.

बरोबरचा दलित माणूस सांगतो, 'साहेब, अहिल्याबाईने बांधलेल्या सगळ्या विहिरी याच नमुन्याच्या आहेत. या गावातल्याही बाकी विहिरी गोल नि बिनपायऱ्यांच्या आहेत. इथेच कशी वेगळी विहीर आली? ही पण अहिल्याबाईचीच आहे.'

विहिरीचे मालक बाळाजी भगवान लहारे यांचे घर बाजूलाच असते. ते आणि त्यांचे भाऊ येतात. त्यांना मी इथलीच विहीर वेगळी कशी विचारतो. ते म्हणतात, तशा नमुन्यात आधीच्या मालकाने बांधली, शिवाय आमच्या हद्दीत आहे. ते सांगतात की, 'हे हरिजन– आम्ही त्यांना पाणी घेऊ देत नाही म्हणून पाणी घाण करायला बघतात. एकदा बाहेर पायरीवर मटणाचे तुकडे सापडले होते.'

योगायोग– समोर विहिरीच्या काठावर त्याच क्षणी एक कावळा सरड चोचीत धरून बसलेला असतो. मी त्या कावळ्याकडे बोट दाखवता लहारेला म्हणतो, 'काय हो, तो कावळा विहिरीवर बसलाय, त्याच्या तोंडातला मेलेला सरडा पाण्यात पडला तर ?' लहारेपैकी एकजण 'अर्‌र् हड् !' असे कावळा उडवून लावत म्हणतो, 'इथे कावळ्यांचा लई तरास बघा. जेवताना पण काहीबाही ताटात पाडत्यात !'

'मग काय करता ?'

'काय करणार ? काढून टाकतो.'

'मग महारांनी मटन नुसते पाण्याबाहेर पायरीवर टाकले तर कशाला एवढे प्रकरण करता ?'

'त्यांचे वेगळे पडते. या भावना असतात साहेब. त्यंच्या हाताचा स्पर्श झाल्यावर बाटलेली चीज खाल्ली, पाणी प्यायलो तर आपल्याला बाट होतो, आम्ही आषाढी–कार्तिकी करतो. धर्माच्या भावना असतात.'

हरिजन वस्तीवर जातो.

'जय ख्रिस्त' असे म्हणून लोक स्वागत करतात. काहीजण 'जय भीम' म्हणतात. ख्रिश्चनांत पुन्हा मेरी मानणारे आणि येशू मानणारे असे दोन गट असतात ! फादर महिन्यातून एकदा येतो. बाहेर पडताना एकजण 'जय भीम' करून जवळ येतो. म्हणतो, 'साहेब, इथे पाद्र्याची फार प्रेस पडते. ते लोक काय काय देऊन ख्रिश्चन करायला बघतात. काय तरी कायद्याने त्यांना बंदी नाही घालता यायची ? आमच्या इथे बौद्ध थोडे नि हे ख्रिश्चनच फार होऊन राहिले बघा.'

त्याला काय उत्तर द्यायचे ? मी तसाच निघतो.

निळी टोपीवाल्याने सभेचा पार विचका केलेला असतो. भांडणे मिटवायची गोष्ट बाजूलाच राहते पण दलितांतच पांढरी टोपी, निळी टोपी जुंपू नये म्हणून सभा बंद करून टाकावी लागते ! सरपंचही काँग्रेसचेच असतात. पण दलित व दलितेतरांत त्यांचा गट वेगळा असतो.

निघताना सरपच म्हणतात,

'ह्या पक्षांच्या राजकारणाने फार नुकसानी झाली बघा गावाची !'

## प्रकरण बारावे

# आमच्या वाट्याला फक्त शब्द व अश्रू

मुक्काम : तरवडी.

तालुका : नेवासा.

समता दिंडी काढायची. कल्पनाच मुळात डॉ. बाबा आढावांचे ' एक गाव : एक पाणवठा 'विषयक लिखाण ' साधने 'त वाचून सुचलेली. डॉ. बाबा आढावांनी तरवडीची लिहिलेली हकिगत काळजाला भिडलेली. त्यामुळे तरवडी जवळ आले तसे अस्वस्थ वाटायला लागले.

तरवडीत उतरताच आम्ही गावात जातो. गावकरी जमलेले असतात. प्रभाकरकाका सभा वगैरे सुरू करतात.

मी, माधवराव आणि सदाशिवराव पाटील यांच्याबरोबर त्यांच्या घरी जातो.

गावची वस्ती तेराशे. पैकी ८०० माळी समाजाचे. त्यामुळे महात्मा फुल्यांचा फोटो घराघरांतून. मुसलमान शंभर. चांभार, मांग वगैरे दोन-अडीचशे. नव्याने आलेले ख्रिश्चन महार सुमारे पन्नास.- अशी वाटणी. बाकी लिंगायत वगैरे.

सत्यशोधक समाजाचे दीनबंधू हे मुखपत्र तरवडीहून प्रकाशित व्हायचे. महात्मा फुल्यांच्या मागे सत्यशोधक चळवळ ज्यांनी जिवंत ठेवली त्या कृ. पा. भालेकरांचे दत्तक गेलेले चिरंजीव मुकुंदराव पाटील यांनी स्वतःमुद्दाम ग्रामीण भागात तरवडीला प्रेस काढून हे साप्ताहिक चालवले. माधवराव अन् सदाशिवराव ही त्यांची मुले. आता तीही वयस्कर झालीत.

पाटील बंधू एका जुन्या भव्य वाड्यात घेऊन जातात. प्रेसचे अवशेष, जुन्या अंकांचे गठ्ठे, सत्यशोधक समाजाच्या काही पुस्तिका दाखवतात. काही पुस्तके भेट देतात.

डॉ. बाबा आढाव, विजय तेंडुलकर, गेल ओमवेट बाई वगैरे बडी मंडळी कशी आली, हा प्रेस–पुस्तके–अंक पाहून त्यांनी कशी स्तुती केली वगैरे सांगतात.

शेवटी सगळे दाखवून विचारतात, 'बघा, सत्यशोधक समाजाचे एवढे काम आम्ही पिढ्यान् पिढ्या केले आणि आता दलितांवर हल्ला केला म्हणून आमच्यावरच खटले भरलेत !'

विषयच निघाल्याने आम्ही तरवडीला झालेल्या दंगल प्रकरणात नेमके काय घडले ते विचारतो.

सदाशिवराव अन् माधवराव सांगतात त्याचा सारांश असा की, शांतवन इंगळे आणि रायभान खरात हे दोघे ख्रिश्चन महार आणि त्यांचे कुटुंबीय इथे तरवडीला आले. याआधी ते काळेगावला राहात होते. जायकवाडी प्रकल्पात त्यांची घरे धरणाच्या पाण्याखाली गेल्याने सरकारने इथे त्यांना घरे बांधून दिली. त्यांनी इथे आल्यावर दारूच्या भट्ट्या नि जुगारीचा अड्डा सुरू केला. गावाच्या लोकांवर दादागिरी करायला लागले. आम्ही विहिरीवर मना करत नव्हतो तरी महार म्हणून पाणी भरू देत नाहीत, अशी तक्रार करत. ह्यांच्या घरातली दोन मुले मुंबईला कॉलेजला होती. तीही गावावर दाव टाकीत. त्यांनी गावावर अदावती घ्यायला सुरुवात केली. दारू–जुगार अड्ड्यावर भांडणे व्हायला लागली. म्हणून सदाशिवरावांनी एक दिवस त्यांना हटकले, तर त्यांनी शिव्या दिल्या. म्हणून जाब विचारायला ते त्यांच्या घरी गेले तर त्यांना कोंडून ठेवले. शेवटी रात्री गावकऱ्यांनी त्यांना सोडवून आणले, आणि सकाळी या दोघांच्या दारूभट्ट्या बंद पाडायला म्हणून गावकरी एकत्र जमून गेले;–तर मारामारी झाली. दोघांकडे लोक जखमी झाले. पण पोलिसांनी मात्र गावकऱ्यांनाच पंधरा दिवस तुरुंगात डांबले. आता दोन्ही लोकांवर फिर्यादी झाल्या आहेत, वगैरे.

सदाशिव व माधवरावांसकट गावातल्या पन्नास-एक जणांवर खटले होते; आणि त्यांत बौद्ध, मांग, न्हावी, लिंगायत, माळी– सगळ्या

जातींचे लोक होते. ख्रिश्चन महार विरुद्ध सगळा गाव असा हा झगडा झाला होता.

पाटील बंधूंपैकी सदाशिवरावांचे एक बोट दंगलीत मोडलेले. ते दाखवून ते म्हणतात, ‘ आम्हांला त्यांनी रात्री मारलेच असते ! ’

पाटीलबंधूंची बोलण्याची ढब आकर्षक असते. आपण नगरला सावतामाळी बोर्डिंगातल्या दलितांना कशी मदत करतो, सत्यशोधक आंतरजातीय विवाहांत कसे पौरोहित्य केलेय वगैरे खूप सांगतात. ‘ दीनबंधू ’तले उतारे, फुल्यांचे अखंड त्यांचे तोंडपाठ असतात. भराभर बोलता बोलता उतारे देऊन ऐकणाऱ्याला प्रभावित करतात.

श्रीनिवास म्हणतो, ‘ हे लोक दंगल करतील असे वाटत नाही ! ’

प्रभाकरकाकांना सांगतो,‘ त्या इंगळे–खरातांना लगेच भेटायला पाहिजे. सत्यशोधक, दीनबंधू, हे बोलणे–वागणे आणि झालेल्या अत्याचाराचे वर्णन त्यामुळे गोंधळ उडालाय. खरेच यांनी काही केले असेल का ? ’

‘ आपण दोन्ही बाजू ऐकून घेऊन मत बनवायला पाहिजे. अशा झगड्यात कधीच कुणी समतोल बोलत नाही. दुसऱ्याची चूक दाखवून आपल्या गुन्ह्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला जातो. इथे दंगल झाली हे खरे आहे. अख्ख्या गावाने एक होऊन त्या दोन कुटुंबांचा काटा काढायचा प्रयत्न केला. पण कारण केवळ एवढेच नाही. माझी कळलेली माहिती अशी आहे की, गावातले सगळेच लोक दारू प्यायला त्यांच्याकडे जात होते. इंगळे–खरात दारू गाळत हे खरेच, पण त्या भट्टीवर दारू प्यायला जाणाऱ्यांत मुकुंदरावांचीही ही दोन्ही मुले असायची, अशी माझी माहिती आहे. यांना दारू विकून त्या दोघांनी कमवलेला पैसा गावाच्या डोळ्यांवर येत होता. शिवाय गावातली सीलिंगच्या पुढली जमीन त्यांना मिळणार वगैरे बातम्या होत्या. गावाबाहेरचे लोक येऊन इथे बस्तान बांधतात याचे वैषम्य होते. आणि दारूवरून गावाशी भांडणेही चिक्कार होती. पण गावाने कट रचून त्यांना हाकलायचे ठरवले हे उघड आहे ! ’

गावात आम्ही एकेकजण एकेका घरी जेवायला जातो.

जेवण झाल्यावर गाव ओलांडून पलीकडे फर्लांगभर अंतरावर असलेल्या इंगळे, खरातांच्या वस्तीवर पोचतो.

आम्ही गावात आल्याची बातमी त्यांना आधीच लागलेली असते. वस्तीवर पोचताच, खूप काही इथे घडून गेले असल्याच्या खुणा जागोजाग दिसत असतात.

दरवाजे अर्धवट जळालेले, चौकटी निघालेल्या, छपरावरचे काही सिमेंटचे पत्रे चक्काचूर झालेले, काही नाहीतच, काही आग लागल्यावर असतात तसे काळवंडलेले आहेत. काही चिरेही निखळलेत. आठदहा घरे कमीअधिक प्रमाणात अशीच. पक्की दगडाची नवी बांधलेली घरे आग लागून भंगावीत तसे एकूण दृश्य.

आसपासच्या दहा-बारा घरांतले लोक आम्हांला पाहून इंगळचांच्या घरात जमायला लागतात. हे सगळे काळेगावहून जायकवाडी धरणाने निर्वासित झालेले. बहुतांशी इंगळे आणि खरात याच दोन कुटुंबांतले. काही खुरडत रखडत येतात.

‘आमचे पत्र पोचले का ?’

‘नाही. आमचे टपाल गावातल्या पोस्टातून मिळत नाही ! पोस्टमास्तर दाबून ठेवतो नाही तर उशीरा देतो. सरकारी पत्रे पण उशीरा येतात. आमची तर आम्ही इथे टाकतच नाही !’

‘आम्ही गावात जाऊन आलो. मी तर मागेही इथे आलोच होतो. ही मुले मुंबईहून आली आहेत.’

‘शांतवन, काय काय कसे कसे झाले आम्हांला ऐकायचे आहे...’ मी सांगतो.

शांतवन, रायभान, भिवसेन, चंद्रभान, फुलाबाई, असे आठ-दहा जण एकमेकांना स्मरण देत दुवे जुळवत सांगू लागतात.

‘बारा आणि तेरा जुलैला घडले बघा सारे. आम्ही काळेगावहून येऊन सात-आठ महिने झाले होते. गावाशी आमचे काही वाकडे नव्हते. आम्ही धंदा करत होतो. आपले पोट भरत होतो. आमची सगळी पोरे शिकलेली आहेत. दोघे मुंबईला कॉलेजला असतात. गावकऱ्यांना

आम्ही चांगले राहायचो ते पाहवेना. 'म्हारडी टेचीत राहतात. गावापेक्षा त्यांचाच रुबाब जास्ती झाला!' असे म्हणायचे. आम्ही भूमिहीन म्हणून सरकारकडे जमिनीसाठी अर्ज केला होता. इथली गावठाणाबाहेरची सरकारी जमीन आम्हांला मिळण्यातली होती, पण गावकऱ्यांपैकी कुणी कुणी ती बळकावली होती. आम्हांला ती मिळणार म्हटल्यावर गाववाले म्हणाले, 'त्यांची वस्तीच इथे नाही पाहिजे. हे उपरे आहेत.' त्यांनी अर्ज दिला की, हे गावात दारू गाळतात; दादागिरी करतात, यांना घालवा. आता आमच्यापैकी कुणी दारू गाळते हे खोटे नाही, पण दारू काही आमची आम्ही पीत नव्हतो; उलट गावच प्यायचा. आम्ही धंदा स्ट्रॉंग करायचो म्हटल्यावर गावातल्या जुन्या टयूबवाल्यांचा धंदा बसला. ते पण आमच्यावर डूख ठेवून राहिले! ही मुकुंदराव पाटलाची दोन्ही पोरे पहिल्यापासून दारूचे शौकीन. सदाशिवराव तर अजून रोज 'जागृती' आणून पितात. गावाला माहीत आहे. त्यांची दारू पिऊन आमच्याच वस्तीवर शिवीगाळी चालायची. आम्ही गाववाले म्हणून सोडून द्यायचो.

तर १२ तारखेच्या आधी ह्या सदाशिवरावाने धिंगाणा घातला, आम्ही म्हटले, प्यायची तर पी. हवे तर फुकट पी, पण शिवीगाळी करू नको. तशी तो नि त्याचे दोस्त भडकले. म्हणाले, ह्या म्हारडयांचा त्रासच मिटवून टाकू... आणि पाचपंचवीस लोक काठया घेऊन बारा जुलैच्या रात्री आले!

रात्रीच्या अंधारात त्यांना दिसेना; त्यांच्या काठया आपसांतच लागायला लागल्या. त्यातच सदाशिवरावांचे बोट मोडले. त्या वेळी आम्ही पण गप्प बसलो असे नाही. अंगावर हात टाकल्यावर आम्ही पण थोडा प्रतिकार केला. शेवटी आमच्यापुढे काही चालत नाही असे पाहिल्यावर ते 'पळा, पळा–' म्हणत पळून गेले!

आम्हांला प्रकरण मिटले असे वाटले. दारूच्या नशेत भांडली असतील म्हणून आम्ही गप्प बसलो. रात्री बाराच्या वक्ताला दवंडी ऐकू आली म्हणून आम्ही वस्तीवरले जमून पाहू लागलो तर शाळेपुढे टेंभे–मशाली घेऊन अख्खा गाव जमलेला.

टेंभ्यांच्या उजेडात तिकडे पटांगणात माणसंच माणसं दिसत होती. आमची वस्ती एकीकडे. एवढी बारा-पंधरा घरेच. बाया-माणसे म्हणाली, आपण अंधारात पळून जाऊ. पण वाटेत त्यांनी गाठले तर? म्हणून आम्ही वस्तीतच सारी एकत्र जमून ते लोक काय करतात हे पाहात राहिलो...तर कोणकोण भाषण करत होते. काहीबाही सांगत होते. इथून नुसता गोंगाट एकू येत होता. आम्हांला वाटले, आत्ताच येतील, पण थोड्या वेळाने सगळे परत घरोघर गेले. वाटले तेवढ्या-पुरतेच झाले सगळे.

पण सकाळी उजाडताच रायभानच्या पोरांनी बोंब ठोकली. सगळ्यांच्या दारांवर खडखडावले. आमचे लोक अंथरुणातून बाहेर धावले तर आमच्या वस्तीच्या चारी बाजूंनी गोल करून माणसे जमत होती. एक नाही– दोन नाही, पाच-सहाशे माणसे वस्तीभोवती गोंगाट करीत होती. हातात काठ्या, भाले, कोयते, कुऱ्हाडी, रॉकेलची डबडी... आमच्यात पळापळ झाली. लोकांनी सगळी बाया–पोरे इंगळ्यांच्या भक्कम घरात घातली. रायभान–शांतवनने त्या घराला आतून टाळे मारले नि बाकी तरुण माणसे वेगवेगळ्या घरांत पळाली. पाच-सहाशे लोकांशी भांडणे शक्यच नव्हते. आतून दरवाजे लावून पत्र्याखालच्या भोकातून आम्ही बघत राहिलो.

दहापंधरा मिनिटांनी लोकांनी शिळा घातल्या अन् प्रत्येकाने हाता-खाली मिळेल तो दगड घेऊन फेकायला सुरुवात केली. आभाळ कोसळून पडावे तसे दगड पडले. पण इकडले दगड तिकडे त्यांच्याच लोकांना लागायला लागले तशी म्हणाले, 'अरे दगड मारू नका, घरे फोडा!' आणि दगड थांबवून ते वस्तीत घुसले. कुदळी पहारी घेऊन त्यांनी दाराच्या लाकडी चौकटी, खिडक्यांवर हाणायला सुरुवात केली. बाकी लोक दाराशी उभे राहून बोळे रॉकेलमध्ये भिजवून पेटवायचे अन् छपराखालच्या भोकातून घरात टाकायचे! काही माणसे छपरा-वर चढली. वर सिमेंटचे पत्रे होते. त्यांनी कुदळीने पत्रे फोडले. खाली आत माणूस लपलेला दिसला की त्याच्या अंगावर बोळा पेटवून फेकायचे. म्हणायचे, 'बाहेर ये!' तो इकडे तिकडे सैरावैरा पळत

राहायचा, की वरतून दगड हाणायचे ! उंदीर घुशी बिळात पेटवून माराव्या तशी गत चालवलेली. काही माणसे घाबरून बाहेर आली, काही माणसे त्यांनी दार फोडून बाहेर काढली. माणूस बाहेर आला की शेपन्नास माणसे त्याच्यावर साप मारायला निघावी तशी जीव घेऊन तुटून पडायची. त्याच्या अंगातून रक्त वाहायला लागले की त्याला मेलेल्या कुत्र्यासारखा हातपाय धरून नागवा करून मातीवरून फरफटत न्यायची, अन् झाडाला खोडाला बांधून त्यावर लिंबूपाणी पिळायची ! अशी घराघरातून माणसे वेचून काढली.

शेवटी सगळी बायकापोरे होती ते घर राहिले. मुद्दामच मागे ठेवले होते. चार-पाचशेंचा सगळा जमाव त्या घराला वेढा घालून ओरडायला लागला. 'च्यायला– म्हारड्यांच्या बायांना बाहेर काढा. भोंगळे ( नागवे ) करून धिंड काढा,– तिखट भरारे गांडीत !'

बाया आत ओरडायला लागल्या. पोरे रडायला लागली. परत लोक छपरावर चढले आणि गोळे पेटवून फोडलेल्या छपरातून आत टाकायला लागले. बाया घाबरल्या तशी रायभान–शांतवन पुढे होऊन म्हणाले, 'आमचा जीव घ्या, पण बाया–लेकरांना हात लावू नका.'

ते बाहेर पडताच एकाने रायभानच्या पायावर कुऱ्हाड मारली. तो फांदी तुटून कोसळावा तसा दारातच कोसळला. त्याला सावरायला पुढे झालेल्या शांतवनच्या तोंडावर फरशी बसली. पाठीवर कोणी तरी पहार मारली. दोघेही जागीच पडले. तशी लोकांनी त्यांना फरफटत नेऊन झाडाखाली फेकले. मग लोकांनी बायांना बाहेर यायला सांगितले. घरातल्या गाद्यांवर पेटते बोळे पडल्याने त्या पेटल्या, तशी आरडत ओरडत बाया बाहेर पडल्या. चार महिन्यांच्या पोरापासून सात-आठ वर्षांच्या पोरीपर्यंत घरात पोरे होती. बाई बाहेर पडली की लोक तिचा पदर धरून लुगडे फेडायला बघत. ती किंचाळत पळायला लागली की तिचे कपडे ओढत आणि हातात चुलीत घालायची असतात तशी पेटलेली लाकडे धरून त्याने अंगावर डागत ! घरातल्या बायांच्या मागे लोक लाकडे

धरून धावत आणि पायावर, मांडीवर, पोटावर, पाठीवर, छातीवर-सुद्धा लाकडाने चटके देत. एका बाईच्या हातातले पोर हिसकावून घेऊन त्या चिमण्या लेकराच्या ढुंगणावरसुद्धा जळते लाकूड टेकवले ! पोरांच्याही अंगावर डागण्या दिल्या. बायांना घेऊन झाडाखाली जमवले. लोक म्हणायला लागले, या सगळ्या बायांना नागव्या करून गावातून धिंड काढू या. बाया त्यांच्या पाया पडल्या. झाले एवढे पुरे म्हणाल्या.

एवढ्या गडबडीत पहाटे लोक जमत असतानाच संडासला म्हणून शेतावर गेलेला एक पोरगा परतताना गर्दी पाहून पळाला होता. तो तीन मैल पळत रोडवर गेला आणि तिथून पोलिस चौकीवर पोचला. हवालदाराने त्याच्याबरोबर दोन पोलिस दिले. त्यांना घेऊन तो आला. पोलिस येताना पाहून गावकरी पळाले. मग पोलिसांनी कुमक मागवली. शंभर एस्. आर. पींनी गावाला तळ दिला. लोकांना पकडले. ४६ जणांना तुरुंगात टाकले. पण काय न्याय पाहा, दंगलीची केस आमच्यावर पण केली ! चार महिने एस्. आर. पी. होते तोवर चिंता नव्हती. सरकारने आम्हांला हजार रुपये पण दिले होते. आता पैसे संपले. एस्. आर. पी. गेले. बंदोबस्त उठल्यावर परत गावकऱ्यांची दादागिरी सुरू झालीय. आमचा धंदा बसला. घरात होते नव्हते गेले. आता गावात आम्हांला जायला बंदी आहे. उपाशी मरायची पाळी आलीय. हे तर काही नाही साहेब, आम्ही हाडाचे बळकट म्हणून सगळे जगलो; पण सिव्हिल हॉस्पिटलात नगरला आठ दिवस नुसत्या पट्ट्या बांधल्या होत्या. शेवटी दादासाहेब रुपवते हॉस्पिटलात आले. त्यांनी सर्जनला सांगितले. तेव्हा प्लास्टर केले. कसे केले तेही– तर हे असे ! आमच्या सगळ्यांचे हातपाय जन्माचे निकामी झाले बघा. आता म्हणतात, प्लॅस्टर बरोबर झाले नाही म्हणून हात सुकले,–हे बघा साहेब !'

शांतवन, रायभान, फुलाबाई एकेकजण आपला पाय धोतर वर करून दाखवतो... मांडीपासून संपूर्ण सुकून फक्त चामडी आणि हाडे शिल्लक असतात. दुसरा त्याचा पाय पुढे करतो. नुसते सुकलेले हाड. फुलाबाई

म्हातारी तिचा पदर दूर करून हात दाखवते. संपूर्ण हात सुकून फक्त हाड शिल्लक.

'साहेब, हा तुटलेला ओठ बघा...'

'हा फाटलेला हात बघा...'

'साहेब, हा एवढासा पोरगा त्याचे अख्खे ढुंगण डागाने काळे पडलेय बघा...'

'तुमच्याबरोबर कुणी बाई नाही, नाही तर कुणा पण बाईला अंगावर किती ठिकाणी डागलेय ते दाखवले असते.'

'बायांची अब्रू तर अशी लुटली की कोणत्या तोंडाने बाई सांगणार? दहा-दहाजण कुत्र्यासारखे बाईला धरून लचके तोडायचे नि डागायचे!'

'माझे हे पोर बघा जन्माचे पांगळे होऊन गेले. कमरेखाली त्याचा पायच गेला. खुरडत फिरतेय...' आणि ती म्हातारी ढसढसा रडायला लागते! तिचा मुलगा, त्याचा भाऊ, घरातल्या बाया–सगळे धाय मोकलून रडायला लागतात.

समता दिंडीत मुलेही व्याकूळ होतात. प्रेमानंद अक्षरशः हंबरडा फोडतो. कुणी तरी समोर मरून पडावे तसा. आणि शांतवनच्या गळ्यात पडतो. घरभर हलकल्लोळ उडतो. उभी वस्ती धाय मोकलून रडत असते.

किती तरी वेळ अश्रू वाहात राहतात.

आम्ही जड मनाने जायला निघतो.

शांतवन हात धरतो आणि म्हणतो, 'आजवर आमच्या वस्तीवर जो जो पाहुणा आला तो तो ढसढसा रडून गेला; पण अद्याप आमच्या वाटयाला शब्द आणि अश्रू यांच्याशिवाय काहीच आले नाही!'

प्रकरण तेरावे

# तिचे पुढे काय होते ?

मुक्काम : दहिगावशे

तालुका : शेवगाव.

दहिगाव या नावाची बरीच गावे असतात. हे शेवगाव तालुक्यातले म्हणून पुढे –शे अक्षर जोडलेले

गावात पोचतो. सार्वजनिक विहिरीवर ‘ ही विहीर सर्व जाती-धर्मांच्या लोकांना खुली ’ असल्याची नवी कोरी करकरीत पाटी लावलेली असते. शाळेत फळ्यावर फुल्यांची वचने वगैरे लिहिलेली असतात.

सभेला सुरुवात होईपर्यंत मी शाळेचे रजिस्टर पाहात बसतो; तर त्यात जातिवाचक माहितीत असंख्य चुका आढळतात. हिंदू-बौद्ध, महार-बौद्ध, ख्रिस्ती, महार वगैरे लिहिलेले असते ! मास्तरांना चुका दाखवत असतानाच प्रभाकरकाका सांगतात, या गावात मध्यंतरी एका दलित स्त्रीवर बलात्कार झाला होता. मीच येऊन ते प्रकरण कोर्टापर्यंत पोचवले होते. जरा गावात चौकशी करून ये.’

मी लगेच बाहेर पडतो.

साखराबाई नावाच्या बौद्ध स्त्रीवर बलात्कार झाल्याच्या व त्या संदर्भात भिकूशेट पांडू गवळी यांच्यावर खटला भरल्याच्या बातमीचे कात्रण काका मला देतात.

गावातल्या काही तरुण पोरांशी सुधीर–दिलीपने दोस्ती जमवलेली असते. मी प्रथम त्यांना गाठतो.

‘ साखराबाईला ओळखता ? ’ त्या मुलांना मी विचारतो.

'केव्हा पाहिली होती ? ती फार कुणाला माहीत नव्हती. तिचे ते प्रकरण झाल्यावर माहीत झाली.'

'खरंच बलात्कार झाला ?'

'वाद नाही. त्या गवळयाच्या बायकोनेच तिला बाहेर काढले.'

'ती बाई कशी होती ?'

'गावातल्या तसल्या बायांपैकी ती बिलकुल नव्हती. तशा इथं कुणाकुणाच्या ठेवलेल्या बाया पण आहेत. ती पोरगी इथं तिच्या मावशीकडे पाहुणी म्हणून आली होती. दुपारी चहाची पत्ती आणायला एकटी गेली तेव्हा दुकानदारानं चान्स घेतला !'

'पण दुकानदाराचे लग्न झालेले आहे ना ?'

'तर ! दोन पोरे पण आहेत. त्याची बायको महिन्याची बाळंत होती म्हणून पेटला असेल.'

'ती बाई कुठे आहे ?'

'काय माहीत नाही.'

'अन् तो माणूस ?'

'त्याची आजच कोर्टात तारीख आहे, म्हणून गेलाय. त्याचा भाऊ भेटेल तुम्हांला.'

गल्ली-बोळातून वळून जात मी गवळयाच्या घरी जातो. त्याचा भाऊ भेटतो.

'तुमच्या भावावरच्या खटल्याच्या संदर्भात भेटायला आलोय.'

गवळी माहिती सांगतात. म्हणतात, 'आम्ही मूळचे इथले नाही. जमीन विकत घेतली, दुकान टाकले नि वस्ती केली. पण इथल्या काही लोकांशी आमचे जमिनीच्या कब्जावरून भांडण झालेय म्हणून त्यांनी त्या पोरीच्या नावाने आमच्यावर खोटाच आळ घेतला. त्या पोरीला माझ्या भावाने केव्हा दुकानावर आली असताना पाहिली असेल तेवढीच.'

'अजिबातच काही घडले नाही म्हणता का ?'

‘त्या दिवशी पोरगी आली, तर भाऊ म्हणाला, साखर उधार देत नाही. तर लगेच आरडाओरडा करत गेली.’

‘तुमच्या त्या भावाची बायको आहे का घरात ?’

एक बाई पदर डोक्यावर घेऊन बाहेर येते. ही द्वारकाबाई !

‘बाई, तुमच्या नवऱ्यावर खोटा आळ आला का काही घडले होतं ?’

बाईचा खूप म्हणजे खूपच पडलेला चेहरा बोलका असतो. ती नजर चुकवत पोरांकडे पाहून अपराधी खंतावल्या स्वरात म्हणते, ‘ह्यांनला मी ओळखते, असले पाप त्यांच्या हातून घडायचे नाही.’

मी तिथून त्या साखराबाईच्या मावशीच्या झोपडीवर जातो. मावशी नसते, पण तिचा नवरा भेटतो.

‘तुमच्या भाचीच्या प्रकरणात चौकशी करायला आलोय.’

‘ह्या गवळ्याने तिच्या जन्माचे वाटोळे केले बघा. दुपारच्याला माझ्या बायकोने तिला चहापत्ती आणायला पाठवले, का थोड्या वेळाने रडतच आली. हे कपडे फाटलेले. केस वरवाडलेले. गवळ्याने असे असे केले म्हणाली. गवळ्याच्या बायकोने बोंबलून दार उघडायला लावले, पन तंवर डाव साधला होता !’

‘मुलीचे लग्न झालेय ना ?’

‘पहिल्या नवऱ्याने नांदवली नाही. आता म्होतुराचा दुसरा नवरा आहे. तो पैठण कातपूरला मजुरी करतो.’

‘मुलगी कुठेय ?’

‘तिच्या नवऱ्याने नेली.’

‘त्याला कळले का हे प्रकरण ?’

‘कळले नाही म्हणून तर नेली.’

‘तुमच्यावर काही दडपण आले होते का ?’

‘तर तो गवळी पाचशे रुपये घे अन् मिटवून टाक म्हणत होता. प्रभाकरराव रुपवते आले होते; त्यांनी पोलिसाला सांगून खटला भरायला लावला.’

'तुमचा अन् गवळ्याचा जमिनीवरून तंटा आहे का ?'
'आमचा नाही, भाऊबंदांचा आहे. पण पोरीच्या प्रकरणाचा काय पण संबंध नाही. ती इथे पाहुणी आलेली होती. तिची आई मेलीय म्हणून मावशीकडे माहेरपणाला आली होती.'

सरपंचांना भेटतो. ते म्हणतात, 'असे काही तरी घडले असे ऐकले, पण खरेखोटे आम्ही कसे सांगणार ?'
दुकानही परत जाऊन पाहून येतो. शेजारी घर. बाजूला दुकान, अन् आतल्या बाजूला किंचित अंधारी खोली. तिथे पोती ठेवलेली. बलात्कार या आतल्या खोलीत झाला अशी तक्रार होती. मनातल्या मनात हे कसे घडले असेल याची कल्पना करून पाहतो. बाजूचे घरात उघडणारे दार बंद असेल. ती चहापत्ती मागायला आली असेल. याने तिला 'आत ठेवलीय– चल,' म्हणून नेली असेल; पटकन दार लावले असेल. शक्य वाटते.
आमच्या मोटरचे ड्रायव्हर रामभाऊ येतात. म्हणतात, 'अनिलराव, तुम्हांला बलात्कार झालेल्या त्या पोरीला भेटायचेय ?'
मी आश्चर्य आणि अविश्वासाने पाहतो.
'मी दाखवतो.'
'कुठं ?'
'रात्री शिरपूरला मुक्कामाला जाऊ तेव्हा.'

शिरपूरला पोचल्यावर बाकी सगळ्यांना बंगल्यावर सोडून मी आणि रामभाऊ बाहेर पडतो. रामभाऊ मला ज्या वस्तीत घेऊन येतात त्या वस्तीचे रंगरूप गावापेक्षा निराळे दिसते. नखरेल बाया येत-जात असतात. कुणी कुणी खुणा वगैरे करत असतात. दोनचार घरे गेल्यावर रामभाऊ एका घराशी थांबून 'मालनबाई !' अशी हाक मारतो.
'गुंतता हृदय हे'मधल्या पद्मा चव्हाणसारखी दिसणारी एक बाई बाहेर येते. नमस्कार करते. माझ्याकडे पाहात रामभाऊंना म्हणते,

'काय कामगिरी काढली ?'

'ती दहिगावशे 'ची रेप झालेली पोरगी कुणाकडे आहे ?'

'आहे की. चौथ्या घरातल्या तोंडमावशीकडे राहते; का ?'

'ह्यांना तिची मुलाखत घ्यायचीच.'

'कोण हे ?'

'पत्रकार आहेत.'

'मग साहेब, आमची पण घ्या की. इथले लोक फार छळत्यात बघा आम्हाला. इथलं पोलिस–फौजदार तर फुक्कटच्या फाकट मजा करून वर येताजाता तुरुंगात धाडायच्या धमक्या देतात. सिध्यानं तर माझ्या हातावर चाकू मारला होता. मी कोर्टात केस केली तर फौजदार मला रोज छळतात ! येताजाता बसायला येतात नि निघताना रांडे, तू धंदाच कशी करतीस ते बघतो, म्हणतात. तुम्ही पेपरात त्यांचं छापा. पुढच्या टायमाला याल तर आणखी गंमती सांगीन.'

'फालतू बडबड करू नकोस. त्या पोरीला घेऊन बंगल्यावर ये. तिच्या बापालाही बरोबर यायला सांग.' रामभाऊ तिला सांगतात.

आम्ही परत येतो.

सकाळीच मालनबाई एका खूप थकलेल्या म्हाताऱ्या अन् विशीतल्या काळचा-गबाळचा मुलीला घेऊन येते. ही ती साखराबाई !

'सांग बाई, सांग तुझी कर्मकथा.'

ती मुलगी गुडघ्यात मान घालून गप्प बसते. तिचा बाप तिला थोपटल्यासारखे करतो.

मी बाकीच्यांना बाहेर जाण्याची खूण करतो. ती साखराबाई, तिचा बाप, मालनबाई, आणि मी– आम्हीच चौघे राहतो.

मालनबाईने परत तिला–'सांग बाई, सांग; साहेब तुला मदत करणारेत.' म्हणून खूण केल्यावर ती त्रोटक शब्दांत आखूड आवाजात बोलायला लागते.

'मी मावशीच्या सांगण्यावरून चहापत्ती आणायला गेले. मला काही कल्पना नव्हती. गवळी एकटाच होता. मला म्हणाला, आत ये– पत्ती

देतो. मी आत गेल्ये तर दार लावून घेतलेन आणि मला एकदम धरून पाडली आतल्या पोत्यापाशी, आणि कपडे फेडून हे असे केले...मी ओरडले, पण त्याने धोतराचा बोळा माझ्या तोंडात कोंबला. सगळे झाल्यावर काढला. मी रडायला लागले मोठ्याने, तशी त्याची बायको आली आन् तिने दार वाजवले. मग गवळ्याने दार उघडले. तिला म्हणाला, ' मी पत्ती आणायला गेलो तर हीच भोंगळी होऊन माझ्या गळ्यात पडली ! बायकोने मला माझे लुगडे उचलून दिले आणि गुंडाळून बाहेर लोटले. मी रस्त्याने रडतच घरी गेले. गवळ्याने इतकी जबरी केली की माझ्या मांडीतून रक्त वहात होते. घरी पोचले तर रक्ताने पातळ भरले होते. मावशीला असे-असे झाले म्हणून सांगितले. तिने लोकांना बोलावले. सरपंचाला सांगितले, पोलिसपाटलाकडे तक्रार केली. पोलिसपाटलाने मला दवाखान्यात नेले. डॉक्टरने रिपोर्ट घेतला. खाली चार टाके पडले. आठवडाभर दवाखान्यात जावे लागत होते. पोलिसाने पहिल्यांदी नुसताच धक्का मारला असा गुन्हा नोंदला. गवळ्याने पैसे दिले होते म्हणे. पण नंतर पुढाऱ्यांनी येऊन सांगितल्यावर ' रेप 'ची केस केली. पोलिसकडे गेले म्हटल्यावर नगरला सगळ्या पेपरात आले. त्यात माझे नाव पण छापले होते. माझ्या नवऱ्याने ते वाचले. तो मला न्यायला आला. मावशीला वाटले, ह्याला कळलेच नाही. नुसताच न्यायला आला. तिने मला पाठवून दिली. नवरा घरी घेऊन जाईतो गप्प बसला. घरी गेल्यावर सासूने मला भोंगळी करून खांबाला बांधली आणि अंगावर सगळीकडे सांडशी तापवून डाग दिले ! म्हणाली, तू आमच्या घराची अब्रू घालवलीस. मी रडले. म्हणाले, माझी चुकी नाही तरी ऐकले नाही. दुसऱ्या दिवशी अंगभर फोड आले ! नवरा चाबूक घेऊन आला. माझी सासू, दीर– सगळे लोक जमवले. मला परत खांबाला भोंगळी करून बांधली, आणि प्रत्येक जण यायचा आणि मला फटके मारायचा ! माझी शुद्ध गेली, तशी परत कांदा हुंगवला. पाणी पाजले, आणि परत मारले. असे चार दिवस मला पाणी पाजून शुद्धीवर आणायचे आणि मारायचे. अन्नाचा कण पोटात नाही; मी मार खाऊन सगळी सुजले. फोडांत सगळ्या पाणी

झाले. त्यांना वाटले, मी आता मरेन तर त्यांच्या अंगाशी येईल; म्हणून त्यांनी मला बैलगाडीत घालून शिरपूरच्या एस्. टी. स्टँडवर सोडले. तिथे ही तोंडमावशी भेटली. तिने मला सांगितले की, मी तुला सांभाळीन. आता तीच पोटाला देते, पण पोटा-करता अशी येणाऱ्या-जाणाऱ्याची सेवा करणे पडते. आता माझी तब्येत सुधारली, पण गेल्या महिन्यापासून हे गरमीचे नवे दुखणे लाग-लेय. तोंडमावशी काय औषधपाणी देते, पण सगळे अंग ठणकते. आग लागल्यागत होतेय बघा. ह्या गरमीने फार जाच केला. इकडून तिकडे जाताना दुःख होते, पण तोंडमावशी मला रोज बाहेर उभी करतेच. कधी कधी असा त्रास होतोय की जीव द्यावा वाटतो. पण ह्या म्हाताऱ्याकडे पाहून राहते. तोंडमावशीने त्याला पण गावाकडून इथे आणून ठेवलाय. काय साहेब सांगायचे, तो गवळी असा जनावरा-सारखा वागून गेला. माझ्या मात्र संसाराची होळी झाली. आता कोर्ट त्याला शिक्षा करील, पण माझा जन्म मातीत गेला त्याचे कसे होणार ?—साहेब, कसे होणार माझे ?'

साखराबाई गुडघ्यात तोंड खुपसून रडत होती. बलात्काराच्या शेकडो बातम्या आजवर मी वाचल्या. त्या स्त्रियांचे पुढे काय होत असेल ? साखराबाईचे जे झाले तेच त्यांचे होत असेल का ?

साखराबाई ! तुझे अश्रू टिपून घेण्यापलीकडे मी काय करू शकेन ? खरेच, मला काही तरी केले पाहिजे.—केले पाहिजे.

## प्रकरण चौदावे

# सोनाच्या कडेलोटाची कहाणी

मुक्काम : ठाकुरपिंपळगाव.

तालुका : शेवगाव.

ठाकूर पिंपळगावला मातंग विरुद्ध वंजारी अशा झगड्याचे प्रकरण असते.

ठाकूर पिंपळगावची वस्ती ९०० पर्यंत. पैकी ६०० लोक वंजारी समाजाचे. वंजाऱ्यांच्या चार जमाती. त्यांचा आपसांत रोटी-बेटी व्यवहार होत नाही. ठाकुरपिंपळगावचे वंजारी ( माजी ) मुख्यमंत्री नाईकांच्यापैकीचे. गावातल्या वंजाऱ्यांमध्ये सरसकट खेडकर आडनावं चालते. खेडकरांमध्ये परत गावातच दोन तट. त्यांच्या आपसांत चॅप्टर नि रायट केसेस सारख्या चालू असतात असे कळले. गावात मराठे दोन घरे. मांगांची आठदहा घरे. ब्राह्मण आत्तापर्यंत कोणत्याच गावी भेटलेले नसतात.

गावात गेल्याबरोबर मी गहिनीनाथ खेडकरच्या घरी जातो. गहिनीनाथ हा या प्रकरणातला प्रमुख आरोपी आहे. टास्क-फोर्सच्या फौजदाराने पैसे खाल्ल्याने केस अद्याप कोर्टातच गेलेली नाही असे म्हणतात. पोलिसांकडून नुसत्या चौकशीत सहा महिने गेलेले.

'सोना आबा वाल्हेकर नावाच्या मातंगाला तुम्ही भांडण झाले म्हणून विहिरीत फेकून दिले असा आरोप आहे. तुमचे काय म्हणणे ?'

पाचसात खेडकर सतरंजीवर बसून बोलत असतात. ते म्हणतात, 'ही इथेच ती विहीर आहे. आपण पाहून घ्या.'

बाजूने कठडे नसलेली विहीर. दोन खांब रोवून मध्ये दोर सोडायला खराडी लावलेली.

गहिनीनाथ सांगतो, 'त्या वेळी इथे खांब रोवायचे काम चालू होते. सोना आमच्या इथे मजुरीने काम करीत होता. खांब रोवताना त्याचा तोल गेला आणि तो खाली पडला. आम्हीच उचलून दवाखान्यात नेला; तर आमच्या वाइटावरल्या लोकांनी त्याला चिथवून तक्रार करायला लावली.'

गावातल्या इतर लोकांना भेटतो, पण लोक म्हणतात, 'या गावात भांडणं फार. सगळ्या पार्टा झाल्या, डोळ्याने पाहिल्याशिवाय खरे-खोटे कसे म्हणावे ?'

मांगवाड्यावर जातो.

'सोना वाल्हेकर कुठे राहतो ?'

एक पोरगा मला शेणाने व्यवस्थित सारवलेल्या अंगणात घेऊन जातो. बाजूला मातीने लिंपलेले घर.

'सोना आहे का ?'

तेवढ्यात बाजूने कुबड्यांचा आवाज येतो. एक भरभक्कम काळ्या रेखीव शरीराचा माणूस कुबड्यांच्या साह्याने पुढे लोटत येतो. 'रामराम' करतो !

'मीच सोना.'

सोना कुबडी ठेवून अंगणात बसतो. बाजूला मला बसायला कांबळे टाकून घेतो. सोनाच्या भावाची लहान तीन-चार पोरं तिथेच खेळत असतात. सगळी रोगट वाटतात. पोट पुढे. हातापायाच्या काड्या ! सोना सांगत असतो—

'आमच्या गावात चॅप्टर नि रायट केसेसचा सुकाळ झालाय. खेडकर आपसांत भांडतात नि आम्हा गरीबांना त्यात ओढतात. गहिनीनाथविरुद्ध चॅप्टर केस झाली होती. विरुद्ध बाजूला मी होतो. आदल्या दिवशी फौजदाराने केस मिटवली, पण गहिनीनाथच्या मनात राग होता. आमच्या वावरात मजुरी करून आमच्याच विरुद्ध गेला म्हणून त्याने शिव्या घातल्या. पाहून घेईन म्हणाला. त्याच्याच

विहिरीवर मी पहिल्यांदी काम करत होतो. केस मिटली म्हटल्यावर गहिनीनाथ 'उद्यापासून कामाला ये.' म्हणाला. मला काही त्याच्या डावाचा अंदाज आला नाही. मी सकाळी कामावर गेलो. विहिरीचा खांब धरून रोवत होतो. इतक्यात त्याने एकदम मला धरून लोटले. विहिरीत पाणी फार नव्हते, मी पायावर पडलो. एक टाच तिथेच फुटली. पाय मोडला. डोक्याला लागले. इतर लोकांनी मला धरून वर आणले. माझ्या भावाला– लहानू आबा वाल्हेकरला कळले तसा तो धावत आला. माझे पाय, कपडे रक्ताने भरलेले. मला म्हणाला, 'काय झाले ?' मी सांगितले की गहिनीने मला फेकले. तो म्हणाला, आपण शेवगावला जाऊन दवाखान्यात ठेवू अन् पोलिस कंप्लेन्ट करू. त्याने धोतराने माझा पाय बांधला अन् पाठुंगळी मारून निघाला. आम्ही गावच्या वेशीबाहेर पडलो तशी गहिनीनाथ आणि इतर लोक धावत आले. म्हणाले, 'पोलिसकडे जाऊ नको. आम्ही इथे मिटवून घेतो.' लहानू म्हणाला की, आम्ही पोलिसाकडे जात नाही. नुसते दवाखान्यात नेतो. 'तिथे पण जायचे नाही' म्हणाले. जबरदस्तीने धरून गावात आणले. दुसऱ्या दिवशी भिवाने परत मला उचलले आणि शेवगावच्या दवाखान्यात नेले. तिथला डॉक्टर म्हणाला पाय कापावा लागेल. याला मिशन हॉस्पिटलमध्ये न्या. मला मिशन हॉस्पिटलमध्ये नेले. डॉक्टर म्हणाले, दोन महिने राहावे लागेल. गहिनीनाथ म्हणाला, तू राहा, आम्ही बिल देऊ. चार दिवसांनी माझा भाऊ पोलिसांकडे गेला. लेखी तक्रार दिली. पण फौजदार खेडकरांकडेच गेले. त्यांची काय बोलणी झाली माहीत नाही. त्यांनी आमच्याच भावावर, बायकोवर नि इतर दोघांवर रायट केसेस टाकल्या ! मी हॉस्पिटलात होतो. डॉक्टरनी टाके घालून टाच शिवली, पण जखम आधी उघडी राहिल्याने त्यात पू झाला. सगळा पाय सडायला लागला. माणूस भेटायला आला तर नाक धरून बसायला लागला. पोलिस खेडकरवर प्रकरणच दाखल करीनात. माझ्या पायाचे फारच झाले तेव्हा त्यांनी नगरच्या हॉस्पिटलात पाठवले. तिथे डॉक्टरने लक्ष दिले. टाच खोलून परत शिवली. पंधरा दिवस तिथे राहिल्यावर पाय

बरा झाला. जखम भरली, पण पायावर उभे राहता येईना. कुबडचा घेऊन परत आलो. पाय गेल्यावर काम करता येईना, भाऊ पण गरीब. तो म्हणायला लागला की, तू वेगळा हो. माझी पोरे उपाशी मरतात, तुझा संसार कुठे पोसू ? माझी बायको म्हणाली, इथे राहून पोरे उपाशी मरतील, आता मी बापापाशी जाते. ती तिच्या बापाकडे गेली. आता तिकडेच राहिलीय. मध्ये एकदा तिच्या गावी गेलो तर म्हणाली, 'आता मी म्होतुर लावणार. माझ्या पोराबाळांना उपाशी ठेवून भागणार नाही. तुझ्याबरोबर राहून काय खाऊ ?' मी काय बोलणार ? तिला इथे आणून काय खायला घालणार ? मलाच भावाने फेकलेल्या तुकडचावर कुत्र्यागत जगावे लागतेय, तर तिला कोण खायला घालणार ?'

सोनाने डोळे पुसले.

'साहेब, भांडणापायी माझा संसार गेला बघा. आता गहिनीनाथ मागे लागलाय की पाचशे रुपये घे अन् तक्रार मागे घे. पाचशे रुपये मिळाले तर साहेब, मी माझ्या बायकोकडे जाऊन राहीन, नाही तर ती कायमची जाईल. पोरांची पण सावत्र बापाकडून दैना होईल. तडजोड करावी असे वाटतेय. तुमचा काय सल्ला आहे ?'

सोना,—तुला काय सल्ला देऊ ! तुझा खून करू पाहणाऱ्याला माफ करून संसार परत उभा करण्याचा, की त्याला शिक्षा मिळेल, आपल्याला न्याय मिळेल,—या आशेवर झुंजत राहण्याचा ?

## प्रकरण पंधरावे

# न्यायासाठी दाही दिशा

मुक्काम : वरूर बुद्रुक.

तालुका : शेवगाव.

वरूर बुद्रुकला किरकोळ प्रकरणे बरीच. रतन धोंडीराम गरुडे याला अंबादास म्हस्के, रघुनाथ म्हस्के विक्रम म्हस्के यांनी बेदम मारहाण आणि जातिवाचक शिवीगाळ केल्याचे एक प्रकरण कोर्टात. तारखा नुसत्या पडतात. पोलिस किंवा श्रीमंत एरवी गरीबाला नामोहरम करून शरण आणायला कोर्टात केस भरून तारखा टाकत बसायचे असा डाव टाकतात, कधी तेही त्यात अडकतात !

म्हस्के बंधूंनी केलेल्या मारहाणीत घायाळ झालेला रतन गरुडे ह्याचे कुणाशीच वैर नव्हते; तर म्हस्के बंधूंच्या भाऊबंदांपैकी एकाचे असलेले वैर याच्या अंगाशी आले होते.

रतन ज्या म्हस्क्यांकडे नोकर म्हणून काम करत होता त्यांचे या अंबादास, रघुनाथ, विक्रम यांच्याशी वैर होते.

रतनचे आणि म्हस्के बंधूंच्या गड्याचे भांडण झाले. गड्याने मालकाकडे तक्रार केली, तर हे तिघे भाऊ खवळले. आमच्या भाऊबंदाचा नोकर आमच्या नोकराला दाब दाखवतो, हा आमचा अपमान आहे: असे म्हणून ते रतनच्या अंगावर धावून गेले. त्याला तिघांनी आधी कोंडून ठेवले आणि मग काठीने बेदम झोडपून काढले. त्याच्या मानेवर बुटाचा पाय ठेवून चेपला. तो गुदमरून तडफडायला लागला तशी बाकीच्यांनी आवरून त्याला बाजूला नेला. हा बेशुद्ध पडला होता. नंतर याच्या मालकाने म्हस्के बंधूंविरुद्ध पोलिसांत तक्रार केली. फौजदाराने खटला केला. आता इतर गावातल्या म्हस्क्यांनी रतनच्या

मालकावर म्हस्के बंधूविरुद्धची केस काढून घ्यायची म्हणून दडपण आणले. त्याने जातभाईबंदांच्या दडपणाने केस मागे घ्यायला संमती देऊन रतनमागे तशी सही द्यायचा लकडा लावलाय. रतन एकटा पडलाय. जातभाई एक. ज्या मालकाच्या वैरातून हे सोसावे लागले तोच मालक, रतन हा सही करायचे नाकारतो म्हणून वैरी व्हायची वेळ आलेली !

आम्ही सभेत प्रकरण उपस्थित करतो. म्हस्के बंधू, रतन, सगळेच हजर असतात. ते परत तेच ऐकवतात ! म्हस्के बंधूंचे म्हणणे, हाच आमच्यावर धावून आला !

शेवटी रतनची फिर्याद मागे घ्यायची नाही. तुम्ही घ्यायला लावलीत तर आम्ही तक्रार करू, असे सांगून पोलिसपाटलाला साक्ष ठेवतो !

दुसरे प्रकरण विठ्ठलाच्या देवळाचे असते.

देवळाचा ट्रस्ट आहे. संस्था चॅरिटी कमिशनरकडे रजिस्टर्ड झालेली आहे. यशोदा अंचवले नावाची बाई देवळाची सगळी व्यवस्था आपल्या भाऊबंदांच्या मदतीने बघते.

देवस्थानला इनाम जमीन आहे. एकूण तीस एकर. नगदी पिके ह्या बाई घेतात, पण ते सगळे उत्पन्न खासगीत जमा करतात ! देवस्थानचे उत्पन्न वर्षाला फक्त पाचशे रुपये दाखवतात, नि उसाचे ट्रक मात्र रवाना होतात !

हळद केली जाते, गावातले लोक तेलवातीचा जत्रेचा खर्च दरडोई वर्गणी काढून करतात. मात्र बाई देवाच्या इनाम जमिनीवर गब्बर होऊन बसल्या आहेत,–असे सारे म्हणतात.

ह्या भ्रष्टाचारात बऱ्याच पुढाऱ्यांचे हात गुंतलेले असल्याने कुणी उघडपणे बोलत नाही. आम्ही एक अर्ज सरपंचांना लिहून देतो व गावकऱ्यांच्या सह्यांनी तो चॅरिटी कमिशनरकडे पाठवून देवस्थान ट्रस्टचे ऑडिट करून घ्या म्हणून सांगतो. आम्हीही आम्हांला असे असे आढळले, चौकशी करा, म्हणून अर्ज लिहून पाकिटात ठेवतो.

इतक्यात काही लोक, देवस्थानच्या जमिनीच्या मालक भाऊबंद पुजाऱ्यांनी महार समाजाची स्मशानभूमी नांगरून जमीन बळकावण्याचा उद्योग चालू केल्याचे व आपल्या तक्रार-अर्जाची ग्रामपंचायत दखल घेत नसल्याचे सांगतात. आम्ही सभा संपल्यावर वादग्रस्त जागा पाहायला येतो म्हणून सांगतो.

दलित लोकांची आणखी एक गंभीर तक्रार असते. ते म्हणतात, गावाला वीस सार्वजनिक खांब विजेच्या दिव्यांसाठी मंजूर झाले. गावच्या वस्तीत हजारांत तीनशे लोक हरिजन आहेत, पण आमच्या वस्तीत विसांपैकी एकदेखील खांब लावला नाही! आता आणखी वीस मंजुरीकरता अर्ज केलाय, त्यांतले दहा आम्हांला मिळाले पाहिजेत.

सरपंचांना, दलित वस्तीत विजेचे दिवे, खांब अजिबात का नाही, याचा खुलासा करता येत नाही.

पुढे येणाऱ्या खांबांतून चौथा हिस्सा खांबांचा दलित वस्तीचा कोटा भरेपर्यंत गावात रोवणार नाही असे ते सांगतात.

आमची सभा चालू असतानाच एक पिवळे नऊवारी लुगडे नेसलेली देखणी तरुण रेखीव व गोरी बाई आत येते. आमच्या सभेत बायका येण्याचा वा बोलण्याचा प्रसंग आधी आला नव्हता! रात्री गावात श्री एडके कीर्तन करीत तेव्हा काय त्या बायका यायच्या, पण त्याही दूरच बसायच्या.

गर्दीतून ती वाट काढत पुढे येते. एक अर्ज आमच्याकडे देत म्हणते, 'साहेब, गावकरी माझा फार छळ करतात बघा!'

'नाव काय तुमचं?'

'इंदूबाई गणपत पाचरणे. चर्मकार समाजापैकी आहे. माझ्या नवऱ्याने मला टाकली. तो दुसऱ्या बायांशी लागू आहे. मी तिकडे जायची नाही. पण हे लोक मला इथे राहू देत नाहीत. माझा भाऊ इथे आहे म्हणून मी इथे राहते; तर सगळे माझ्याकडे वाकड्या नजरेने पाहतात. फौजदाराने पण– तू रांडगिरी करतेस अशी तक्रार

आहे; माझ्याकडे येऊन मिटवून टाक, असे म्हणून हात धरला होता बघा ! मी त्याला हाकून लावला तर गावकऱ्यांना सांगून त्याने मशिनचा स्टार्टर चोरल्याचा आळ घेऊन मला चौकीवर नेलं. मला म्हणाला, तुझी झडती घ्यायचीय, आत खोलीत चल. मी म्हटले, बाईला आण तपासायला!...गावातले लोक पण बाहेर पडले की काही-बाही बोलतात बघा.' ती भराभरा बोलते. तिच्या सुंदर रूपामुळे तिच्यावर अशी आपत्ती येणे अवघड नव्हते. तरी पण तीही काही भोळी-भाबडी नसावी हे लक्षात येते. गावातल्या लोकांनी तिच्याविरुद्ध सह्या गोळा करून गावाबाहेर काढायचा घाट घातलेला असतो. तिला आम्ही चौकशी करतो, असे सांगून परत पाठवतो.

लोक तिच्याविषयी कागाळ्या करतात. 'तीच पुरुषांना नादी लावून पैसे उकळते' वगैरे... पण 'पोलिस-फौजदार तिच्यावर डोळा ठेवून आहेत. ती विठोबा शिंदे नावाच्या माणसानें स्वतःची बायको-पोरे टाकून सध्या ठेवली आहे; आणि त्याने ठेवल्याने ती सध्या इतरांशी अढीबाजीने वागल्याने गाव तिला बाहेर काढू पाहतोय.' वगैरेही सांगतात. हे एक वेगळेच प्रकरण असते.

स्मशानभूमी नांगरून कुठे आक्रमण झालेय ते पाहायला आम्ही जात असतानाच एक पोरगेलासा तरुण माझ्याजवळ येतो. म्हणतो, 'तुम्ही इथल्या विठ्ठल मंदिरात दलितांना घेऊन प्रवेश करून दाखवलात तर आपण वाटेल ते हरायला तयार आहोत!'

मी चमकतो. 'का बरे?'

'अहो, इथले गावकरी भयंकर कर्मठ आहेत. जत्रेत अख्ख्या गावाकडून वर्गणी गोळा करतात, पण महारा-मांगाकडून पैसे नेऊन दिले तरी घेत नाहीत! म्हणतात, देवाला महारामांगाची बाटलेली वर्गणी चालत नाही!'

मी त्याला 'मंदिरप्रवेश करून दाखवीन नाही, तर इथेच सत्याग्रह करू' असे सांगतो.

स्मशानभूमीवर देवस्थानच्या पुजाऱ्यांनी जमीन नांगरून आक्रमण केल्याचे स्पष्ट दिसते.

महारवाड्यातल्या लोकांना पुजाऱ्याविरुद्ध लेखी तक्रार करून त्याची कॉपी प्रभाकर रुपवते यांच्याकडे पाठवायला सांगतो. स्मशानातून परत येताना मी प्रभाकर रुपवते यांना म्हणतो, 'प्रभाकरकाका, इथल्या देवळात दलितांना जाऊ देत नाहीत. आपण आज हा इशू घेऊ या.' ते संमती देतात.

गावकरी आमच्याबरोबरच चालत येत असतात. एखाद्या मोर्चा-सारखे दृश्य दिसत असते. मी सरपंचांना लोकांना थांबवायला सांगतो. ते 'कशाला ? ' म्हणून विचारतात.

'विठोबाच्या देवळात दलितांना घेऊन प्रवेश करायचाय!' मी म्हणतो.

सरपंच हबकतात. थांबतात. क्षणभर विचार करून म्हणतात, 'अवघड आहे ! '

'का बरे अवघड आहे ? '

'जाऊ द्या, पुन्हा याल तेव्हा करू.'

'पुन्हा येऊ तेव्हा तर करूच, पण आजही करू; पाहिजे तर आम्ही उद्यापर्यंत थांबतो. लोकांना समजावून सांगतो !'

'लोक ऐकणार नाहीत.'

'का ऐकणार नाहीत ?'

'जुन्या भावना आहेत. लोक खवळतील.'

'आम्ही सत्याग्रह करतो. तुम्ही काय करायचे ते करा. पण आम्ही सगळ्यांना घेऊन देवळात जाणार !'

'देऊळ खाजगी आहे, परवानगी काढावी लागेल.'

'देवाच्या दर्शनाला कायद्याने असली तरी प्रेमभावाने कुणाची पर-वानगी लागत नसते.'

'लोकांना विचारा.'

दरम्यान लोकांना कळलेलेच असते. दोघेचौघे 'जाऊ द्या, पुढल्या वेळेला याल तेव्हाच करूया तो कार्यक्रम' वगैरे म्हणतात. मी, दिलीप, सुधीर 'आत्ताच जाणार' म्हणून आग्रह धरतो. 'जर जाऊ दिले नाही तर देवळापुढं उपोषण करू' म्हणून सांगतो. तशी इतका वेळ

बाजूला उभे असलेले मोरे नावाचे आडदांड गृहस्थ सात-आठ जणांना घेऊन आडवे होतात.

'देऊळ खाजगी आहे, देवळात जायला आमची हरकत आहे' ते गरजतात.

'देवळात आम्ही जाणार!'

'विचार करून बोला. मागाहून काही कमीजास्त झाले तर आम्ही जबाबदार नाही!' मोरे धमकावतात.

'कमीजास्त म्हणजे काय होईल?'

'ते आपण सांगत नाही. इथे वहिवाट नाही. महारमांगाची वर्गणीसुद्धा जत्रेला घेत नाहीत.'

'हरिजन कायद्याखाली तुम्हांला खडी फोडायला जावे लागेल एवढे लक्षात ठेवा आणि मग अडवायची हिंमत करा.'

'कायदावियदा आम्ही जाणत नाही.'

'आम्ही पण तुमची वहिवाट ओळखत नाही.'

मी, दिलीप, सुधीर, प्रेमानंद पुढे सरकू लागतो. मोरे आणि त्यांचे दादागिरी करणारे साथीदार अक्षरशः आम्हांला मागे हाताने लोटू लागतात. लोक आमच्याभोवती गर्दी करून 'आमच्या गावात येऊन आमच्याचवर दादागिरी करता काय?' 'आमचे देऊळ बाटवायचा तुम्हांला अधिकार नाही' वगैरे ओरडायला लागतात. थोडी रेटारेटी होते. मी सरपंचांचा हात धरून त्यांना सांगतो, 'तुम्ही आणि पोलिसपाटील समोर असताना हे लोक आम्हांला, दलितांना घेऊन आत जायला मना करताहेत. जर ह्यांनी आम्हांला जाऊ दिले नाही किंवा काही केले तर आम्ही तुम्हांला जबाबदार धरू. दादासाहेब रुपवते उद्या समारोपाला यायचेत, त्यांना इकडेच यावे असे कळवू. एकदा आम्हांला तुम्ही अडवले हे नगरला कळले तर तुमची धडगत नाही!'

आतून धाकधुक असते, पण नेटाने बोलतो.

याचा परिणाम होतो. सरपंच मोऱ्यांना आवरतात. बौद्ध, मांग, चांभार समाजातल्या पाचसहा तरुणांसह आम्ही आत शिरलो. सवर्णां-

पैकी कुणीही आमच्याबरोबर आत येत नाही ! मी सरपंचांना हात धरूनच आत घेऊन जातो. मग मोऱ्यांनाही ' तुम्ही चला ' असे म्हणून थोड्या धिटाईने हात धरून आत नेतो.

' मंदिरप्रवेशाला हरिजन देवळात शिरलेत ' ही बातमी कळून गावातले लोक सैरावैरा धावत जमतात. आमच्याबरोबर मंदिरात आलेले लोक बावरलेले असतात. आही त्यांना मोटरीपाशी उभे करतो, दिलीप आणि प्रेमानंद मोटरीच्या टपावर उभे राहून गर्जतात– ' जर या गावात उद्या कुणी मंदिरप्रवेशांचा सूड म्हणून दलितांपैकी कुणाला छळल्याचे कळले तर पोलिसांना आणि आमच्या कार्यकर्त्यांना या गावावर ॲक्शन घ्यावी लागेल, आणि त्याचे परिणाम वाईट होतील हे लक्षात ठेवा.'

आम्ही परत चावडीत लोकांना जमवतो. आपण थोड्या हट्टाने मंदिरप्रवेश का केला, ते समजून सांगतो. प्रभाकरकाकाही चार समजुतीच्या गोष्टी सांगतात. सरपंचही गावातले लोक काही करणार नाहीत याची हमी गावासमोर घेतात, आणि केव्हाही मंदिरात आले तरी आम्ही हरकत घेणार नाही, असे सांगतात.

आम्ही गावातल्या लोकांशी थोडा वेळ इकडल्या-तिकडल्या गप्पा मारीत काढतो. तासाभराने वातावरण थोडे निवळते. तंगपणा कमी होतो. पोलिसपाटील सरपंचांना आणि गावातल्या दलितांना सामाजिक समता परिषदेचा पत्ता देऊन आम्ही निघतो.

तो तरुण इतक्यात धावत येतो. माझा हात घट्ट धरून म्हणतो, ' हा रुपया घ्या. आत्ता एवढाच माझ्यापाशी होता. तुम्ही पैज जिंकलीत.'

मी पैजेचा जिंकलेला रुपया धरून त्याच्या डोळ्यांतले आनंदाश्रू पाहता पाहता माझ्या डोळ्यांतले अश्रू टिपतो, आणि रुपयाच्या त्या नोटेचे चुंबन घेऊन खिशात ठेवतो..

## प्रकरण सोळावे

# हे ग्रहण कधी सुटणार?

मुक्काम : भगूर.
तालुका : शेवगाव.
भगूरला पोचतो तेव्हा संध्याकाळ झालेली असते. खग्रास चंद्रग्रहणाचे वेध लागलेले असतात.

दिलीप आणि सुधीरने या समता दिंडीत एक काम जोरकस केलेले. गावातली लहान लहान मुले जमवायची. त्यांना मोजकी चार गाणी शिकवायची, आणि तीच गाणी म्हणत म्हणत सगळ्या मुलांना रांगेत उभे करून गावभर फिरायचे. गावातले वातावरणच ही मुले फिरायला लागली की बदलून जायचे. कौतुकाने, कुतूहलाने गावातली माणसे दार उघडून बाहेर यायची. आमच्याबरोबर मुलगी कुणीच नसे. शुभदा जाहगिरदार यायला तयार होती, पण आम्हीच अडचण होईल म्हणून नको म्हटलेले. ते चुकलेच असे वाटतेय. तरी पण दिलीप, सुधीर आई–ताई–माई म्हणत बायकांकडूनही माहिती काढताहेत. घरात पोचून माहिती काढताहेत. गावकऱ्यांनी सभेत दिलेल्या माहितीपेक्षा अगदी खरी, पण वेगळी माहिती लहान मुले, बायका यांच्याकडे मिळते.
बाबा आढावांच्या म. जोतीराव फुले समता प्रतिष्ठानाने 'एक गाव : एक पाणवठा'साठी तयार केलेल्या फॉर्मच्या प्रती बरोबर घेतल्या आहेत. प्रदीप दासगुप्ताने त्याच्याच साहाय्याने प्रश्नांची सरबत्ती चालवलेली. गावाचे नाव, तालुका, लोकसंख्या, जमिनीचे क्षेत्र, क्षेत्राची वर्गवारी, विविध जाती–पोटजाती आणि त्यांची लोकसंख्या, भूमिहीन

किती, शिक्षण घेणारे किती, नोकरदार किती, उदरनिर्वाहाची साधने कोणती, पाणवठे, स्मशाने, देवळे किती, जातवार वागणूक कशी दिली जाते, अस्पृश्यता कोणकोणत्या स्वरूपात अस्तित्वात आहे, ग्रामपंचायतीच्या कामात दलित सदस्य भाग घेतो का, वगैरे बरेच प्रश्न प्रश्नावलीत आहेत. त्यांपैकी सगळ्याच मुद्द्यांचा सर्वत्र तपशील, आकडेवारी मिळतेच असे नाही; पण प्रत्येक मुक्कामाच्या आधी त्या गावच्या समस्येची प्रभाकरराव रुपवत्यांकडून ( त्यांच्याशी सगळ्याच 'दिंडी'चे इतके अनौपचारिक नाते जमले की ते मार्गदर्शक न राहता प्रेमानंदबरोबर इतरांचेही काकाच होतात ). माहिती घेणे आणि निघाल्यावर वाटेत झाल्या घटनांवर चर्चा करणे, एकमेकांचे अनुभव ऐकणे चालू असते.

भगूरला शाळेतच उतरतो. सभेला सुरुवात होईपर्यंत खग्रास चंद्रग्रहणास प्रारंभ होतो.

प्रेमानंदकडे सभेची सूत्रे असतात. दिलीप, सुधीर मुलांची गाणी घेत असतात. मी आणि प्रदीप गावात फिरत असतो. विकास, श्रीनिवास वादग्रस्त स्मशान पाहायला गेलेले असतात.

दलित तरुण गावातल्या प्रकरणांची माहिती देत असतात. एकजण म्हणतो, 'इथे पहिल्यांदा शाळा देवळात भरत होती; पण तेव्हा गावातल्या महार–मांग मुलांना शाळेत जायला परवानगी नव्हती. आम्ही तक्रार केली तेव्हा गावकऱ्यांनी शाळाच देवळातून काढली आणि या नव्या जागेत आणली.'

'आता तरी सगळ्यांबरोबर बसू देतात का ? '

नंबरवारीने बसतात. पण मास्तर–लोक वर्गात काही चुकले की आमच्या पोरांची लगेच जात काढून, का रे म्हारड्या, धेडपटा वगैरे म्हणतात ! त्यामुळे शाळेतली इतर पोरेही भांडण खोडी झाली की आमच्या मुलांना जातिवाचक शिवी देतात.'

'आमची समता दिंडी तुमच्या गावात आली त्याबद्दल तुम्हांला काय वाटते ? '

‘बरे वाटते की. पण असे एक दिवस मुक्काम करून काय जास्त फायदा व्हायचा नाही. इथे येऊनच राहायचे आणि आजूबाजूच्या दहापंधरा गावांतून रोज असे काही तरी सांगायचे, प्रश्न सोडवायचे, कार्यक्रम करायचे,– असे केले तर काही होईल.’

‘हे असे एक दिवसात कुठे समता व्हायला बसलीय. तुम्ही गेले का लोक म्हणतील, ‘च्यायची खुळी, समता करायला निघालीत !’ तोंडावर सगळे होय-होय करतात. त्यांना माहीत आहे, उद्या काही राहात नाही, परत काही येत नाही. होय म्हणायला काय खर्च होते ? ’

‘तुम्ही स्थानिक तरुणांनीच पुढाकार घ्यायला नको का? समता अशी लादता किंवा इंपोर्ट करता येत नाही; तुम्हीच इथल्या सवर्ण तरुणांशी दोस्ती...’

‘दोस्तीचे काय सांगता ! साधे जाणे-येणे पण नाही आमचे. आम्ही महार–मांग पडतो; आम्ही थोडे स्वतःला अस्पृश्य मानतो ? ते मानतात. आम्ही कधीच हे सगळे सोडले; त्यांनी सोडायला हवे. पुढे यायला हवे. आम्ही मागे गावातल्या तरुण पोरांच्या मंडळात वर्गणी देऊन येतो म्हणालो, तर म्हणाले तोंड धुवून या ! सारे जुने लोक तर मानतातच, पण तरणीताठी मराठ्याची, वाण्याची पोरेसुद्धा महारमांगाला हलकेच समजतात. नगरला आमचा एक मित्र कॉलेजात आहे. मराठ्यांची पण काही मुले आहेत. कॉलेजात सगळी एकीने वागतात. चहा अर्धा करून कपबशीने पितात, पण गावी आली की एकमेकांचे तोंड पाहात नाहीत ! आमच्या मित्राने त्या पोरांना विचारले, असे का करता ? तर म्हणाले, जिथे तिथे तिथल्या रीतीनेच वागणे पडते. नगरात आपल्याला कोण ओळखते? इथे गाव– मराठ्याचा पोरगा महाराशी लगट करतो म्हटल्यावर तोंडात शेण घालील ! आमच्या त्या मुलाला फार वाईट वाटले. आज इथेच गावात आहे; हवे तर भेटू आपण त्याला.’

‘आमच्या दिंडीत प्रेमानंद आलाय अन् त्याचा आंतरजातीय विवाह ठरलाय. तुमच्या माहितीत कुठे असा आंतरजातीय विवाह आसपास आहे का ? ’

‘ कुणी आमच्यातला पोरगा किंवा पोरगी दुसऱ्या जातीतल्या पोरीला वा पोराला भेटतसुद्धा नाही. आमच्या गावातून पोरीला एकटे-दुकटे पाठवत नाहीत. एक तर घरातच असतात. काही गरीबगुरीब शेतावर काम करतात, पण बोलणे वागणे काही नाही शहरासारखे. आणि कुणी नुसते म्हणाला तरी त्याचे तुकडे गाव शिजवून खाईल ! ’

शहरात तरी काय कमी आहे ? परवा नगरला एक प्रकरण झालेय– लग्नाचे नाही,– जागेचे. एक बौद्ध-कॉलेज विद्यार्थी होता. त्याने एका मारवाड्याकडे खोली भाड्याने घेतली. मारवाड्याने त्याला मराठा समजून जागा दिली होती. पण दोन दिवसांनी त्याने कॉलेजची पुस्तकें इतर सामान आणले. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो ! आंबेडकरांचा फोटो लावतोय म्हणजे हा महारच, हे त्याने ओळखले. आपल्याकडे घरातल्या फोटोंवरूनसुद्धा जात कळतेय बघा ! तर मारवाडी खवळला, म्हणाला, तू म्हारडा आहेस हे मला आधी का नाही सांगितलेस? आणि त्याने त्याचे सगळे सामान आपल्या नोकरांना बोलावून रस्त्यावर फेकून दिले. आंबेडकरांचा फोटोही रस्त्यावर फेकला. फोटोच्या काचेचा चक्काचूर झाला. मुलगा संतापला. त्याने रस्त्यावरच ठाण मांडले नि घोषणा द्यायला सुरुवात केली. लोकांची ही गर्दी जमली ! प्रभाकरराव रुपवत्यांना कळताच ते पोलिसांना घेऊन आले. पोलिसांनी पंचनामा केला. मारवाड्याला अटक केली. अहमदनगर शहरात घडलेली परवाची गोष्ट ही. आता खेड्यांचे काय बोलता ?

‘ एक गाव : एक पाणवठा ’बद्दल काही याआधी ऐकले होतेत ?’

‘ पेपरमध्ये सरकारी जाहिरात तेवढी वाचली होती. काल सरपंचाने विहिरीवर नवी पाटी लावली तेव्हा कळले, तुम्ही येणार आहात ! ’

‘ आम्ही येणार कळल्यावर काय वाटले ?’

‘ आम्हांला वाटले, कुणी तरी सरकारी लोक शाळा तपासायला येतात तसा पाणवठा तपासणार.’

‘आता काय वाटते ?’

‘काही नाही. तुमची ओळख झाली हे बरे वाटले.’

‘अशा दिंडीने काही होऊ शकेल असे वाटते?’

‘फार नाही व्हायचे; फार तर दडपलेली दोन-चार प्रकरणे पेपरला येतील. एकदा तुम्ही गावच्या भानगडी काढता म्हटल्यावर पुढल्या वेळेला गावात कुणी येऊच देणार नाही! तुम्ही पेपरला भानगड काढली तरी तुम्हांला वाटेल आपण छापले म्हणून, पण गावकरी इथल्या माणसांना हाणतील तू का बोललास म्हणून! बरे, इथे सगळी पोलिसांचीच चारसोबीसी चालते. ते पण डूख धरतील. आता तुमच्या-आमच्या सामाजिक समता परिषदेत दादासाहेब, मधुकरराव चौधरींसारखी मोठी माणसे आहेत म्हणून कदाचित दडपणाने लोक वागतील, पण मनाने नाही. प्रभाकरराव, दादासाहेब काँग्रेसचे आहेत म्हणून इथले काँग्रेसवाले पण तुम्हांला शाळाबिळा देतात, सरपंच हार-फुले घालतात, तुम्ही एरवी आले असते तर उभे पण केले नसते!’

‘समजा, बाबा आढावांसारखा माणूस आला तर?’

‘तुम्ही सगळेच लोक उपरे पडता बघा. इथे तुमचा कुणी पार्टीवाला असेल तोच फार तर तुम्हांला मदत करणार. तसे गावचे लोक बनेल असतात. कुणाला कसे वागवायचे हे ओळखून असतात. काल सरपंचाने दवंडी पिटली म्हणून लोक तरी जमलेत. सरपंचाने तरी दवंडी का पिटली, तर प्रभाकरराव जिल्हा परिषदेचे सभापती आहेत; त्यांच्या हातात सत्ता आहे. बाबा आढाव यायचे असते तर सरपंचाने गावाला धमकावून ठेवले असते : कुणी काही बोलले तर गावात ठेवणार नाही! आताही तशा सूचना दिल्याच आहेत, पण आढावांच्या सभेला जायला मना केली असती! शहरात सगळे लोक असतात. इथे खेड्यापाड्यात तसे गट पुष्कळ असतात, पण शेवटी सगळे काँग्रेसवालेच असतात! इथे समाजवादी पक्षाचा कार्यकर्ता नसेल किंवा भांडणाने पाटर्या पडल्या नसतील तर बाबाला गावात थारा नाही. तशी मोगलाई असते. गावातल्या लोकांपुढे कुणाचे काही चालत नाही. नगर जिल्ह्यात कम्युनिस्टांचे थोडे काम आहे, पण तेदेखील जातपात सगळे पाळतात! आमच्या खेड्यात माणसाची वरून टोपी कुठल्याही रंगाची असली तरी आतून त्याचा एकच रंग

असतो,– जातीचा !'

'पँथरचे इथे काही काम चालते का ?'

'दलित पँथरचे खेड्यापाड्यातून चालणे अवघड आहे. शहरात ठीक असते. तिथे भांडून वेगळे राहता येते. इथे गावाला धरूनच राहावे लागते. भांडून, संघर्ष करून निभत नाही. तुम्ही महारवाड्यात गेलात तर लोक हजार कागाळ्या करतील; पण तुम्ही आमच्या-बरोबर चला, आपण आंदोलन करू वगैरे म्हणाल तर मागे हट-तील. त्यांचा पण इलाज नसतो. मजुरीला, अन्नापाण्याला गावावरच ते अवलंबून असतात. घाबरतात. तरी हल्ली थोडेथोडे भांडतात, पण हे भांडतानासुद्धा गावातलाच मराठ्यांचा एक गट सांभाळून दुसऱ्या-विरुद्ध भांडायची प्रवृत्ती असते.'

बऱ्याच गप्पा होतात. सर्वच तरुण स्मार्ट असतात. सातवी आठवी-पुढे गेलेले.

एक-दोघे पाहुणे आलेले असतात.

स्मशानभूमीवर चारी बाजूंनी लोकांनी नांगरून आक्रमण चालवलेले असते.

कुंपणाच्या काठ्या सरकावून जमीन नांगरून घ्यायची, असे चालते. पोलिसांकडे तक्रार करूनही दाद लागत नसते. गावातले लोक पैसे चारून प्रकरण दाबून ठेवत असतात. जास्त आवाज केला तर 'चॅप्टरी रायट केसेस करू' म्हणून दलितांनाच धमकावत असतात.

स्मशानभूमीवरील आक्रमण स्पष्ट असते. प्रकरण मिटण्यातले दिसत नाही. नगरला प्रभाकररावांनीच ह्या अर्जाची तड वरून दडपण आणून लावायला हवी असे मत पडते.

घरांच्या विशेषत: महारवाड्यातल्या जागेच्या टंचाईचा प्रश्न इथेही विकट असतो. पाचपंचवीस माणसे दोनतीन खणी घरात सामान ठेवून बाहेरच काढतात. रात्री अंगणात नाही तर तक्क्याला झोपायला जातात.

इथे आणखी एक गंभीर तक्रार झाली. बायकांना संडासला जायला जागा नव्हती. पूर्वीची वहिवाटीने जी मोकळी जागा होती तिथे मालकाने शेताला काटयाचे कुंपण लावून घेतले होते. त्यामुळे बायकांना एक तर दुसऱ्या टोकाला बरेच चालून जावे लागत होते. अवघडलेल्या आजारी बायांची फार पंचाईत होत होती. वहिवाटीच्या बंद झालेल्या जागेपुढे रस्त्याच्या कडेलाच बाया बसत होत्या. पण कुणी आल्या-गेल्याची चाहूल लागली की घाईने उठून उभे राहावे लागत होते. संडास करायला तट्टया द्या, आम्ही मेहनत करू, असे सांगूनही पंचायतीकडून साथ मिळत नव्हती. जागा दाखवा, मग देतो म्हणत होते. गावठाणालगत कुणीच संडासाला जमीन द्यायला तयार नव्हते. महारवाडयातल्या बायांचे अतोनात हाल चालू होते.

मध्यरात्री आधी थोडा वेळ आम्ही निघालो.

कुणी तरी वर पाहात म्हणाले, ‘ अनिल, ग्रहण सुटले बघ ! ’

मी अंधारात दूर जाणाऱ्या भगूरकडे पाहात म्हणालो, ‘ ग्रहण सुटले ? कुठे सुटले ?’

## प्रकरण सतरावे

# महाराला मांगाचा बाट !

मुक्काम : शिरापूर.

तालुका : पाथर्डी.

आजचे हे सतरावे गाव. लोणीमावळ, कळस, तिखोल, पिंपळनेर, चिंभळे, तांदळी दुमाला, भोसे, कोणगाव, मिरजगाव, शिऊर, मक्तापूर, तरवडी, दहिगावशे, ठाकुरपिंपळगाव, वरूर बुद्रुक, भगूर आणि आता हे शिरापूर !

लक्षावधी खेड्यांचा हा देश.

त्यातील ही काही खेडी.

संध्याकाळी दरेवाडीला जायचे.

ते अठरावे गाव.

शिरापूरचे हे प्रकरण किती विचित्र !

शिरापूरला तीन विहिरी.

एक मांगांची, एक महारांची, आणि एक गावाची.

महारांची वस्ती दोनशेच्या घरात. अठरा घरे. मांगांची चौदा घरे. वस्ती दीडशेपर्यंत. बाकी चौदा–पंधराशे इतर गावकरी.

महार–मांगवाडे गावाबाहेर, पण एकमेकांना लागून आहेत.

महारांमध्ये गवारे आडनाव चालते, तर मांगांमध्ये शेलार.

गावाच्या विहिरीवर पाणी भरायचा प्रश्नच येत नाही. दोघांनाही गावकरी आसपास फिरकू देत नाहीत ! दोन्ही वस्त्यांना स्वतंत्र विहिरी असल्याने तशी गरजही नव्हती.

पण आता मांगवाड्याच्या विहिरीचे पाणी नासलेय. कशामुळे कळत नाही, पण पाण्याला जनावरही तोंड लावत नाही. सडल्याचा वास येतो. दुष्काळात पाणी साफ आटले होते, तेव्हापासूनचा हा झगडा आता पाणी नसल्याने निकराला आलाय.

मांगवाड्याचे पाणी नासले तेव्हा मांग-लोकांनी महारवाड्यातल्या लोकांना 'तुमच्या आडावर पाणी भरू द्या' म्हणून विनंती केली.
महारवाड्याने त्यांना सांगितले, 'तुम्ही मांग हलक्या जातीचे. तुमचा आम्हांला बाट होतो. आम्ही पाणी भरू देणार नाही.'
मांगांचे पाण्यावाचून हाल व्हायला लागले. महार 'विहिरीवर आलेल्या मांगांना पाणी वाढू, पण हात लावू देणार नाही' म्हणून सांगत होते! प्रकरण चिरडीला आले होते. सध्या मांग गावातून पाणी वाढून अर्धा मैल वाहून घरी नेत होते. नासलेलेच पाणी कपडे-भांडी धुवायला नाइलाजाने वापरत होते. शेजारच्या महार-वाड्यातल्या विहिरीवर महारांनी पहारा ठेवला होता!

प्रभाकरकाकांनी गावात गेल्याबरोबर महारवाड्यात जाण्याऐवजी मांगवाड्यात जायचे निश्चित केलेले असते.
सरपंचांना घेऊन आम्ही वस्तीवर जातो. महारवाड्यावरच्या लोकांना ते बोलावून घेतात.
लोक जमल्याबरोबर काका कणखर आवाजात सांगतात, 'मी जरी महार जातीत जन्मलो असलो तरी मी इथे सामाजिक समता परिषदेच्या या समता दिंडीत आलो आहे. मला जी बाजू न्यायाची दिसते तिच्याकडूनच मी बोलणार. आपण महारांनी उभा जन्म वेशीबाहेर काढला. आपला समाज आजही दुःख भोगतोय, आणि आपणच आपल्यासारख्या दलितांना असे वागवायचे? दलितांवरच हरिजन ॲक्ट लावून कारवाई करायची वेळ तुम्ही आणावी यापेक्षा या देशाचे आणखी दुर्दैव काय असायचे? तुम्हांला गावकरी विहिरीला शिवू देत नाहीत, तेव्हा तुम्ही कसे तडफडता, तळतळाट

करता, तसाच तळतळाट तुमच्या नावाने मातंग करतात; हे बरे वाटते का तुम्हांला ? तुम्ही जर त्यांना दूर लोटलेत तर इतरांनी आम्हांला जवळ करावे म्हणून सांगायचा काय हक्क राहिला तुम्हांला ?'

काका खूप संतापून बोलतात. इतक्यात गोविंद गदारे नावाचा महार उभा राहतो. म्हणतो, 'मांग लोक गलिच्छ राहतात. विहिरीवर आले की घाण करतात. पाण्यात उष्टचा, साबूपाण्याच्या बादल्या बुडवतात!'

त्याने असे म्हणताच कुंडलिक शेलार म्हणून मातंग समाजातला माणूस उभा राहतो. म्हणतो, 'आम्ही माणसेच आहोत की. पाणी खराब करायला काय वेड लागलेय होय ? कोण चुकत असेल तर शिकवा. तुम्हांला पण कोण तरी शिकवणारे निघाले म्हणून तुम्ही सुधारले ना ? '

प्रेमानंद म्हणतो, 'उद्या महारवाडचाच्या विहिरीचे पाणी संपले आणि महार लोक गावात पाणी मागायला गेले आणि गावकरी असेच म्हणाले तर ? '

प्रभाकरकाका म्हणतात, 'महारवाडचाने सगळ्यांच्यादेखत विहीर खुली केल्याचे कबूल केल्याशिवाय आम्ही हालणार नाही.'

सरपंच म्हणतात, 'महारवाडचाने मांगांकरता विहीर खुली केली तर गावाला आदर्श होईल. मग आपण गावातली विहीर सगळ्यां-साठी खुली करायला लावू.'

सरपंच वसंतराव पाटलांच्या घोषणेने वातावरणच बदलते. महार-वाडचातले लोक त्यांनी स्वच्छतेची खात्री दिली पाहिजे म्हणत होकार देतात.

मांगवाडचातले लोक प्रभाकरदादांना आणि प्रेमानंदला अक्षरशः मिठ्या मारतात! कुणी तरी नारळ फोडतो. प्रसाद वाटला जातो, आणि विहिरीवर मातंग समाजातल्या बायका पाणी भरतात. सगळेजण ओंजळीने त्यांच्या हातून पाणी पितात. पाठोपाठ सरपंच सगळ्यांना गावाच्याही विहिरीवर घेऊन जातात. तिथेही पाणी भरले जाते.

निघताना गावातले लोक आम्हा सगळ्यांना नारळ भेट देतात. दगडावर आपटून तोंडात टाकून मोटरीचे दार बंद करता करता प्रदीप म्हणतो, ' आज नारळ फार गोड लागतोय रे!'

संध्याकाळी आम्ही दरेवाडीला पोचतो.

दरेवाडीला दादासाहेब रुपवते, कमलताई विचारे, यदुनाथ थत्ते, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री रामनाथ वाघ, आमदार कि. बा. म्हस्के वगैरे बरीच मंडळी आलेली असतात. डॉ. बाबा आढाव येणार या आशेवर असतो. बाबांचे एकलव्य पद्धतीने केलेले हे अनुकरण. त्याबद्दल त्यांच्या उपस्थितीत समारोप व्हावा, अशी इच्छा असते. बाबा आढावांचे काही कारणाने येणे होत नाही. रुखरुख मनात राहते.

दरेवाडीला प्रचंड पोलिस-बंदोबस्त पाहून आश्चर्य वाटते. डी. एस्. पी., कलेक्टरपासून दोनतीनशे अधिकारी आणि पोलिस तळ देऊन बसलेले. गावातले वातावरण मात्र अस्वस्थ वाटते.

दोघे-चौघे सांगतात, ' गावातल्या लोकांनी काही महार–मांग लोकांना काल हातात तांदूळ देऊन, ' पाण्याला किंवा देवळाला शिवणार नाही ' अशी सक्तीने शपथ घ्यायला लावली. ' काही लोकांनी आदल्या रात्री मांडवही जाळायचा प्रयत्न केला होता. पडदा सकाळी कातरून टाकलेला आढळला. महारवाड्याने आज लाउडस्पीकर आणला तर मघाशी खांबावर तार टाकून वीजदेखील घालवली. नगरहून आत्ता आम्ही गॅसबत्त्या आणून ठेवल्या आहेत. पण गावातल्या लोकांनी सभेवर बहिष्कार टाकलाय! मळाईच्या देवळाला सकाळीच कुलूप लावून टाकलेय.'

' पोलिसांना ठाऊक आहे का ?'

' विचारा की, '

मी डी. एस्. पी.ना भेटतो.

ते म्हणतात, ' काही गडबड व्हायची शक्यता नाही. दुपारी मी स्वतः येऊन लोकांना सांगून गेलोय. शिवाय आत्ताही बंदोबस्त ठेवलाय. मिनिस्टरची जबाबदारी आमच्यावर असते. तुम्ही काळजी करू नका.'

आम्ही सभेला सुरुवात होण्यापूर्वी सार्वजनिक विहिरीवर सवर्ण आणि दलितांनी मिळून पाणी भरावे, असे सुचवतो. सरपंच किंचित घुटमळून म्हणतात, 'काही हरकत नाही, इथे समोरच सार्वजनिक विहीर आहे, त्यावर आपण पाणी भरू.'

आम्ही 'हो' म्हणतो.

इतक्यात एक तरुण माझ्या कानाशी लागतो. म्हणतो, 'अनिलराव, ही विहीर सार्वजनिक आहे हे खरे, पण ती आमचीच आहे! फक्त दलित लोकच तिच्यावर पाणी भरतात. सवर्ण ज्या सार्वजनिक विहिरीवर आम्हांला पाणी भरू देत नाहीत ती इथून पलीकडे पाच मिनिटांच्या अंतरावर आहे.'

मी सरपंचांना विचारतो, 'इथे सार्वजनिक विहिरी किती?'

'दोन' ते सांगतात.

'मग आम्हांला हरिजनवाड्यातली सार्वजनिक विहीर नकोय, गावातल्या विहिरीवरच पाणी भरायचे आहे.'

सरपंच चेहरा टाकतात. दादासाहेबांकडे पाहात 'चला' म्हणतात. आम्ही सगळे जण विहिरीवर जातो. आठ दहा दलित बायकांची फौज घेऊन कमलताई विचारे पुढे सरसावतात. पाणी काढले जाते, कमलताई ते 'प्रथम मान तुमचा' असे म्हणून सरपंचांनाच प्यायला देतात! सरपंच कसनुसा चेहरा करून एरंडेल प्यावे तसे पाणी पितात, असे वाटते. मागोमाग इतर लोकही पितात.

मळाईच्या देवळापाशीच समोरच्या पटांगणात सभा असते.

वीज तारा टाकल्याने गेलेली असते.

कुणी तरी नगरला जाऊन मोटरमध्ये घालून जनरेटर आणलेला असतो. त्यामुळे एक बल्ब आणि लाउडस्पीकर चालू असतो. काही गॅसबत्त्या लावलेल्या असतात. कमलताई, यदुनाथ वगैरे मंडळी स्टेजवर जाऊन बसतात.

मी, दिलीप, सुधीर 'देवळात प्रवेश करू द्या' म्हणून सरपंचांना सांगत असतो. ते म्हणतात, 'किल्ली कुणाकडे आहे ठाऊक नाही!' 'शोधून काढा, पण आता हे वैर मिटवून टाका.

किती दिवस तुम्ही देव असा कोंडून ठेवणार ? ' म्हणून विचारतो.

'यांच्याकडे आहे', 'तिथे सापडत नाही', 'कुणीकडे ठेवलीय माहीत नाही', वगैरे टोलवाटोलवी करण्यात पंधरावीस मिनिटे जातात. डी. एस्. पी. बारावकरांना मी सांगतो की, 'जर यांनी कुलूप उघडले नाही तर कुलूप फोडून दलितांना आत न्यायचा आमचा विचार आहे. आणि ते कामही सरपंचाला सांगणार.'

ते म्हणतात, 'फार घाईला येऊन उपयोग नाही. इथले लोक पक्के आहेत. जुने दुखणे आहे इथले. त्यांच्याच कलाने घ्या. त्यांच्याच हाताने कुलूप उघडून घ्या. तुम्ही जबरदस्तीने उघडायला लावलेत तर एखादे वेळी दंगलसुद्धा करतील.'

आम्ही त्यांचा सल्ला मानतो.

शांतपणे जागच्याजागी हाताची घडी घालून उभे राहात सरपंचांना सांगतो, 'तुम्ही किल्ली सावकाश शोधून आणा, पण जोवर किल्ली आणून कुलूप उघडून तुम्ही दलितांना,–ज्यांची यायची इच्छा असेल त्यांना, जे बौद्ध आहेत ते मंदिरात जातच नाहीत, त्यांचा प्रश्न नाही पण मातंग, चर्मकार समाजांतले लोक आमच्याबरोबर यायला तयार आहेत त्यांना नेले पाहिजे.'

'साहेब, आम्हीसुद्धा यायला तयार आहोत. आम्ही बौद्ध असलो तरी मळाईला मानतो. आमची नवसाची आई आहे. तिचे दर्शन आम्हांला होत असेल तर नाही कशाला म्हणता ?' एक तरुण सांगतो.

सरपंच दोनचार गावकऱ्यांशी बोलणे करतात. आत्ता किल्ली घेऊन येतो, म्हणून ते जातात. त्यांच्याभोवती बरीच गर्दी जमते. शेवटी ते इकडे तिकडे कुठेही न जाता त्या गर्दीतून परत देवळाच्या दाराशी येतात, तेव्हा त्यांच्या हातांत किल्ली असते. घोषणांच्या घोषात आठदहा दलित स्त्रिया आणि मुले, आणि त्यांच्या मागोमाग इतरही गावकरी आत शिरतात. त्या बायका भक्तिभावाने देवीची पूजा करतात.

सभा सुरू होते. भाषणे होतात. संपतात. आम्ही दलित वस्तीवर जाऊन चहा घेतो. निघताना दादा मला म्हणतात, 'दरेवाडीतले वातावरण पूर्वी होते तसेच आहे. लोकांनी मनापासून कार्यक्रम केले नाहीत. तुम्ही देवळाच्या प्रवेशाचा आग्रह फार धरलात, पण त्यांची अनिच्छा दिसली. अशा गोष्टी धीराने व्हायला पाहिजेत. ते करीत नाहीत, ऐकत नाहीत, असे दिसल्यावर नाद सोडायचा नाही, पण परत पुन्हा यायचे. चारआठ दिवस राहायचे. समजूत घालायची. असे करायला पाहिजे. नुसते पोलिस बरोबर असले म्हणून देवळाची दारे उघडली, पण त्यांच्या मनाची दारे रेशमी हातांनीच उघडायला पाहिजेत. नाही तर उद्या तुम्ही मंदिरप्रवेश करून जाल आणि गावात दलित माणसे मार खातील. तुम्हांला मी सांगणार होतो, पण तुम्ही एकदम प्रतिष्ठेचाच प्रश्न करून बसला !

'पण दादा, त्यांची वागणूक राग यावी अशीच...'

'तुम्हांला येतो त्याच्यापेक्षा जास्त राग मला येतो, पण संघर्ष आणि कायद्यानेच हा प्रश्न सुटत असता तर तो इतके दिवस सुटायचा राहिला नसता. समता दिंडीने भांडणे मिटवली पाहिजेत. संघर्ष करायलाही हरकत नाही, पण त्याआधी पुष्कळ उपाय आहेत. तुम्ही संध्याकाळी गावात जाता. एक सभा घेता आणि लागली त्यांनी तुमचे म्हणणे मान्य करून पाणवठा एक करावा, देवळात प्रवेश द्यावा, अशी अपेक्षा करता. हे चूक आहे. बापूसाहेब पाटलांसारखा माणूस सगळा जन्म एका गावात राहून हरिजनांसाठी काम करतो आणि तरी म्हणतो की, गावातल्या पन्नास टक्के लोकांचेच खरे हृदयपरिवर्तन झालेय, आणि तुम्ही तर तासभर पण थांबायला तयार नाही ! अशाने काय क्रांती होते ? ही तर कोकाकोला रिव्होल्युशन झाली. बूच फोडले, दोन मिनिटे फसफसले,– संपले !'

दादा बोलत असतात.

मी गाडीत बसल्या बसल्या दूरदूर जाणाऱ्या दरेवाडीकडे पाहात असतो. माझ्या कानांत शब्द घुमत असतात, 'ही तर कोकाकोला रिव्होल्युशन झाली. बूच फोडले, दोन मिनिटे फसफसले,–संपले !

## प्रकरण अठरावे

# अठरा गावे : अठरा विश्वे !

समाधीतून मी जागा होतो तेव्हा नगर आलेले असते.

मी उतरताच थेट प्रभाकरकाकांच्या घरी जातो.

दरेवाडीच्या संदर्भात मोर्चा कसा काढला, पोलिसांनी बऱ्याच लोकांना अटक केली आहे, काय घडले वगैरे माहिती ते देतात.

मी डी. एस्. पी. बारावकरांना भेटतो. ते सांगतात, 'गावातल्या सगळ्या प्रमुख लोकांना आजच आम्ही अटक केलीय. तुम्ही गावात जाऊसुद्धा नका. उगाच पुन्हा वातावरण तंग होईल. दादासाहेब रुपवतेही जायला निघाले होते, आम्हीच त्यांना जाऊ नका सांगितले.'

'मला गेले पाहिजे.' मी म्हणतो.

'मग आमच्या गाडीने जा. काही लोक सांगून ऐकणारे असतात; काही जण ठोकल्यावरच ऐकतात. दरेवाडीला फार वेळा हे झालेय. खरे तर सामुदायिक दंड बसवायला हवा अशा गावांवर. आता 'समता दिंडी'ऐवजी 'समता दंडा'कडे तुम्ही दरेवाडीच्या परिवर्तनाचे काम सोपवा !'

पोलिसांच्या गाडीतून मी दरेवाडीला पोचतो.

इन्स्पेक्टर चावडीपाशी गाडी उभी करतात.

एरवी अनुभव असा की, गावात गाडी शिरली की चोहोकडून लोक डोकावतात, पण आता सामसूम राहते. कुणी डोकावत वा पुढे येत नाही !

इन्स्पेक्टरना गाडीपाशीच थांबायला सांगून मी एकटाच पुढे जातो. दोघाचौघांना काही विचारतो.

आम्हांला ठाऊक नाही म्हणून ते सटकतात.

सरपंच नसतात. ज्या बाईमुळे ही दंगल पेटली ती किंवा तिचे भाऊबंदही नगरलाच असतात.

शेवटी मी गावालगतच्या दलित वस्तीवर जातो. भिंगारदिव्यांच्याच घरी. दिंडीवाल्यांपैकी कुणी तरी आल्याचे कळताच वस्तीवरले लोक जमायला लागतात. लोकांच्या बोलण्यातून सूत्ररूपाने घडलेल्या घटना डोळ्यांसमोर उभ्या राहायला लागतात.

'समता दिंडी' येणार असे पत्र आल्याबरोबर सरपंचांनी गावकऱ्यांना 'एक गाव : एक पाणवठा' करावा लागेल वगैरे सांगितले. त्यांनी चिथावले असे म्हणता आले नाही, तरी त्यांनी दिंडी आल्यावर काय करावे लागणार त्याची कल्पना दिल्याने लोकांनी विरोध करायचा कसा याचा बेत आखला. सवर्णांनी विरोध करून कार्यक्रम होऊ द्यायचा नाही असे ठरवल्याचे कळताच दलितांनी हा कार्यक्रम यशस्वी करायचाच असा निश्चय केला.

गावकऱ्यांपैकी काहींनी चांभार, मांग समाजातल्या काही लोकांकडून हातात तांदूळ देऊन या कार्यक्रमात भाग घेणार नाही अशी शपथ घेववली. गावकऱ्यांनी दवंडी पिटून कुणी या दिवशी सभेला उपस्थित राहू नका असे सांगितले. याच वेळी गावात सुधाकर वेरड म्हणून जवान लष्करातून रजेवर आला होता. 'आम्ही मिलेट्रीवाले आहोत, आमचे कोण काय करतो? पोलिसाच्या बापाला आम्ही भीत नाही' वगैरे सांगून त्याने गावातली काही पोरे जमवली आणि सभेच्या आदल्या रात्री उभारलेल्या मांडवाला काडी लावली असे म्हणतात.

पण दलित लोकांनी पहारा ठेवला असल्याने लगेच विझवून टाकली. तरी मांडवाच्या कापडाला कुणी तरी कातरून ठेवलेच. सभा झाली. समता दिंडीबरोबर जवळजवळ सगळेच दलित इर्षेने आणि उत्साहाने खऱ्या भक्तिभावाने देवळात जाऊन आले. जनरेटर आणून लावल्यामुळे सभाही ठणठणीत झाली. आणि आधीच पोलिसांनी जाऊन सांगितल्यामुळे इतका बंदोबस्त ठेवला की सभाही उधळून लावायची कुणाची हिंमत झाली नाही!

याचा सूड त्यांनी दुसऱ्या दिवशी घेतला. पोलिसांचेही चुकले. त्यांनी दादासाहेब गावातून बाहेर पडल्याबरोबर आपले कर्तव्य संपले असे समजून सगळा बंदोबस्त उठवला. दुसऱ्या दिवशी सकाळी बेरडाने घरोघर जाऊन लोकांना दलितांवर आपण बहिष्कार टाकू या असे सांगितले. लोकांनाही जातीचा अपमान झाला वगैरे वाटतच होते. लगेच दुकानदारांनी, गिरणीवाल्याने त्यांना 'इथे यायचेच नाही' म्हणून सांगायला सुरुवात केली. लोकांनी आमच्या खासगी शेतातल्या पायवाटेवरून जायचे नाही म्हणून सांगितले. मारामारी होणार, असा रंग दिसायला लागला. दोन्ही बाजूंनी तयारीला सुरुवात केली.

'संध्याकाळी आणखी एक नाटयपूर्ण घटना घडली. या जवानाच्याच घरातल्या कौसल्याबाई बेरड म्हणून बाईच्या अंगात आले. ती घुमत घराबाहेर पडली. सगळा गाव तिच्या मागोमाग. ती दलितांच्या वस्तीपाशी गेली आणि देवीचा संदेश म्हणून तिने महार–मांगांना जातीवरून शिव्या द्यायला सुरुवात केली. अंगात आलेल्या देवीला बऱ्याच इरसाल गावरान शिव्या येत असाव्यात! कारण ती महार–मांगांना जगातील पशू प्राणिमात्रांचा आईबापांशी संबंध जोडून शिव्या देत होती. घुमत होती. भरपूर शिव्यांचा मारा केल्यावर तिने 'सूड घ्या– सूड घ्या' म्हणत घुमायला सुरुवात केली! मळाईचे देऊळ गोमूत्राने धुवून घ्यायला, देवीला नवे कपडे करायला सांगितले.

'इकडे ती बाई घुमत असतानाच इंदूबाई श्रीरंग भिगारदिवे नावाच्या बाईचे प्रेत भिगार डेरी फार्मवरून काही लोकांनी पुरण्याकरता वस्तीवर आणले होते. वस्तीवर बाई मेली म्हटल्यावर गावकऱ्यांनी ती देवीच्या शापामुळेच मेली, ती देवळात काल गेली होती वगैरे बोलायला सुरुवात केली. दलितांचे म्हणणे त्या गावातली ती मूळची असल्याने पुरण्याला तिचे प्रेत आणले. ती हार्ट अटॅकने मेली, पण इथे नाही. लोकांनी अफवांचा सुकाळ करून सोडला. आता सगळ्यांनाच 'साथ' लागेल, सर्प डसतील वगैरे म्हणत कौसल्याबाई देवळात गेली. गावातल्या बायकांनी देऊळ गोमूत्राने धुवून काढले, शुद्धी केली. मग देवी शांत झाली. रात्री सूड घ्यायचा आदेश प्रमाण मानून बेरड कुटुंबीयांच्या

नेतृत्वाने दलित वस्तीवर तुफान दगडफेक केली. रॉकेलमध्ये भिजलेले कापडाचे बोळे फेकले. पण दलितही सावध होते. त्यांनीही दगडांचा मारा केला. पण गावकऱ्यांनी आधी दगड गोळा करून ठेवले होते. यांना फक्त त्यांच्याकडून आलेल्या दगडांतले दगड चुकवून अंधारात गवसतील तेवढेच दगड मारता आले. तरी पण फार कुणाला लागले नाही. चार-पाच जणांना मुका मार बसला.

' सकाळी बहिष्कार अधिक तीव्र झाला. वातावरण जास्तीच तंग झाले. पण पहाटेच काही जण गुपचूप नगरला पोचले होते. त्यांनी प्रभाकरराव रुपवत्यांची भेट घेतली. पोलिस तुकडी घेऊन प्रभाकरराव तिथे पोचले. पोलिसांनी गावात पाऊल टाकताच सवर्णांपैकी ज्यांनी ज्यांनी पुढाकार घेतला त्या सगळ्यांना पकडले. धरपकड होताच गावात घबराट झाली. जामिनावर सुटका करताना बहिष्कार उठल्याशिवाय सुटका होणार नाही, हे स्पष्ट केले होते. जवान बेरडासकट सगळ्यांना रोजची हजेरी लावली. त्याचे प्रकरण लष्कराकडे दिले. बाकीच्यांवर खटले भरायची तयारी चालली होती. आता गावात कडेकोट बंदोबस्त होता, पण वातावरण अस्वस्थ होते.

समोर पाच-पंचवीस लोक बसलेले असतात. आवेशाने, तावातावाने, चिडून, ओरडून, तळमळून, कळवळून सांगत असतात. माझे डोळे पाहता पाहता आकाश भरून यावे तसे भरून येतात.

कशा कथा! – कशा व्यथा !

अठरा गावे ! अठरा विश्वे !

लक्षावधी गावांचा हा 'भारत देश महान' असाच का आहे?

२०८८२
भू. प्रवास
५८३

## प्रा. अनिल थत्ते यांची पुस्तके

- **पूर्णारण्यातील वडवानल**

  विदर्भाच्या ग्रामीण भागातील अनागोंदीचे चित्र
  महाराष्ट्र शासनाचा ललित विभागातील उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार

- **कटिया**

  गोंड मुलाच्या जीवनाची धावती ओळख
  महाराष्ट्र शासनाच्या बाल विभागातील उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार

- **भमरागडची भ्रमणगाथा**

  हृदयाला चटका लावणारी साहसयात्रा

- **युवकांपुढील समस्या**

  युवकांच्या जीवनाबद्दल आस्था असणारांना चर्चेसाठी
  एक आराखडा

REFBK-0020872
REFBK-0020872